# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १ अकोला, रविवार ता० ६ माहे जून सन १८७५ इ० अंक २३


## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### वसूल

| | रु. |
|---|---|
| रा. रावजी घनःशाम वकील | ५ |
| मि. मीरमहमद्र अली दरोगे | २०१४०६ |
| रा. रामचंद्र यशवंत गोडबोले | १५ |
| ,, बामन बापूजी लिमये | ५ |
| मि. आबासबेग खतीब | ७ |
| रा. नरसो रामचंद्र वकील | २२०२०८ |
| मे. ताजूदीन साहेब | ३–१२ |
| रा. कृष्णाजी दिनकर | ६–८ |
| ,, बामन गणेश राहातेकर | ६–८ |
| ,, विनायक त्रिंबक मास्तर | ६–८ |
| ,, केशवराव चीफ कान्स्टेबल | २० |
| ,, बळवंतराव कान्हो देशमुख | ६–८ |
| ,, रामचंद्र पांडुरंग पेशकार | ५ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

## नोटिस.

CLOSING OF THE WARDHA VALLEY (STATE) RAILWAY.

**वर्धाव्हाली स्टेट रेलवे बंद करण्याविषयीं**

या नोटिशी अन्वये जाहीर करण्यांत येतें कीं सरकारच्या हुकुमावरून येत्या तारीख १६ जून सन १८७५ इसवी रोजीं व त्या नंतर पुढें नोटिस देण्यांत येईपर्यंत वर्धाव्हाली स्टेट रेलवे बंद ठेवण्यांत येईल.

सदरीं लिहिले कारणाबद्दल ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेवरील हिंगणघाट सोनाईगाव व वर्धा या स्टेशनांचे दरम्यान येत्या जूनच्या १५वे तारखेनंतर पुढें गाडी जाण्यायेण्याचें बंद होईल. वर्धा व हिंगणघाट या दोन स्टेशनांचे दरम्यानचे लैनीच्या संबंधानें उतारूं व माल पाठविण्याबद्दल जी व्यवस्था करण्यांत आली आहे ती व नोटिशी देण्यांत आल्या आहेत त्या सर्व तारीख १६ जून रोजीं व त्या नंतर पुढें रद्द करण्यांत आल्या आहेत.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता० २६ माहे मे
सन १८७५ इसवी.

## जाहिरात.

आह्मास एक घरीं राहून इंग्लिश विद्या शिकविणारा गृहस्थ पाहिजे आहे त्या गृहस्थाची म्याट्रिक्युलेशन परीक्षा पास झालेली असावी. त्याचा स्वभाव उत्तम असून तो पुण्याकडील प्रदेशांत रहाणारा असला पाहिजे. भोजनखर्चाशिवाय प्रथम आह्माकडून त्यांजला २० रुपये दरमहा प्रमाणें पगार मिळेल. याबद्दल ज्या कोणास पत्र पाठविण्याचें असेल त्यानें आपले सर्व माहितीबद्दल व विद्येबद्दल खालीं सही करणाराकडे पाठवावें. ह्मणजे तें आह्मास पावेल. कळावें. तारीख ३० माहे मे सन १८७५ इसवी.

क्ष.

पत्ता — पत्र पाठविणें तें रेलवे स्टेशन वर्धा प्रान्त नागपुर येथें रा. रा. केशवराव महादेव कावळे वकील यांचे नांवें पत्र पाठवावें.

## नोटिस.

उदेराम धनजी मारवाडी वस्ती आगर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं प्रतिवादी सखाराम वल्लद जानजी सुतार आगरकर याजवर दावा रुपये ३९०।≡ स्मालकाज कोर्टीत केला आणि प्रतिवादीस नोटिस दिली कीं रहातेंघर व जिंदगी विकून ये व कोणी घेऊं नये असें प्रतिवादीला समजल्यावरून तो तुह्मास फिदा होऊन तुह्मास खोटें खरीदखत करून देऊन आमचे कणग्याचे जाग्यासुद्धां विकतो हे बरोबर नाहीं. कणग्याची जागा व कोठ्याची जागा याजवर आमची मालकी कदीमपासून आहे. व त्या जाग्यावर कोठा व कणगी वगैरे सामान बारा वर्षांपासून बहाल आहे आमची मालकी असून मी जागा खाली करून देत नाहीं कळावें तारीख ३ माहे जून सन १८७५ इसवी.

( सही ) नारायणजी वल्लद
रघूजी तेली आगरकर
दस्तुर खुद

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### मूर्तिपूजा.

नंबर २

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. मूर्तिपूजेविषयीं आणखी खालीं लिहिलेले दोन विचार छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

जरी ईश्वराचें रूप अगम्य आहे तरी त्याची भीति बाळगून चाललें असतां मनुष्यांचें कल्याण होतें. आजपर्यंत प्रत्येक देशांतील तत्ववेत्त्यांनीं परमेश्वराचें चित्स्वरूप कळण्याविषयीं जरी अगणित प्रयत्न केले आहेत; तथापि त्याचा साक्षात् अणुमात्र कोणास थांग लागला नाहीं. इतकें खरें कीं, मोठमोठ्या विद्वानांनीं मूढ लोकांचीं तोंडें बंद करण्यापुरती तयारी करून ठेविली आहे व ते आपल्या वाक्पांडित्याच्या योगानें आणि भाषणांत वीत वीत लांबीचीं अति कठीण शद्बांचीं वाक्यें घालून अज्ञातज्ञांस ब्र काढूं देत नाहींत परंतु त्यांच्या त्यांच्यांत कशी स्थिति होत असेल कोण जाणें. अधिक तें काय होणार; जोतो आपापलीं मतें इतरांस पढवितो आणि आपल्या पक्षास ओढून घेऊं पहातो. व अशा प्रकारच्या विद्वान् लोकांच्या तंट्यानें देशामध्यें निरनिराळ्या पंथाची प्रवृत्ति होते. एक मृत्तिकेचें चित्र करून ठेवून त्यांत विचारशक्ति, स्मरणशक्ति, क्रोध, माया इत्यादि गुणांचा आरोप मनुष्याला करितां येत नाहीं. व त्याच्या ठायीं चलनवलनादि व्यापारही उत्पन्न करतां येत नाहींत यावरून इतकें सिद्ध होतें कीं, मनुष्यदेह, जो केवळ एक प्रकारच्या मृत्तिकेचा बनलेला आहे, तो कोणी तरी निर्माण केला असावा, व ज्या शक्ति मनुष्याला चित्रांत घालितां येत नाहींत, त्या त्यानें लीलेनें कोट्यावधि प्राण्यांच्या शरिरांत घातल्या आहेत. आतां जैनमताप्रमाणें ही सृष्टि अनादि आहे, ते असें ह्मणतात कीं, मर्त्याला पुनर्जन्म नाहीं व परमेश्वर ह्मणून कोणी प्राणीही नाहीं. परंतु हें त्यांचें मत किंचित् दोषाई आहे. कारण या सृष्टीमध्यें आपण अशा पुष्कळ गोष्टी पहातो कीं, त्यावरून एका निराकार ब्रह्माची कल्पना केल्याखेरीज आह्माला दुसरा इलाज नाहीं. वर सांगितलेल्या मानसिक शक्तींचा आपणावर प्रयोग होत असतो परंतु त्या आपणास दृश्य नाहींत. वारा वहात असला ह्मणजे कर्णांनीं त्याचा ध्वनि ऐकूं येतो व स्पर्शेंद्रियांनीं त्याचें ज्ञानही आपणास होतें, तथापि त्याचें रूप आपणास दृश्य नाहीं. यावरून इतकें सिद्ध होतें कीं, कित्येक अदृश्य वस्तूंचाही व्यापार मनुष्यावर घडतो. आतां एक पात्र घेऊन त्याचें द्वार बंद केलें तर आपणास इतकें ठाऊक आहे कीं, त्या पात्राच्या अंतर्यामीं अवकाश ह्मणून कांहीं आहे कारण जर एखादी मावण्यासारखी वस्तु त्या पात्रांत टाकली तर ती त्यांत रहाते. पण ज्या वेळेस आपण त्याचें तोंड बंद करितो त्या वेळेस त्यांतील अवकाश आपणास दिसतही नाहीं व अनुभवही होत नाहीं. यावरून ईश्वर ह्मणून कोणी एक निराकार अनाद्यंत प्राणी कल्पून व तो रात्रंदिवस आपलीं कृत्यें अवलोकितो असें मनांत बाळगून चित्ताचें समाधान करून घेणें हा उत्तम पक्ष होय. आतां वर सांगितल्याप्रमाणें मनाची शान्ति एकदम करितां येत नाहीं कारण हें मन इतकें चंचल आहे कीं, यापुढें दुसऱ्या कोणत्याही साकार अथवा निराकार वस्तूचें चांचल्य मुळींच टिकत नाहीं. बरें अशा प्रकारचें मन आपणापाशीं आहे आणि हें आपणास सुखावह करून घेणें तर काय युक्ति करावी? युक्ति हीच कीं त्याचें चांचल्य घालवून त्याचे ठायीं स्थैर्य आणावयाचें. आगगाडीच्या मार्गांत एक दगड पडला तर तिला धोका येतो. रसायनांत एखादें औषध अधिक पडलें तर तें सर्व एका क्षणांत बिघडतें पण याहीपेक्षां मनाची वृत्ति फारच चमत्कारिक आहे. कोठें खट्ट होऊन थोडा ध्वनी झाला कीं पुरे, त्याची समाधी तेव्हांच ढळते. ज्या ठिकाणीं गलबा होत असतो, ज्या ठिकाणीं स्त्री पुरुषांच्या नित्य कृत्यांचा उलगडा होत असतो, तेथें विद्यार्थ्याला अभ्यास करितां येत नाहीं ही गोष्ट आबाल वृद्धांस माहित आहे. आतां एखाद्यास विचारलें कीं, "कारे बाबा असें होण्याचें कारण काय?" तर तो ह्मणतो "गडबडीमुळें विद्यार्थ्याचें मन लागत नाहीं. पत्रकर्ते महाराज या दृष्टांतावरूनच तुह्मी कल्पना करा कीं, इंग्लिश विद्वानांचा व अलीकडील आपल्या देशांतील इंग्रजी विद्वानांचा हें पराकाष्टेचें चंचल मन मोठ्या समूहामध्यें अनाद्यंत परमेशाच्या विच्यारांत व त्याचें अनन्यभावेंकरून स्तवन करण्यांत लावण्याचा प्रयत्न कितपत् श्लाघ्य आहे. एखाद्या मनुष्यास एकदम एक वर्णसमीकरण तोंडानें कर ह्मटलें तर त्या बापड्यास तर येणारच नाहीं. तथापि असें करूं सांगणाऱ्याची मात्र अक्कल उदयास येते, त्याप्रमाणें साधारण अज्ञान लोकांस एकदम निराकार ब्रह्माविषयीं विच्यार करण्यास जे शिकवितात व जे अशा हेतूनें उपदेश करितात ते विद्वान् असताही अविद्वान् समजले पाहिजेत. ज्याप्रमाणें धुळीच्या पाटीवर अगर स्लेटीवर 'श्रीगणेशायनमः' येथून शिकण्यास आरंभ करून कालांतरानें व परिश्रमानें मनुष्यास समीकरणाचे

ज्ञान होतें इतकेंच नव्हे तर त्यालातीं केवळ तोंडानें ही करितां येतात तद्वत् प्रथम ईश्वराची कल्पित साकार मूर्ति करून तिचें ध्यान करतां करतां मन स्थैर्यतेप्रत पावलें ह्मणजे निराकाराविषयीं विचार करणें योग्य आहे. लहान मुलाची प्रकृती बिघडली असतां ती सुधारण्यासारखें औषध घ्यावयाचें असलें तर ज्याप्रमाणें त्याची माता त्यास खाऊची लालूच दाखवून त्याजकडून औषध घेववितें त्याप्रमाणें मनुष्यानें मन परमेश्वराच्या ठिकाणीं लागावें व अशानें अज्ञान रूपी त्याचा आमय दूर होऊन त्यास अक्षय सुख व्हावें या करतांच ईश्वराची सगुण मूर्ति, स्वच्छ उपकर्णी, निर्मळ स्थान, एकांत इत्यादि लालूच दाखवून पुढें कालांतरानें निराकार ब्रह्माविषयीं विचार करण्याकरितां मनुष्यांस उपदेश करणें हें खऱ्या विद्वानाचें काम आहे, व असें केल्यानेंच विद्वान हें नांव त्याला शोभेल. अशा हेतूनेंच आमच्या लोकांनीं घरें बांधतांना देवगृह ( देवघर ) ह्मणून एक निराळी खोली बांधण्याचा परिपाठ घातला. व देवालयें बांधणें, यात्रा करणें, सत्पुरुषांचे पुतळे करणें, या गोष्टींतही हाच हेतु दिसतो. सगुण मूर्तीचें ध्यान नेत्रादि बाह्येंद्रियांच्या साह्यानें करतां आल्यावर पुढें अंतरात्म्याचें ज्ञानचक्षुरादि अवयवांच्या योगानें निराकार ब्रह्माचें ध्यान करण्यास प्रयत्न करणें प्रत्येक सुविचारी मनुष्यास उचित आहे. एडिटर साहेब विस्तार फार झाला सबब सध्यां पुरे करतो. लोभ करावा हे विनंती. ता० ४ माहे जून सन १८७५ इसवी.

एक
मूर्तिपूजेषी

# वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुध्ध ३ शके १७९७

## राजकीयप्रेम.

संस्थानिक व राजेलोक यांस कोणाची गरज नसते ते बेपर्वा असतात, व त्यांची राजकीय कार्यकारणें कोणास ठाऊक नसतात ह्मणून त्यांच्यांत परस्पर प्रेम कमी अशी प्रसिद्धी आहे. पण तो प्रकार आतां नाहींसा होत चालला आहे व राजेलोकांत परस्पर प्रेम वाढत चाललें आहे हें ऐकून आह्मांस संतोष होतो. शिंदे व होळकर यांच्या नुकत्याच भेटी झाल्या. या मागें दोन पिढ्यांत कधीं झाल्या नव्हत्या. गायकवाडाच्या श्री० यमुनाबाई राणीसाहेब गुदस्तसालीं निकृष्ट स्थितींत पुण्यास होत्या तरी त्यांनीं होळकरांनां आपले घरीं बोलावून मेजवानी दिली. व तें त्यांचें प्रेम स्मरून हल्लीं यमुनाबाईसाहेबांच्या मुलास राज्याभिषेक झाला तो आनंदाचा प्रकार स्मारक होण्याकरितां होळकरांनीं त्यानां मोठा टोलेजंग नजराणा पाठविला हें ऐकून सर्वांस संतोष वाटेल.

हा नजराणा इंदुराहून कर्नल बापू साहेब रेशीमवाले घेऊन गेले होते त्यांत गायकवाड राजेसाहेबांस मोत्याची कंठी होती, एक श्रृंगारलेला हत्ती होता, दोन मोलवान आरबी घोडे होते, २१ पोशाख होते व गायकवाड सिंव्हासनावर बसले होते त्या सभेवार रुपयांचा मोठा ढीग होता त्याचप्रमाणें यमुनाबाई साहेबांस व त्यांच्या कन्या ताराबाई साहेबांस पाच पाच पोशाग उत्तम प्रतीचे होते ते स्वीकारून राणी साहेबांनीं होळकर सरकारास आपला संतोष प्रदर्शित केला.

असे संतोषाचे प्रसंग अनेकवार येवोत व त्यांपासून एतद्देशीय राजे लोकांचें प्रेम दिवसानुदिवस वर्धमान होवो असें आह्मी इच्छितों.

## पुण्याचें प्रदर्शन.

या प्रदर्शनाचे सुरवातीचा समारंभ ज्ञानप्रकाशावरून गेल्या आठवड्यांत आह्मी आपले वाचकांस कळविला आहे. हें प्रदर्शन जरी सामान्य स्थितींत असलें तरी ते केवळ एतद्देशीय कारागिरीचें असल्यामुळें सर्व हिंदु लोकांस अति अगत्याचें आहे यांत संशय नाहीं. टाइम्स नावाच्या इंग्रजी पत्राच्या बातमीदारानें लिहिलें आहे कीं नेटिव लोकांत कारागिरी कसली असावयाची आहे? ह्मणून तिरस्कार बुद्धीनें मी हें प्रदर्शन पहावयास जाण्याचें टाळलें होतें पण माझ्या एक दोन मित्रांनी मला आग्रह केल्यावरून मी तें पहावयास गेलों व त्यांतील कारागिरीचे पदार्थ पाहून मला फार आश्चर्य वाटेलें. त्यांतील कांहीं कांहीं पदार्थ थेट विलायती पदार्थाप्रमाणें दिसत होते व कांहीं मध्यम स्थितींत व कांहीं बाल्य स्थितींत होते तरी ते ते कारागीर आपआपल्या कसबांत अधिक लक्ष देऊन सुधारणा करितील तर त्यांचीं नावें प्रख्यात होऊन त्यांत व त्यांचे हिंदुस्थान देशास मोठा फायदा होईल. हे युरोपियन गृहस्थाच्या तोंडचे शब्द आहेत तेव्हां निष्पक्षपाताचे आहेत यांत संशय नाहीं. व हे वाचून आमचे लोकांस मोठी उमेद येईल. सोन्या रुप्याचे कलाबतु काम, रुप्यावरील नकशी काम इत्यादिकांची त्यानें फार तारीफ केली आहे व त्याचे कारखाने नेटिव लोक वाढवितील तर त्यांचा युरोपियन लोकांत व विलायतेंतही बहुत खप होईल असें लिहिलें आहे. दुसरें कांचेचें काम आपले देशांत अजून निकृष्ट स्थितींत आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. गुलबर्ग्याहून लोखंडी खाणीचे नमुने एकानें पाठविले आहेत त्याच्या कारागिरीची त्यानें वाखाणणी केली आहे. चाकू, छापण्याचे व लिहिण्याचे कागद, मेणबत्त्या, साबण, बंदुका, जिल्हई दिलेलीं मातीचीं भांडीं, शाई इत्यादि पदार्थांची तारीफ केली आहे. तसेंच सरकी काढण्याचें व कापड विणण्याचें एतद्देशीय यंत्राची त्यानें वाखाणणी केली आहे. यावरून संतोष वाटतो.

या प्रदर्शनांत एकंदर पदार्थ कोठकोठून व कोणाकडून किती आले होते त्यांची यादी, पदार्थांचें स्वरूप, किमती व विकत मिळण्याची सोय वगैरेबद्दल एक लहानसें बूक या कामाची पुढारी मंडळी छापून प्रसिद्ध करील व त्याच्या प्रति चोहोंकडे पाठवील तर मोठा उपयोग होईल. याजकरितां हें काम अवश्य व्हावें अशी आमची इच्छा आहे.

Communicated

## सत्पुरुष डाक्टर सिंक्लेर साहेब.

श्लोक.

उदेतिपूर्वंकुसुमंततःफलं ।
घनोदयःप्राक्तदनतरंपयः ॥
निमित्तनैमित्तिकयोरयंक्रमः ।
तवप्रसादस्यपुरस्तुसंपदः ॥ १ ॥

कालीदास.

"He has left us, not indeed, a mantle of inspiretion, but a name and an example which are at this hour inspiring thousands of the youth of India. Thus it is that the spirits of the great and the wise continue to live and to act after them. The most triumphant death is that of the martyr; the most awful is that of the martyred patriot; the most splendid, that of the hero in the hour of victory."

सत्पुरुषांचा महिमा विचित्र ! कारण, प्रथम फूल येऊन मागाहून फळ यावें, पुर्वीं ढग येऊन मागाहून पाऊस पडावा या प्रमाणें कार्यकारण भावसंबंध या सृष्टींत असतो. तथापि सत्पुरुषांची कृपा होण्यापूर्वींच अर्थार्जनाची मनोरथसिद्धि होते.

डाक्टर सिंक्लेर स्वर्गस्थ झाले. त्यांनीं आमच्या अंतःकरणावर उत्तम प्रेरणा केली आहे इतकेंच नाहीं. तर त्यांचें नांव आणि त्यांचें उदाहरण असें आहे कीं त्यामुळें या क्षणीं या हिंदुस्थानांतील शेकडो लोकांच्या अंतःकरणावर सुबुद्धीचा आणि सत्प्रेरणेचा ठसा उमटत आहे. याप्रमाणें मोठ्यांचीं चरित्रें ( आत्मे ) त्यांच्या मागें राहून लोकांवर परिणाम करितात. अतिशय जयजयकारक मृत्यू धर्मासाठीं मरणाऱ्याचा, त्याहिपेक्षां स्तुत्य परोपकारी धार्मिकाचा, आणि सर्वांत उत्तम रणांगणांत जयसमयीं रणशूराचा- त्याप्रमाणें पाहिलें असतां डाक्टर सिंक्लेरांनां आह्मा वऱ्हाडी लोकांच्या अज्ञाना बरोबर लढाई करण्याविषयीं जेव्हां पांच सहा वर्षांपूर्वीं सरकारी हुकूम झाला त्या वेळेस ते इकडे आले. ममता, परोपकार करण्याची हौस, सहनशीलता, सुस्वभाव आणि सुविद्या इत्यादि शस्त्रांहीं हत्यारबंद झालेले असे ते होते. कांहीं युद्ध केल्यावर आमच्या अज्ञानाचा पराभव करून त्यांनीं आह्मास सुपदास लाविलें आणि ते आतां आह्मास सोडून परलोकवासी झाले यावरून आह्मा वऱ्हाडकरांचा, मुख्यत्वेंकरून आह्मा विद्याखात्यांतील लोकांचा, सुकृततंतु आज तुटला असावा असें वाटतें. पृथ्वीचें पालन करणारे राजे शेवटीं काळाच्या स्वाधीन होतात. त्या पुढें कोणाचा इलाज नाहीं. तथापि सत्पुरुष केव्हांही गेला तरी त्याबद्दल अनिवार्य दुःख लोकांना होणारच. साहेब वयानें फार वृद्ध झाले होते असें नाहीं तथापि त्यांनां उदररोगाची व अर्धांग वायूची व्यथा असल्या कारणानें त्यांस हा अकालीं मृत्यू आला- इंग्लिश, ग्रीक, लाटिन आणि जर्मन या चार भाषा त्यांस फार चांगल्या अवगत होत्या. इकडील भाषांपैकीं अलीकडे परशियन भाषेचा व संस्कृत भाषेचा त्यांनीं बराच अभ्यास केला होता. संस्कृत भाषेवर त्यांचे पराकाष्ठेचें प्रेम जडलें होतें. व हरएक संस्कृतज्ञावर त्यांचा चांगला लोभ असे. उत्तम विद्येच्या योगानें अंतःकरणांतील मानापमानादि भाव धुऊन गेले असल्या कारणानें त्यांचें मन सर्वकाल सुविचारांत आणि जेणेंकरून लोकांचें कल्याण होईल अशा प्रकारचे उपाय योजण्यांत गढलेलें असे.

विद्याखात्यांतील सर्वांत उत्तम पदवी जी एल. एल. डी. ती डाक्टर साहेबांस मिळालेली होती. इतक्या सर्व विद्येंत प्रविण असून तंतुवाद्यावर त्यांस उत्तम रीतीनें गातां येत असे. मागें एकदां रेसिडेंट साहेब येथें आले असतां त्यांची करमणूक करण्याकरितां डाक्टरांचें गाणें करविलें होतें. हिंदुस्थानांतील लोक आपली प्रजा, यांस आमच्या देशांतील लोकांनीं जिंकिलें आहे व आम्हीं त्यांचे स्वामी आहो, राज्य करणारे आहो, आम्ही करूं ती पूर्वदिशा असा विच्यार त्यांच्या अंतःकरणांत कधींही आला नाहीं. व अशामुळें त्यांनीं हाताखालच्या लोकांस किंवा इतरांस कोणत्याही प्रकारें गांजिलें नाहीं. अलीकडे साऱ्या हिंदुस्थानाकडे दृष्टी दिली तर कित्येक नीच कुलांतील साहेब लोक मोठमोठ्या जागेवर काम करिताहेत व त्यांचें वर्तन डाक्टर साहेबांचे वर्तनाहून फार भिन्न आहे. हिंदु लोक ह्मणजे जिंकलेले, त्यांस हव्या त्या रीतीनें वागाविलें तरी हरकत नाहीं अशा विचारांत लोकांवर जुलूम करणें, अन्यायानें त्यांस शिक्षा देणें, त्यांचा हेवा करणें व होईल त्या रीतीनें त्यांचें अकल्याण करून त्यांनां छळण्याचा त्या साहेब लोकांनीं सपाटा चालविला आहे. कित्येक तर आपल्या हुशारीच्या फुशारकीखालींच लोकांनां दंड करितात. कित्येकांचा ब्राह्मणावर मोठा कटाक्ष असतो, कित्येकांचा मुसलमानावर असतो; इंग्लंड देश जरी विद्यामय आहे तरी तो देश सोडून इकडे आलेले लोकांत बहुत लोक [illegible] असतात. पुष्कळांस ठाऊक आहे कीं तिकडचे लोहार, सुतार, माळी, फार तर काय चांभार देखील इकडे येऊन साहेब बनलेले आहेत. असो डाक्टर साहेबांचें कूल मोठें होतें, व वर सांगितलेल्या सध्याच्या इंग्लिश लोकांच्या अवगुणांपासून ते अगदीं अलिप्त होते. हे डाक्टर साहेब युरोपिअन असून आमच्या हिंदुपैकींच एखादा सत्गृहस्थ तर काय परंतु आमचा कोणी तरी आप्त गेल्यासारखें आह्मां

स वाटत आहे. उपाय नाहीं काळापुढें सर्वांची मति खुंटते. वृद्धपणामुळें व व्याधीमुळें अलीकडे त्यांच्या मतीला थोडा भ्रम होत चालला होता असें कोणी ह्मणतात. ते तर गेलेच परंतु आतां सर्व सतूगृहस्थांस आमची इतकीच प्रार्थना आहे कीं. एखादी वर्गणी जमा करून त्यांच्या नांवाचें कांहीं तरी स्मारक कृत्य काढावें. पाहिजे तर सिंक्लेर नावाची बाग करावी अथवा एखादि स्कालरशिप द्यावी अथवा एखादि इमारत बांधावी कसेंही करून या सतूगृहस्थाला त्याच्या पश्चात् त्याच्या सतूगुणाकरितां, त्याच्या सुकीर्तिकरितां, सुस्वभावाकरितां, शक्त्यनुसार सन्मान देणें उचित आहे. डाक्टर सिंक्लेर साहेब संस्कृताचे फार अभिलाषी झाले होते व यामुळें अकोला हायस्कुलांतील मुलांकडून त्यांनीं एक संस्कृत नाटक तयार करविलें होतें याकरितां नाटक शिकविणाऱ्या गृहस्थांची व त्यांच्या विद्यार्थ्यांची आह्मी अशी शिफारस करितों कीं त्यांनीं कसेंही करून हजार कामें एकीकडे टाकून तें नाटक डाक्टरांच्या नावानें करून त्यांचे रिणमुक्त व्हावें. आह्माला तर असें वाटतें कीं डाक्टरांचा त्यावर जीव गुंतला असेल याकरितां सर्वांनीं एक वार कंबर बांधून हें काम उरकावें. व ह्मातान्याचा आशाबंद तोडावा आणि त्यास निरिच्छ परलोकांस सुखानें जाऊं द्यावे अशी आमची इच्छा आहे.

## वऱ्हाड

डा० सिंक्लेर साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर मरण पावले त्यांच्या जागयावर कोणाची नेमणूक होणार तें अजून समजत नाहीं. लोकमुखीं कित्येकांचीं नांवें निघतात. आम्ही शिफारस करितो कीं, रेसिडेंट साहेबांनीं मि० क्यांडी साहेब जे येथें मागें अक्टिंग डायरेक्टर होते त्यांस आतां ही जागा कायमची द्यावी. त्यांनीं येथें सुमार दोन वर्षे काम केलें, तितक्या कालांत त्यांची कामाची शैली, भारदस्तपणा, शांतता, इत्यादि गुण चांगले प्रसिध्धीस आलेले आहेत. शिवाय त्यांस दोन वर्षांच्या कामाचा अनुभवही आहे. आणि विद्याखात्यासारख्या थोर खात्यास वास्तवीक मनाचा थोर असाच मनुष्य निवडला पाहिजे इत्यादि कारणांवरून रेसिडेंट साहेब क्यांडी साहेबांस डायरेक्टरची जागा देतील तर फार चांगलें होईल. ते प्रस्तुत विलायतेस गेले आहेत तरी त्यांची नेमणूक करून त्यांस कळविली असतां ते परतही लवकर येतील असें वाटतें.

उमरावती जिल्ह्यांतील मोर्शीचे तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर यांची उमरावतीस बदली केली आहे व त्यांचे जागेवर चांदूरचे रा. रा. वामन नारायण बापट यांस पाठविलें आहे. मोर्शीहून भास्कर पंत यांची बदली करण्यांत सरकारचा हेतु असा ऐकण्यांत येतो कीं, त्या तालुक्यांत एके गावीं पोळ्याचे प्रसंगीं बैल पुढें जाण्याच्या प्रसंगांत कांहीं लोकांची गर्दी झाली व दंगा वगैरे होईल असें दिसून आलें सबब गैरकायद्याची मंडळी ह्मणून त्यांनीं काही लोक पकडले व त्यांवर मुकद्दमा करण्याची परमाणगी वरिष्ठांस मागितली पण ती मिळाली नाहीं व त्यांस सोडून द्यावे असा हुकूम झाला. पुढें त्या मंडळींतील कोणीं पुढारी गृहस्थांनीं भास्करपंत यांजवर फिर्याद केली कीं, यांणीं आह्मास मारिलें आहे; पण त्याचा पुरावा ते तालुक्यांत आहेत तर आह्माकडून होणार नाहीं. याजकरितां त्यांस सस्पिंड केलें किंवा त्यांस बदललें तर आम्ही पुरावा करूं. त्यावरून त्यास पुरावा करितां यावा व खरी गोष्ट बाहेर निघावी या हेतूनें भास्करपंत यांची उमरावतीस बदली केली आहे. आतां त्या चौकशींत काय निष्पन्न होतें पहावें. डिपुटी कमिशनर साहेबांनीं अर्जदारांविषयीं चांगली खात्री करून घेतली आहे किंवा नाही हें आह्मांस माहित नाहीं, पण ती घेतली असेल तर बरी; नाहींपेक्षां एवढ्या मोठ्या अंमलदाराचे अब्रूला यःकश्चित सामान्य मनुष्याचे शद्बावर भरवसा ठेविल्यानें दोष लागणार आहे. आतां साक्षी घ्यावयाच्या त्याही फार बारकाव्यानें व तहशिलदाराचे समक्ष त्यांस प्रतिपक्ष करतां येईल अशा रीतीनें घेतल्या पाहिजेत असें आमचें मत आहे. असो. या प्रकरणाविषयीं अधिक माहिती मिळाली ह्मणजे आम्ही लिहूं.

येथील नाजर प्रकरणाचा निकाल कधीं होईल तो होऊ. सरकारी रकम फार मोठी खाड्यांत पडल्यामुळें संशयाचा धागा जिकडे जाईल तिकडे तिकडे तपास व धरपकड सुरू होती. या आठवड्यांत मैलकापुरास कांहीं वकील लोकांचे वगैरे झाडे घेतले व त्यांत मिळालेले दागिने वगैरे अडकविले आहेत असें ऐकतो. चौकशींअतीं काय ठरेल तें पुढें कळेल—कित्येक खात्यांतून सरक्युलरही झालें आहे कीं नाजराचे आप्त सोयरे कोण कोण कोठें आहेत तें कळवावें—नाजराच्या मामानें शेती वगैरे आपली आहे ती जप्तींतून परत मिळावी ह्मणून अर्ज केला होता त्यावरून चौकशी होऊन ती तूर्त त्याच्या स्वाधीन केली आहे पण स्थावर माल वकील तीचे बैल यांची हुकूम दुसरा होई पर्यंत गहाण विक्री वगैरे प्रकारची कांहीं व्यवस्था करूं नये असा त्यांस हुकूम दिला आहे असें ऐकतों— अकोल्याच्या कांहीं वकील मंडळींनीं उमरावतीस एक विनंतीपत्र पाठविलें होतें कीं नाजर हा भला व दातारा मनुष्य कैदेंत गेला व तो जातीचा ब्राह्मण आहे याजकरितां दंडाचे पैसे भरण्याचे कामीं त्याला सर्वांनीं धर्म ह्मणून मदत करावी. पण त्या पत्राचें कांहीं फल झालें नाहीं असें समजतें. त्या प्रयत्नाचें स्वरूपच तसें व उपहास्पद होतें. अस्तु. लोक दृष्टींत नाजराची संपत्ती मोठी होती ह्मणून नाजरानें स्वतां किंवा त्याच्या इच्छेवरून दुसऱ्यांनीं त्याच्या घरची मोलवान जंगम माल मिळकत लांबविली असा सरकारास व दुसरे कित्येक लोकांस फार संशय आहे व त्या बाबदींत खरें काय असेल तें समजत नाहीं पण बऱ्याच काला मागें त्यानें आपल्या बायका मुलांच्या आंगावरील दागिनें देखील सावकाराकडे गहाण टाकलेले आहेत तेव्हां इतके पैसे सरकारचे चोरून कोणी आपले हजार पांचशांचे देखील दागिने गहाण टाकून बायकांस लंकेच्या पार्वती करून ठेवील असें ही संभवत नाहीं. तेव्हां त्याचा अफाट खर्च होता. उपाध्याय, शास्त्री, भटजी, पुराणिक यांच्या टोळ्याच्या टोळ्या त्यांकडे येत होत्या त्यांनीं "विप्रप्रसादाध्धरणीधरोहं, विप्रप्रसादात्कमलावरोहं" इत्यादि ईश्वरोक्ति त्यांस सांगून व "धनकनक समृध्धि रस्तु" "मनकामनासिध्धिरस्तु" इत्यादि आशीर्वाद देऊन त्यांच्या चोरीच्या पैशाचा फडशा पाडला. घरांतही कोणी आवरतें नाहीं, मुलगे बडोदेशाई वैभवानें सजलेले, पाहिजे तसला पोशाक, पाहिजे तसलें वाहन, पाहिजे तसले पंचपक्वान्नांचें भोजन इत्यादि चैनींत निमग्न होते, तसेंच पाहिजेत तितके गडी, ब्राह्मण, आचारी, पाणके, शेतें- मळे, ४० जनावरें इत्यादि वैभवाचा थाट पाहिला ह्मणजे नाजरानें १९००० रुपये इतकीं वर्षे पुरविले ही गोष्ठी काटकसरच ह्मणावयाची व अशा खर्चानें वऱ्हाडचा लक्षावधि रुपयांचा खजिनाही फस्त व्हावयाचा असें कित्येक लोक ह्मणतात आणि त्याविषयीं विचार केला तर त्यांतील बराच भाग तथ्य दिसतो; आणि तसें असेल तर नाजरानें किंवा त्यच्या माणसांनीं विशेषशी मालमिळकत पळविली असेल असें संभवत नाहीं हाही प्रकार विचारणीय आहे. सबबउगीच संशयावरून पाहिजे तेथें पाहिजे त्या भल्या मनुष्याच्या घरावर वारंट न्यावें व त्यांच्या बायकामुलांचे दागिने वगैरे चौकशींत आणावे किंवा नाहीं या गोष्टीचा फार जपून विचार केला पाहिजे—रा. विनायक माहादेव गाडगीळ असिस्टंट कमिशनरचे शिरस्तेदार यांच्या बायकोस पर्वां कोर्टांत साक्षीकरितां नेलें होतें यावरून असे प्रसंग येण्याचे कामीं लोकांस फार वाईट वाटत आहे. सबब सरकारी अधिकाऱ्यांनीं शांततेनें व योग्य मर्यादेनें या चौकशीचें काम चालवावें अशी लोकांची इच्छा आहे.

इंदुराहून आह्मांस एक पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं रा. रा. पांडुरंग गोविंद व देवराव विनायक एथील वकील तेथें रजेंत गेले होते. त्यांची होळकर महाराजांनीं आदर पूर्वक भेट घेतली व पांडुरंगपंत यांस एक शालजोडी व पागोटें असा पोशाग दिला हें ऐकून आह्मांस संतोष होतो. देवराव यांसही मागें पोशाग मिळाल्याची गोष्ट आमचे वाचकांस ठाऊक असेल.

रा० मोहनीराज गोविंद जळगावचे माजी नायब तहशिलदार याविषयीं कांहीं अनुकूळ विच्यार रेसिडेंट साहेबांकडे होणार होता तो न होऊन त्याची बरतर्फीच मंजूर झाली असें समजतें. आतां रा. गणेश गोपाळ रिकार्डकीपर हे खामगावास नायब तहशिलदारीवर जातील. मोहनीराज यांनीं वकिलीची परीक्षा पास झालेली आहे सबब ते वकिली करणार अशी वार्ता आहे.

क्या० एफ डब्ल्यु ग्रांट उमरावतीचे स्मालकाज कोर्टाचे जडज हे सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर होते त्यांस एप्रिल महिन्याच्या ९ वे तारखेपासून फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर केलें असें हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

दस्तुर होसंगजी जामासजी आमचे दस्तुर वहिमनजी साहेबांचे बंधू यांस पुण्यास डेकनकालेजांत एतद्देशीय भाषांचे असिस्टंट प्रोफेसर नेमिलें असें कळतें.

या आठवड्यांत कारंजाहून कोणी टाइम्स आफ इंडिया यास पत्र लिहिलें आहे त्यांत तें शहर मोठें आहे, तेथील व्यापार चांगला आहे, दळण वळणाच्या सोयी उत्तम आहेत, निर्वाहोपयोगी पदार्थ स्वस्त आहेत, मुंबईच्या खर्चाच्या तिजाई खर्चांत तेथें चांगला निर्वाह होतो वगैरे गोष्टी लिहून त्या सर्वांस कारणें मि० अब्दुल हक्क तेथील अधिकारी यांची हुशारी व कुलीनता आणि सरकारानें केलेली त्यांची नेमणूक हीं दाखविलीं आहेत- वाः ! आमच्या एतद्देशीय पत्रांसच कां हसावें ? शेखमिरा आणि गोकुळअष्टमी यांचा संबंध दाखविणारे किंवा एकाद्यास हरभऱ्याचे झाडावर चढविणारे, असे गृहस्थ इंग्रजी पत्राचेही लिहिणारे असतात ! अस्तु. यांत आम्ही अब्दुल हक्क यांची निंदा करितो असा अर्थ नाहीं. फक्त तें पत्र लिहिणाराच्या कल्पनांचा आह्मास चमत्कार वाटला, बाकी आमचे हक्क साहेब हुशार आहेत व योग्य आहेत याविषयीं कोणास भ्रांति नाहीं.

मि० रेंडल साहेब यांस बुलढाण्यास पुन्हा लोकलफंड इंजिनियर नेमिलें. व आपणास गैर कायदा अटक केली ह्मणून डिपुटी कमिशनर साहेबावर त्यांनीं फिर्याद केली आहे अशी टाइम्स पत्रास कोणी खबर लिहिली आहे पण ती अगदी खोटी आहे. व रेंडल साहेबाचा मुकद्दमा सेशन कमिट झाला आहे आणि या महिन्याची १९ वी तारीख त्यांच्या चौकशीसाठीं अकोल्यास नेमिली आहे असें समजतें.

## वर्तमानसार

मुंबईस सबार्डिनेट माजिस्त्रेटची परिक्षा झाली तींत ३८ गृहस्थ पास झाले.

पुण्यस डब्ल्यु एच न्यूनहाम साहेब जडज नेमिले.

गिल क्रिस्त स्कालर शिपा हिंदुस्थानांत प्रति वर्षी दोन असतात त्या दोन्ही या वर्षी मुंबईच्या एलफिनस्तन कालेजांतल्या विद्यार्थ्यांस मिळाल्या त्यांची नांवें दौलतराम देसायी आणि कावसजी बादशा. ही स्कालरशिप विलायतेस जाऊन ५ वर्षे विद्याभ्यास करावयासाठीं असते. दरसाल १००० रुपये व जाण्या येण्याचा खर्च २००० रुपये विद्यार्थ्यास मिळत असतो.

मद्रास इलाख्यांत बंगलोरकडे गेल्या आठवड्यांत दोन मोठाले पाऊस पडले.

हिमालय पर्वताची मोजणी करण्याचा विच्यार झाला आहे.

सुरतेस कलाकौशल्याचे धंदे शिकविण्याची एक शाळा सरकार स्थापन करणार असें समजतें.

गवरनर जनरल साहेब बाहेर फिरताहेत ते आतां प्रिन्स आफ वेल्स येणार त्यांचे तयारी करितां कलकत्यास येणार.

नवरोजखान यांणीं अमीरांशीं तंटा चालीवला आहे आणि याजमुळें काबूलचा रस्ता बंद पडला आहे.

पेशावरची भयंकर आग ता० १६ रोजीं दोन प्रहरीं विझाली. ती सारखी साठ तास भडकलेली होती. मालमत्तेचा अतिशय नाश झाला आहे.

त्रावणकोरमध्यें काफीवरची जकात तारीख १३ पासून बंद झाली असें समजतें.

श्री. मल्हारराव यांची कन्या कमाबाई साहेब ह्या आपले डागडागिने परत देण्याविषयीं गवरनर जनरल साहेबांस अर्ज करणार आहेत.

---

## वर्त्तमानपत्रें व सरकार यांचा संबंध

फ्रेंड आफ इंडियाची एंकदर कचीरींतील व बाहेरील हकीकत कळलेली नाहीं; तथापि त्या पत्राच्या ता. २२ मेच्या अंकांत व त्या पत्राची सांप्रतची सवत आमचे एतद्देशीय आजपर्यंत योग्यता संपादिलेलें हिंदुपेट्रियट या पत्राच्या ता. २४ च्या अंकांत आलेल्या मजकुरावरून जें थोडें बहुत कळतें तें आह्मी आपल्या वाचकांस कळवितों. फ्रेंड ह्मणतात कीं, त्या पत्राचे कर्ते मि. मार्शमन यांस सरकारांतून पगारच होता व ते लोकांस सरकारी बातम्या आपल्या पत्रद्वारें लवकर कळवीत असत; परंतु त्यांच्या स्वातंत्र्यास कोणत्याही प्रकारें अडचण नव्हती. आतां याजवरून सरकार पगार देत होतें आणि मि. मार्शमन हे ख्रिस्ती गृहस्थ तो घेत असत हें उघड झालें. कामाचा प्रकार ते पत्रकर्ते नीटसा सांगत नाहींत; परंतु पेट्रियटकर्ते सांगतात कीं, मि० मार्शमन यांनीं सरकारचें करणें बरें असो अगर वाईट असो त्यास पुष्टीकरण देऊन ज्या लोकांनीं श्रम करून मिळविलेल्या पैशापैकीं घेतलेल्या करांच्या पैशांतून त्यांस पगार मिळत होता त्या नेटिव लोकांची निंदा करून त्यांस अपशब्द बोलण्याचें काम प्रति आठवड्यास चालविलें होतें. मार्शमन साहेबांस लिहिण्याच्या कामांत स्वातंत्र्य होतें तें सरकारसंबंधीं कमी जास्त लिहिण्याच्या कामीं नव्हतें. फक्त एतद्देशीय लोकांस मात्र शिव्या देण्याच्या कामांत स्वातंत्र्य होतें असें पेट्रियटकर्ते ह्मणतात.

दुसरी अशी गोष्ट आहे कीं, आलीकडे एकुणीस वर्षें फ्रेंड आफ इंडियापत्रास वर्षास आठ हजार रु० ची मदत हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची हकीकत ह्मणून दर वर्षास ते पत्रकर्ते पुस्तक काढीत असत त्याजबद्दल सरकारांतून मिळत असे. ही नेमणूक अथवा मदत सरकारानें कां व कधीं दिली हें फ्रेंडच्या लिहिण्यावरून समजत नाहीं; परंतु पेट्रियटकर्ते त्याचें कारण सांगतात कीं, मि. टौनसेंड, फ्रेंड आफ इंडियाचे लार्ड डालहौसीच्या वेळचे कर्ते, यांनीं डालहौसी साहेबांचा राज्यें वगैरे खालसा करण्याचा क्रम उत्तम व योग्य आहे असें सारखें प्रतिपादन करून अतिशय साह्य केलें. या मदतीबद्दल डालहौसी साहेबांनीं विलायतेस जाण्याच्या वेळीं ही नेमणूक चालू करून दिली. याप्रमाणें प्रथम पगारानें, नंतर नेमणुकीनें फ्रेंड आफ इंडिया हें या देशांतील मुख्य पत्र आपल्या तर्फेनें बांधून ठेविलें होतें. ही मदत आलीकडे बंद झाली व सरकारचा व त्या वर्त्तमानपत्राचा बेबनाव झाला.

याखेरीज आणखीही कांहीं उदाहरणें सरकारच्या वर्तमानपत्रांच्या सोडबांधणीच्या कमाचीं समजण्यांत येतात. आमच्या इकडे नैट साहेब इंडियन इकानामिस्ट हे पत्र काढूं लागले त्यांत जमिनीच्या संबंधाच्या सरकारच्या कृतींची स्तुति होत असल्यामुळें त्या पत्राच्या आठेंशें प्रती सरकार घेत असे. पुढें नैट साहेबांस बंगाल सरकाराकडे असिस्टंट सेक्रेटरीची जागा दिली आणि तें पत्रही चालविण्यास मोकळीक दिली होती. लार्डमेयो यांच्या कारकीर्दींत पायानियर हें पत्र अलाहाबादेस निघालें. त्या पत्राचे एडिटरचें काम चालविण्यास मि. गर्डलस्टन या सिविल सर्वंटास मोकळीक दिली होती. सारांश सरकारतर्फे लिहिण्यास सरकारी कामगारांस मोकळीक असून त्या विरुद्ध लिहिणारांस बंदी आहे असें समजतें. इंडियन अब्झर्वर पत्र प्रथम सिविलियन लोकांनींच चालविलें; परंतु त्यांत कमीजास्त मजकूर येऊं लागले तेव्हां त्यांस ताकीद होऊन सर्वांस लिहिणें सोडून द्यावें लागलें. याच पत्रास बंगालचे माजी लेफ्टेनंट गवर्नर सर जार्ज क्यांबेल लिहीत असत; परंतु त्यांत हिंदुस्थान सरकाराविरुद्ध मजकूर येऊं लागला त्यावरून त्या सरकाराकडून क्यांबेल साहेबांस तंबी पोंचून त्यांस लिहिणें सोडून द्यावें लागलें. असो, याप्रमाणें एतद्देशीय वर्त्तमानपत्रांच्या संबंधाच्या हेतूविषयीं आतां संशय उत्पन्न होतो. वायव्य प्रांतांतील वगैरे उत्तरेकडील प्रदेशांतील एतद्देशीय वर्त्तमानपत्रास कितीएक पत्रांच्या नियमित बऱ्याच पुष्कळ प्रति घेण्याचा सरकारचा क्रम आहे. यानमुळें सरकारच्या संबधानें त्यांचें तोंड बंद आहे असी वदंता आहे आतां हिंदुपेट्रियट आमच्या एतद्देशीय पत्रांमध्यें जें पहिलें पत्र त्याचे कर्ते बाबू क्रिस्तदासपाल यांस बंगालच्या कायदेकौन्सिलचे सभासद व कलकत्याचे आनररी माजि० नेमिलें आहे. तेव्हां याचा हेतुही कदाचित असाच असेल. पेट्रियटच्या लिहिण्यांतही कांहीं मऊपणा व लार्ड नार्थब्रूक व सर रिचर्ड टेंपल यांची विशेष स्तुति हीं दृष्टींस पडतात हें त्याच कारणांनीं कीं काय कोण जाणें. सारांश हें आमच्या सरकारचें व त्याच्या कामगारांचें कृत्य किती स्तुत्य आहे याचा जग विचार करीलच. विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. इं. प्र.

---

## इंजग्रलोकांची न्यायदृष्टी.

सनदी नोकरीविषयीं आलीकडेस वर्तमानपत्रद्वारा बरीच चर्चा चालली आहे हें वाचकांच्या लक्षांत असेचल. या नोकरीच्या जागा एतद्देशीय लोकांस लवकर न मिळाव्या ह्मणून हरतऱ्हेचे उपाय योजले जाताहेत. अर्थीनियम नावाच्या विलायती पत्रांत लिहिलेली बातमी खरी असेल तर ही परीक्षा हिंदु लोकांच्या संबंधानें लवकरच बंद होईल असें दिसतें. या परिक्षेस जाण्याची बंदी झाली ह्मणजे परिक्षेंत उतरल्याचा हक्क न रहातां सदरील प्रकारची नोकरी हिंदु लोकांस देणें न देणें केवळ हिंदुस्थान सरकारच्या मर्जीवर राहील. एतद्देशीय लोकांची सिव्हिल सर्व्हिसची परिक्षा न घेतां त्यांस या जागा इकडचे इकडेस देतां याव्या ह्मणून नवीन नियम तयार करून हिंदुस्थान सरकारानें विलायत सरकारचे मान्यतेकरितां तिकडेस पाठविले आहेत. परंतु हे नियम लवकर अमलांत न येण्याचा संभव आहे असें मागील एका तारेवरून समजतें हे नियम पास होऊन नेटिव लोकांस जागा मिळूं लागण्यास आणखी किती हरकती येतील त्या येवोत. हें एक इंग्रज लोकांच्या न्यायदृष्टीचें उदाहरण आहे.

इंग्लिश लोकांच्या न्यायदृष्टीचें दुसरें उदाहरण असें कीं बाबू सत्येंद्रनाथ टागोर यांची सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा उतरल्याबराबर संस्कृत व आरबी या दोन भाषा ग्रीक भाषेइतक्या कठीण असूनही या उभय भाषांचे गुण, ग्रीक व लातिन या दोन भाषांच्या निमेनीम केले. या मुळें परिक्षेच्या समयीं इंग्रज लोक ग्रीक व लातिन भाषा घेत असल्यानें त्यांस भरपूर गुण मिळण्याचा संभव आहे परंतु एतद्देशीय परिक्षेस जाणारांस संस्कृताबद्दल मिळाल्यास निमेच गुण मिळावयाचे हा भाषांचा न्याय झाला. आतां वयाचाही अशाच तऱ्हेचा न्याय होईल असें दिसत आहे. परिक्षेस जाण्याकारितां पूर्वीं २३ वर्षांची यत्ता होती परंतु बाबू सत्येंद्रनाथ उतरल्याबराबर तेविसांची यत्ता मोडून एकाविसांची झाली. याही अडचणींतून पार पडून आमचे कांहीं लोक या परिक्षेंत उतरले व उतरताहेत.

हिंदु लोकांचा या परिक्षेस जाण्याचा हक्क बंद करण्याचें ठरत आहे. असें करण्याचें कारण हें कीं ज्या लोकांस केवळ पाठाशक्ति आहे व तेणेंकरून ते लोक परिक्षेंत उतरतात अशांस सनदी नोकरीच्या जागा न देतां जे हिंदु लोक अब्रूदार आहेत व ज्यांस कामकाजाचा वगैरे अनुभव आहे अशांस परीक्षा घेतल्याशिवाय या जागा द्यावयाच्या आहेत. दुसरें अर्थेनियमपत्रानें असें लिहिलें आहे कीं हिंदु लोकांचीं वयें समजण्यास साधन काय त्या त्यांच्या जन्मपत्रिका असतात व या पत्रिकांत वयाच्या संबंधानें कांहीं अविचारी हिंदु लोकांच्या हातून फेरफार होण्याचा संभव आहे. अर्थेनियमपत्रांत आणखी असें लिहिलें आहे कीं या परिक्षेच्या संबंधानें फक्त इंग्लिश लोकांच्या वयाची यत्ता एकदम पंचवीस वर्षांपावेतों वाढविणार. परंतु ही परीक्षा इंग्लिश लोकांच्या संबंधानेंही पुढें थोडेच दिवसांनीं बंद होणार ह्मणून समजतें. इंग्लिश लोकांच्या संबंधानें ही परीक्षा बंद झाल्यावर पुढें विलायतेंतील आक्सफर्ड व केंब्रीज या दोन विद्यालयांत ज्यांनीं विद्याभ्यास करून पदव्या मिळविल्या आहेत अशा इंग्रज लोकांस या जागा द्यावयाचा विचार होत आहे. सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेस सर्वांस जाण्याची मोकळीक होण्यापूर्वीं उमेदवार पसंत करून अथवा कंपनी सरकारची जो विलायतेस मोठी सभा असे त्या सभेच्या सभासदांच्या नातेवाइकांस या जागा देण्याची वहिवाट होती. परंतु या वहिवाटीपासून हवीं तशीं माणसें मिळत नाहींत असा फार बोभाट झाल्यावरून ती वहिवाट काढून टाकून या नोकऱ्या देण्याकरितां सर्वांस या परिक्षेस जाण्याची परवानगी दिली. आतां या परिक्षेपासून सुद्धां चांगले लोक मिळत नाहींत असा फार बोभाट झाल्यावरून हाही क्रम बंद होण्याचें घाटत आहे व थोड्याच दिवसांत तसें होण्याचा संभव दिसत आहे. शिफारस झालेल्या लोकांस या नोकऱ्या देण्याचा पुनः उपक्रम करण्याचा कदाचित् भावी विचार असावा. मि० ग्रांट डफ हिंदुस्थानचे माजी अंडर सेक्रेटरी आफ स्टेट यांच्या मताप्रमाणें सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेंत जे उमेदवार उतरतात ते फार हुशार व सुशिक्षित असतात व ही परीक्षा काढून टाकण्यास त्यांचें अनुमत नाहीं.

वर सांगितल्याप्रकारची वाटाघाट विलायतेस चालू आहे. अखेर निकाल काय होईल तें समजत नाहीं. परंतु या बाबतींतील हल्लींच्या रोंखावरून या परिक्षेस हिंदु लोकांस जाण्याची बंदी होण्याचा संभव दिसत आहे. असें झालें ह्मणजे दरसाल या परिक्षेंत जे एक दोन नेटिव हल्लीं उतरत आहेत ते पास होण्याचे बंद होऊन सनदी नोकरी मिळणें केवळ हिंदुस्थान सरकारच्या मर्जीवर राहील. सनदी नोकरी देण्याचें हिंदुस्थान सरकारचे स्वाधीन झालें ह्मणजे त्या नोकऱ्या किती लोकांस मिळतील याचा अनुभव आजपर्यंत आला नाहीं असें नाहीं. या नोकऱ्या नेटिव लोकांस देण्यास हरकत नाहीं असा ठराव सन १८३३ सांत झाला आहे. हा ठराव झाल्यापासून सनदी नोकऱ्या किती लोकांस मिळाल्या आहेत हें सर्वांस माहित आहे. नेटिव लोकांना सनदी नोकरीच्या परिक्षेस जाण्याचें बंद झालें ह्मणजे पुढेंही असेंच होण्याचा संभव आहे. व असें झालें असतां इंग्रज सरकारचा न्यायदृष्टीचा हा उत्तमप्रकारचा मासला सर्वांच्या नजरेस येणार आहे. ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव नाजाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १३ माहे जून सन १८७५ इ० अंक २४


## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे.

NOTICE.

### नोटिस.

CLOSING OF THE WARDHA VALLEY (STATE) RAILWAY.

**वर्धाव्ह्याली स्टेट रेलवे बंद करण्याविषयीं**

या नोटिशी अन्वये जाहीर करण्यांत येतें कीं सरकारच्या हुकुमावरून येत्या तारीख १६ जून सन १८७५ इसवी रोजीं व त्या नंतर पुढें नोटिस देण्यांत येईपर्यंत वर्धाव्ह्याली स्टेट रेलवे बंद ठेवण्यांत येईल.

सदरीं लिहिले कारणाबद्दल ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवेवरील हिंगणघाट सोनाईगाव व वर्धा या स्टेशनांचे दरम्यान येत्या जूनच्या १५ वे तारखेनंतर पुढें गाडी जाण्यायेण्याचे बंद होईल. वर्धा व हिंगणघाट या दोन स्टेशनांचे दरम्यानचे केनीच्या संबंधानें उतारूं व माल पाठविण्याबद्दल जी व्यवस्था करण्यांत आली आहे ती व नोटिशी देण्यांत आल्या आहेत त्या सर्व तारीख १६ जून रोजीं व त्या नंतर पुढें रद्द करण्यांत आल्या आहेत.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता० २६ माहे मे सन १८७५ इसवी.

## जाहिरात.

अकोले एथील व बाहेर गावचे सर्व साहू उदमी व्यापारी व इतर लोकांस खालीं सही करणाराकडून कळविण्यांत येते कीं छितरमल रामनारायण किसनदयाळ या नावची अकोल्यास दुकान आहे तिजकडे आमची पुष्कळ बाकी येणें थकल्यावरून मुंबई मुकामीं आम्ही त्या दुकानावर फिर्याद केली आहे. तिचा फैसल लवकरच होईल. परंतु हल्लीं सदर्हू दुकानदार आपले मालमिळकतीची कांहीं गैर व्यवस्था करून आम्हास फसविणार अशी खबर आहे याजकरितां सदर्हू इसम आपला माल कोणास गहाण, विकत, बक्षीस, अगर दान देतील किंवा छपविण्याकरितां कोणाकडे ठेवितील तर तो त्यांनीं घेऊं नये घेतला असतां त्यावर फौजदारी कायद्याचा पेंच येईल म्हणून अगाऊ सावध व्हावें करितां जाहिरखबर दिली आहे. कळावें तारीख ९ माहे जून सन १८७५ इसवी.

(सही) रामभगतजी जोखीराम
मारवाडी दस्तुर चतुर्भूज
दुकान मुंबई
व अकोला

## नोटिस.

नोटिस — छितरमल रामनारायण किसन दयाळ दुकान अकोला यास रामभगतजी जोखिराम दुकान मुंबई व अकोले यानकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडे आमची खातेबाकी येणें आहे ती तुम्ही न दिल्यामुळें मुंबईचे दुकानावरून तुम्हावर फिर्याद झाली. तिचा फैसल थोडेच दिवसांत होईल. परंतु तुम्हास फिर्यादीची खबर समजल्यावरून तुम्ही आमचें नुकसान व्हावें व आम्हास कांहीं मिळू नये याजकरितां दुकानचे जिनगीची लांबवा लांबव करिता व कांहीं जिनगी तुम्हीं कोणास गहाण किंवा विकत अगर बक्षिस देणार आहा असें समजल्यावरून तुम्हास मुद्दाम नोटिस देण्यांत येत आहे कीं तसा प्रकार तुम्ही करू नये. फिर्यादीचे तारखे नंतर जी तुम्ही दुकानचे माल मिळकतीची कम जास्ती व्यवस्था कराल तिजबद्दल तुम्हावर कपटाचा व फसवणुकीचा गुन्हा लागू होईल हें पक्कें समजावें कळावे तारीख ९ माहे जून सन १८७५ इसवी.

(सही) रामभगतजी जोखिराम
मारवाडी दस्तुर चतुर्भूज.
दुकाम मुंबइ
व अकोल

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### मुंबईचा टाऊनहाल आणि पंढरपुरचा विठोबा.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

विनंती विशेष मुंबई आणि पंढरपूर हीं दोन शहरें मोठीं क्षेत्रें आहेत असें म्हणण्यास चिंता नाहीं. इतकेंच कीं, एक ऐहिक सुख देणारें आहे व दुसरें पारमार्थिक सुख देणारें आहे. यांची थोडक्यांत तुलना अशी:—दोन्ही क्षेत्रांत मोठी यात्रा भरत असते. पुणें, सातारा, कोल्हापुर, बेळगाव, धारवाड, सुरत, या प्रमाणेंच अकोला, उमरावती या ठिकाणाहून प्रतिवर्षीं यात्रेकरितां पुष्कळ भक्तिमान लोक जातात. यात्रेचा साधारण काळ नोवेंबर महिना होय, जो आपल्या पंचांगाप्रमाणें कार्तिकाशीं पटतो. यात्रेचा भर दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यांत असतो. अशा समयीं यात्रेकरूंचे थवेच्या थवे आपापल्या कर्मांत अगदी दंग होऊन गेलेले असतात. एके ठिकाणीं यात्रेकरू फार नमून पाप होऊं लागलें कीं, आईसाहेब आपला हात फिरवून त्यांची संख्या तेव्हांच माफक करून टाकितात दुसरे ठिकाणीं परीक्षक आठवेच दिवशीं बारांचे तीनशें करितात. पंढरपुर येथें बडव्यांचें वर्चस्व, मुंबईत परीक्षकांचें. भक्तांची दाटी झाल्यावर विठोबास अशी काळजी पडते कीं इतक्या भक्तांस संसारमुक्त करून स्वर्गांत ठेऊं तरी कोठें? इकडे परिक्षकास असें वाटत असतें कीं, इतके लोक पसंत करून त्यांस जागा तरी कोठच्या द्याव्या. एके ठिकाणचे यात्रेकरू संसारमुक्त होऊन 'वर' ( स्वर्गीं ) जाऊं इच्छितात, दुसऱ्या ठिकाणचे परीक्षेंत पसंत होऊन 'वर' कालेजांत जाऊं इच्छितात. कित्येक भक्त असे निग्रही असतात कीं, मनोरथसिद्धि झाल्याशिवाय वाऱ्या करणें सोडावयाचेंच नाहीं. आतां परीक्षकांच्या हृदयांत प्रवेश करून परम भक्तिमान यात्रेकरूंची इच्छा पुरविणार सर्वशक्तिमान एक जगदात्मा आहे. व त्याच्या कृपेशिवाय एक पानही हलावयाचें नाहीं. अस्तु· अशाप्रकारचे यात्रेकरूंपैकीं १ सध्या वऱ्हाडांतील मुख्य जिल्ह्याच्या ठिकाणीं रहात असतो. तीन वेळा तो मुंबईच्या यात्रेला गेला परंतु त्याला अजून देव प्रसन्न झाला नाहीं. परंतु देवास थोडी त्याची करुणा आली. व त्यानें परवा पुण्यांत त्याच्या एका कामांत त्याला अल्पयश दिलें. तेवढ्या जयाच्या ऐटीवर मराठी भाषा लिहावी तर मीच, भाषण करावें तर माझ्या सारख्यानेंच अशा फुशारकी खालीं कोणाची भाषणें पोरकट, कोणाचीं उद्दाम आणि कोणाची हास्योत्पादक याप्रमाणें टीका करीत सुटला आहे. पण अशा गुणाचें फळ त्याला भोगावें लागेल. परमेश्वराचा कोप होईल, व कपाळचे खेटे कधीं चुकणार नाहींत. व असें झाल्यानें त्याला संताप येऊन लोकांस तोंड दाखवूं नये असें वाटेल. मी कबूल करितो कीं त्याला मराठी भाषा चांगली लिहितां येते पण त्या गुणाचा त्यानें असा उपयोग करूं नये, लोकोपयोगाकरितां पाहिजे तर एखादा नवा ग्रंथ लिहावा. अथवा दुसरें एखादें कांहीं काम करावें. आपल्या एका पत्रीं " शुभ्र वेशधारी" इत्यादि एका पुरुषाचें वर्णन केलें होतें व ज्या कृत्याला या यात्रेकरूनें बरें म्हटलें तेंच कृत्य करण्याविषयीं ते गृहस्थ पुढारी होते अशाबद्दल त्यानें त्यास दोष लाविला होता व ज्या सत्‌गृहस्थांना ती गोष्ट रुचली नाहीं त्यांना" त्यांचे माथें विद्येनें जड झालें असावें" अशा प्रकारें त्यानें कोटी काढली. परंतु मला मोठा चमत्कार वाटतो कीं तो येवढा ज्ञानी असून त्याला असें कसें कळत नाहीं कीं माझें चरित्र इतकें विस्तीर्ण आहे व माझ्या लीला इतक्या आहेत कीं एखादा त्यांचें वर्णन करूं पाहील तर आपल्या पत्राचे चार कालम निदान चार महिने पूर्ण भरून निघतील. त्याला आपलें वास्तविक हित करून घ्यावयाचें असेल तर त्यानें आतांपासून पुढें लोकांवर टीका करण्याचा मार्ग सोडावा आणि येत्या यात्रेची उत्तम रीतीनें तयारी करण्यास लागावें. असें तो करील तर जगदीश त्यास यश देईल.

आमचाही यंदा यात्रेला जाण्याचा बेत आहे. देव काय करील तें पहावें. परंतु महादेवास आमची इतकीच प्रार्थना आहे कीं, त्यानें जे अंत:करणापासून आमच्या यात्रेकरितां आम्हाला तयार करीत आहेत त्यांला यश द्यावें कळावें हे विनती. तारीख ९ माहे जून सन १८७५.

एक
यात्रेकरू.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० माझ्या मनांत सध्या असें आहे कीं आजच्या आपल्या पत्रांत हांजी हांजी करणारांचें थोडेसें खंडन करावें.

पत्रकर्ते महाराज आपल्या हिंदुस्थानांत पुष्कळ राजनिष्ठ पुरुष आहेत पण त्या सर्वांची निष्ठा आमच्या उमरावतींतील अध्याची साहेबांच्या निष्ठेपुढें रद्द असें वाटतें. या अध्याची साहेबानीं राणीच्या जन्म दिवसाकरितां उत्साह करून इंग्रजी भाषेंत तयार करून एक कांबलचक लेक्चर दिलें आणि तें प्रमोदसिंधूंत छापवून आपली राजनिष्ठा जगजाहीर केली त्यांच्या व्याख्यानामधील सर्व विचार वर वर आणि अगदीं पोकळ होते. आतां ते कसे हें थोडक्यांत लिहितों. प्रथम आपण लेक्चर देऊन आपली राजानिष्ठा प्रगट करावी अ

सा त्यांचा हेतूच दिसतो कारण ज्याअर्थीं त्यांचें व्याख्यान छापून प्रसिद्ध झालेलें आहे त्याअर्थीं त्यांनीं तें प्रथम लिहून काढिलें होतें यांत संशय नाहीं. कारण ते बोलत असतां लिहून घेण्यास रा. यशवंत राव प्रमोदसिंधु कर्ते यांजपाशीं शार्ट ह्यान्डरायटर नाहींस व कोणी एकपाठ्याही नाहीं असें आह्मांस ठाऊक आहे. तरमग हें व्याख्यान साहेब लोकांच्या हातीं पडून त्यांना आपण राजनिष्ठ आहों असें वाटावें, व पुढें एखादें असिस्टंट कमिशनरच्या जागेचें संधान आल्यास त्यांणीं ती आपणास द्यावी असा यांतील मतलब असावा. परंतु त्यांनीं असें खूब मनांत ठेवावें कीं अशा थाटानें साहेब लोक भुलावयाचे नाहींत व राजनिष्ठेचा डौल केल्यानें राजनिष्ठता असतेच असें नाहीं. राजनिष्ठ पुरुषांचीं लक्षणें जाहिरनाम्यानें कळवावयास नकोत.

दुसरी गोष्ट अशी कीं, इंग्रज लोक न्यायी आहेत असें सिद्ध करण्याकरितां तेक० निम्बार्ड साहेबांचा दृष्टांत घेतात. पत्रकर्ते, यांनीं असेंच कां केलें असावें बरें? सध्या काम करणाऱ्या वरिष्ठांचें उदाहरण न घेतां इंग्लंडांत व इतर देशांत नांव घेण्यासारिखे पुष्कळ न्यायाधीश आहेत व होऊनही गेले त्यांचीं उदाहरणें घ्यावयास नव्हतीं काय ? पण राव थांबा थांबा क्षणभर, आलें माझे लक्षांत. त्यांनीं असें कां केलें तें. अहो एखाद्या जागे करितां शिफारस करणें कोणाकडे आहे ? निंबाडे साहेबांकडे ना? मग त्यांची स्तुति नको कां करायला ? अलबत केलीच पाहिजे.

तिसरी गोष्ट अशी कीं प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत येणार ह्मणून त्यांनीं आपला आनंद प्रदर्शित केला आणि या चिन्हावरून आमचें कल्याण करण्याविषयीं राणी सरकारची हौस आणि कळकळ आज पर्यंत हिंदुस्थानांतील लोकांस माहीत नव्हती ती समजून देऊन राजनिष्ठ कसें व्हावें तें शिकविलें. वाहवा! किती खान साहेबांचे उपकार ह्मणून सांगू. आतां प्रिन्स आफ वेल्स येणार ह्मणून जिकडे तिकडे गवगवा चालला आहे. मुंबईंतील लोकांनीं असा अजमास काढला आहे कीं, या राजकीय पाहुण्याचें त्याच्या योग्यतेनुरूप आदरातिथ्य करण्यास निदान १॥ लक्ष रुपये लागतील. त्यावर टाइम्स आफ इंडियानें असें मत दिलें आहे कीं सरकाराकडून अर्धा लक्ष रुपये घ्यावे, मुंबईच्या म्युनिसिपाल कमिटीनें अर्धा लक्ष द्यावे व बाकीचे वर्गणी करून किंवा कांहीं दिवस पर्यंत नवीन एखादा कर बसऊन काढावेत. मुंबईच्या म्युनिसिपाल कमिटींतून हे रुपये गेले व लोकांवर कर बसला आणि त्या धांदलींत या आमच्या राजनिष्ठ खान साहेबांचें व्याख्यान त्यांच्या हातांत पडलें कीं मुंबईंतीलच काय पण इतर ठिकाणचे लोक देखील आनंदांत उड्या मारूं लागतील. नाहीं कायहो? हो, हो, असें झालेंच पाहिजे कारण एक तर आमच्या लोकांजवळ पैसा फार झाला आहे आणि तशांत खान साहेबांनीं पढविलेली राजनिष्ठा चमकायला पाहिजे. इंग्लंडांतील प्रजेपेक्षां देखील खान साहेब विशेष राजनिष्ठ खरे कारण तेथील पार्लमेंटांतील कांहीं लोकांनीं राणी साहेबांस लिहून असें सांगितलें कीं प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत जात असतील तर जाऊद्या पण या बाबतींत सरकारी एक पेनी देखील आह्मी देणार नाहीं व हिंदुस्थानांतील लोकांपासून अशाकरितां एक कवडीही घेणार नाहीं. असो असे राजनिष्ठ पुरुष तरी आपल्या पहाण्यांत असावेत.

चवथी गोष्ट अशी कीं बडोद्यातील धामधुमीबद्दल व्हाइसरायास दोष लावणारास ते अविचारी असें ह्मणतात. खरेंच तें. यांच्यासारख्या राजनिष्ठ पुरुषांच्या विचारीपणापुढें इंग्लंडांतील शहाण्या वकिलांचा, पत्रकर्त्यांचा, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील वकिलांचा व इतर पत्रकर्त्यांचा आणि सत्गृहस्थांचा विचारीपणा टिकेल काय? आमची तर केवळ खात्री आहे कीं. एक मिनिटभर देखील टिकणार नाहीं पण तुलना करताहेत असें कळल्याबरोबर हात हिसकून पळून जाईल. पत्रकर्ते, आपण सर्व आहांत कीं नाहीं हे अगदीं सरकाराविरुद्ध भांडणारे, राजावर शस्त्र धरणारे, व सरकाराविरुद्ध मसलती करणारे! तेव्हां अशीं राजनिष्ठरत्नें देवानें निर्माण केलीं आहेत ह्मणून आज आपला बचाव आहे, नाहीं तर आज आपली फटफजीती होऊन गेली असती. परवाच्या प्रमोदसिंधूतील खान साहेबांची राजनिष्ठा पाहून मी तर दोन घटका घाबरा होऊन घेरी येऊन पडलों. अस्तु झालें तें झालें. पण आपले कनिष्ठ बंधू प्रमोदकर्ते व मि० दामले हे इतके खानसाहेबांच्या नादीं कां लागले आहेत कोण जाणे. खानसाहेब अजून काम शिकत आहेत तों इतकी निष्ठा, पुढें काय प्रळयच होईल. पत्रकर्ते, राणीच्या जन्म दिवसाच्या उत्सवाबद्दल आपण दुसरीकडे कोठें फारसें ऐकलें काय? नाहीं आतां आपण तरी खान साहेबांचा उपदेश घेऊन राजनिष्ठ बनूया. ह्मणजे पुढें आपल्याला तरी कोठें एखादी चांगलीशी जागा मिळेल. आपल्या येथील बहुतेक लोकांना व पत्रकर्ते तुह्माला स्वतांला चांगल्या नोकऱ्या लागल्या कीं नाहीं ह्मणजे छापखान्याचा चार्ज द्या माझ्याकडे. असें झाल्यावर लोकल, आर्टिकलें, पत्रव्यवहार वगैरे छापण्याचें सोडून देऊन 'वऱ्हाडसमाचार' या अक्षराच्या खालून पत्राच्या अखेर पर्यंत राजनिष्ठाच मी छापीत बसेन ह्मणजे झालें. अहो पण आपणाला एक गोष्ट विचारायाची आहे मी जर राज निष्ठेची इतकी भरपूर चंगळ केली तर सरकार मला पुढें मागें कोठें अध्याच्याची जागा देईल काय? आतां राजनिष्ठेचें अजीर्ण झाल्यामुळें क्षणभर थांबतो व आपण कृपा केल्यास आपल्या पुढल्या पत्रीं सरकार, प्रजा आणि राजनिष्ठा या संबंधानें एक पत्र लिहीन ह्मणतो. लोभ असावा हे विनंती. तारीख ९ माहे जून सन १८७५ इसवी.

एक
राजनिष्ठ.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुध्ध १० शके १७९७

## युरोपियन लोकांत मुसलमानी धर्माचा स्वीकार.

धर्माची आवड विचित्र आहे. अमुक धर्म चांगला आहे ह्मणून कोणी त्यांत शिरतात व अमुक वाईट आहे ह्मणून तो सोडून देतात असें सर्व गोष्टींत सिद्ध करतां येणार नाहीं, पहा, ख्रिस्तीधर्म फार चांगला आहे व त्याचें अवलंबन सर्व जातीनीं करावें असा आग्रह धरून रात्रंदिवस त्याच्या पुस्तपन्यास झटणारे व उपदेश करणारे हजारों मिशनरी लोक असतां कित्येक युरोपियन लोकही ख्रिस्तीधर्म सोडून मुसलमान होतात, तेव्हां हीच गोष्ट तसा सिद्धांत केला असतां त्यांस बाधक नव्हे काय ? असो. आह्मास वाटतें कीं, ज्या धर्माचें अगत्य शुध्द मनोभावानें व बहुत शोधानें मनुष्यास उत्पन्न होतें तो धर्म त्यास अधिक श्रेयस्कर व तारक होईल; बाकी वायव्य प्रांतांत एका डिपुटी कमिशनरानीं एका मुसलमान स्त्रीच्या आसक्तीनें मुसलमानीधर्म घेतला. तसेंच कित्येक हिंदु पुरता विच्यार व शोध न करिता केवळ बाह्य देखाव्यास भुलून व हिंदु धर्मांतील थोड्या अडचणी टाळण्यास उत्सुक होऊन ख्रिस्ती बनतात व पुढें पाहावें तर त्यांतील कित्येकांचीं आचरणें केवळ अमंगल व लज्जास्पद अशीं असतात, तेव्हां अशांचें धर्मांतर हें शुद्ध मनोभावाचें नव्हे, क्षणिक मोहाचें व फसवणुकीचें होय असें ह्मटल्यावाचून रहावत नाहीं. आतां इतकेंच आहे कीं ख्रिस्ती धर्माचें पोषण करविण्यास भाडेकऱ्यादाखल पगारदार माणसें रस्तोरस्तीं फिरत असतात. व हिंदुधर्माची स्थिति केवळ बेबंद होऊन गेलेली असतां लक्षावधि हिंदु लोक आपले धर्मांतरास प्रवृत्त होत नाहींत ऐवढेंच नाहीं पण रस्त्यावरील उपदेशकांची उलटी टवाळी करित असतात. व हिंदु धर्मांत कोणास घ्यावयाचें नाहीं असा हिंदुधर्मप्रवर्तकांनीं नियम ठेविला आहे ह्मणून तो अतिदुर्मिळ जाणून कोणी त्यावर उड्या घालीत नाहीं. तेव्हां धर्माची स्वस्ताई किंवा महागाई करण्यानें खरें धर्मांतर होतें असें कोणी ह्मणत असतील तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. असो मद्रास इलाख्यांत नुकतेंच चार युरोपियन गृहस्थ मुसलमान झाले त्यांची थोडीशी माहिती कळली आहे ती आह्मी आपले वाचकांस आतां कळवितो.

मे महिन्याच्या ९ वे तारखेस बंगलोर येथें निघाची आगगाडी आली तींतून ४ युरोपियन गृहस्थ उतरले ते थेट एका मशिदींत गेले. तेथील वहाबी जातीचे मुसलमान लोक त्यांची वाट पहात बसले होते व ते गृहस्थ येतांच त्यांनीं त्यांचा मोठा आदरसत्कार केला. व त्यांस मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. या चौघांचीं नांवें व वयें या प्रमाणें होतीं. जे सी क्यांबेल मार्जी क्यापटन उमर ३४ वर्षें, एफ ओनील ऐरिश सेलर उमर २० वर्षें, डब्ल्यु एलडर ऐरिश सेलर उमर २४ वर्षें आणि एफ व्हाईट जर्मन सेलर उमर २० वर्षें. यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारल्यावर यांस नावें दिलीं तीं, महमद अबदुला, अबदुल लतीफ, अबदुला, आणि अबदुल सलाम हे गृहस्थ छावणींतील बाजाराजवळच्या मशिदींत उतरले व हैदराबादेहून एक मौलवी आला आहे त्यानें त्यांस धर्मोपदेश केला. मग ते मुसलमान झाल्याबरोबर कित्येक शिंपी लोक बोलावून आणून मुसलमानी पध्दतीचे पोशाग त्यांकरितां लागलेच तयार केले. यांतील नील नावाचा गृहस्थ ज्यानें अबदुललतीफ हें नाव धारण केलें त्यास " सलाम अलेकुम्" एवढ्या शद्बाशिवाय मुसलमानी भाषेचें किंवा धर्माचें एक अक्षर देखील ठाऊक नाहीं. या चौघांतील दोघे जण मुसलमान झाल्याबरोबर अलसूर येथें गेले व युरेशियन जातीचा एक १५ वर्षांचा टवाळ मुलगा तेथून त्यांनीं बरोबर आणिला व याला मुसलमान करा असें ह्मणूं लागले पण ती गोष्ट त्या मशिदींतल्या प्रमुखांनीं मान्य केली नाहीं; कारण तो मुलगा तेथील म्युनिसिप्यालिटीकडे एक भला गृहस्थ ओव्हरसियर आहे त्याचा होय असें त्यांस ठाऊक होतें व त्याला मुसलमान केलें तर त्याचा बाप आपणावर येऊन पडेल अशी त्यांस दहशत होती. तथापि त्या नवीन बनलेल्या चौघा युरोपियन मुसलमानांनीं त्यास शिखानष्ट केलें ह्मणजे त्याचा श्मश्रु करविला व त्याला मुसलमानी पेहराव दिला. नंतर ते लोक तेथील पकडणींत गेले तेथें कांहीं लोकांनीं त्यांस पैसा जमा करून देण्याचें वचन दिलें होतें व त्या खर्चानें ते मैसुराकडे जाणार होते.

त्यांतील एकाजणाला तुमचें इंग्लिश नाव काय? असें कोणी विचारिलें तेव्हां तो ह्मणाला "आतां त्याची गरज काय? मी आपले नावाला व देशाला आतां विसरलों व महमदाचा खरा भक्त बनलों आहे."

ही गोष्ट घडली त्याच सुमारास मैसुराकडूनही एक युरोपियन नुकताच मुसलमान झालेला बंगलोरास आला. त्याचा वेश फकिराचा होता व त्यानें मैसुरास एका सुस्वरूप मुसलमान स्त्रीशीं लग्नाचा निश्चय केला आहे त्याकरितां पैसे जमविण्यासाठीं तो आला व कोणी कोणी त्याला पैसे दिले.

बंगलोर एक्झामिनर पत्रांत ही गोष्ट लिहिली आहे व तो ह्मणतो कीं हा अविचाराचा प्रकार अधिक प्रबळ होऊं नये ह्मणून सरकारानें यावर चांगली पैरवी ठेवावी व हा प्रकार घडण्याचें कारण तो असें सांगतो कीं, लोकांस धंदे रोजगार नाहींत, व भलेपणानें निर्वाह करण्यास

कांहीं साधन नाहीं याजकरितां लोक असे बहकत चालले आहेत याचा त्यांचे जातवाले इंग्लिश लोकांनी चांगला विचार करावा व असल्या लोकांनां चांगल्या सोयी आणि चांगली विद्या द्यावी म्हणजे असा प्रकार घडणार नाहीं.

## वऱ्हाड

या आठवड्यांत पर्जन्य एक दोनदां पडला पण तेणेंकरून उष्णता कांहीं कमी झाली नाहीं. बाहेरही थोडथोडा पर्जन्य पडून नदीला पाणी येतें पण मोठा पूर येऊन पहिलें पाणी व दुर्गंधी वाहून जाई पर्यंत तें पाणी पिण्याचें उपयोगी नाहीं असें झालेलें आहे. सबब मोठे एक दोन पाऊस पडण्याची फार अवश्यकता आहे. मृग नक्षत्र लागून आठ दिवस होत आले अजून चांगला पाऊस नाहीं व जळगाव, खामगाव, मलकापुर वगैरेकडे थोडा उपद्रव असल्याचीही वार्ता आहे याजकरितां आतां लवकर चांगले पाऊस पडतील तरें बरें होईल.

मि० इलियट साहेब विद्याखात्याचे आफिशियेटिंग डायरेक्टर चिखलदऱ्याहून सोमवारीं येथें आले व शुक्रवारीं रेलवेमार्गे मुंबई बाजूकडे गेले.

रा. रा. माधवराव हरी सहस्त्रबुध्धे उमरावती डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट नाजर प्रकरणांत आपले कांहीं जाब जबाब तयार करण्यासाठीं गेले सोमवारीं येथें आले व शुक्रवारीं परत गेले, व जबाबाचीं टिपणें त्यांनीं येथील फायली वगैरे पाहून तयार केलीं असें समजतें. चिखलदऱ्यासही याच कामाकरितां जुडिशियल कमिशनर साहेबांकडे हे गेले होते असें कळतें. नाजराचे हिशेब वगैरे प्रति महिन्यास पहाण्याचें क्लार्क आफ धि कोर्टचें काम होतें व तें त्यांकडून बरोबर झालें किंवा नाहीं याविषयीं वरिष्ठांकडून आतां त्यांस विच्यारण्यांत आलें आहे असें ह्मणतात.

रा. रा. देवराव जयकृष्ण दारव्याचे तहशिलदार यांस २० दिवसांची रजा दिली.

मि० सि. हार्डर्न साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर रजेवर गेल्याच्या वर्गावर्गीत मि० ताजुदीन हुसेन साहेब सेकंड क्लास आफिशियेटिंग कमिशनर होते ते फर्ष्ट क्लास आफिशीयेटिंग कमिशनर झाले.

नेटिव डाक्टर पुनुस्वामी पिले वाशिमास जाऊन आपले कामावर रुजू झाले.

मि० आर क्रिश्चन साहेब थर्ड क्लास पोलिस सुपरइंटेंडेंट दोन महिन्याचे रजेवर गेले होते ते परत आले व त्यामुळें मि. ...च ए हिथ साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट झाले ले पुन्हा असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट झाले होते ते पुन्हा मि० एन आर कंबरलिग साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट तीन महिन्यांचे रजेवर गेले त्यांचे जागीं आफिशियेटिंग पोलिस सुपरइंटेंडेंट झाले.

सुट्या संपून हायस्कुलें १०वे तारखेस व दिवाणी कोर्टें ११वे तारखेस सुरू झालीं. वकील, मास्तर, न्यायाधीश स्वदेशीं गेले होते ते परत आले.

वणी जिल्ह्यांत एक व वाशीम जिल्ह्यांत एक अशा दोन तहशिलदारीच्या जागा नव्या होणार आहेत त्याकरितां कमिशनर साहेबांकडे सुमार दोडशें अर्ज झाले आहेत असें समजतें. जागा तर दोन आणि अर्ज इतके तेव्हां कमिशनर साहेबांनीं तरी अर्जांचा विच्यार कसा काय करावा!

अडगावचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट या सुटींत हैदराबादेस गेले होते तिकडून येथें येऊन उमरावतीस गेले होते ते पुन्हा अकोल्यास येऊन एक दोन दिवस राहून ९ वे तारखेस रात्रीं अडगावाकडे गेले.

यांच्या कोर्टांतून ६ मुकद्दम्याच्या मिसली गहाळ झाल्या त्यांचा पत्ता लागला नाहीं; अखेर असा ठराव झाला कीं, त्यांच्या कोर्टाला इस्टाब्लिशमेंट कमती असल्यामुळें उमेदवारांकडून कामें घेत असत त्या उमेदवारांच्या निष्काळजीनें अशी गलत झाली. सबब त्यांचे कोर्टाकडे वीस वीस रुपयांचे दोन व पंध्रा पंध्रा रुपयांचे दोन असे च्यार कारकून देण्याचा ठराव झाला व त्याप्रमाणें नेमणुकाही झाल्या; आणि त्या कोर्टाचे शिरस्तेदार व कारकून यांचा पगार, आजवर मिसली शोधून काढण्याचे कामीं अधिक लक्ष्य लागण्याकरितां बंद ठेविला होता तो त्यांचा त्यांस दिला असें समजतें.

तसेंच यांचे कोर्टास जमीच्या कामाकडे आणखी ४ कारकून व इतर कामगिरीकडे अठरा वीस शिपाई देण्याचा विचार झाला आहे.

यांचे कोर्टांत शिलकी काम फार तुमलें असल्याचा बोभाटा होता त्याविषयीं ही त्यांनीं आपली निर्दोषता करून घेतली असें समजतें. सन १८७३ सालीं अडगावास रा. रा. श्रीकृष्ण नरहर एक्स्ट्रा असिस्टंट असतां दाव्याचे फैल ४५०० झालें होतें व त्यां पैकीं त्या सालीं त्यांनीं ४००० फैसल केले व ५०० शिलक राहिली. पुढें सन १८७४ सालीं रा. रा. पुरुषोत्तमराव यांच्या कारकीर्दींत ३७०० फैल झालें व ३६०० फैसल झाले तेव्हां दोन्ही न्यायाधिशानीं काम पुष्कळ केलें व शिलकी मुकद्दम्याचा दोष पुरुषोतमरावांस लागू करण्या माफक नाहीं असें ठरलें. या दोन्ही गोष्टींत पुरुषोत्तमरावांस यश आलें याबद्दल आह्मास संतोष वाटतो.

गेले बुधवारीं रात्रीं उमरावतीस चांगला पाऊस पडला असें समजतें.

१५ वे तारखेस ह्मणजे मंगळवारीं सेशन आहे. त्यांत वाशिमचा एक खुनी मुकद्दमा व रेंडेल साहेबाचा बुलढाण्याचा मुकद्दमा चालणार आहे. युरोपियनही तीन च्यार असेसरांस समन्सें झालीं आहेत. युरोपियनावरील मुकद्दम्यास युरोपियन असेसर पाहिजे असतील असें वाटतें.

मेजर लाटण साहेब उमरावतीचे अक्टिंग डिपुटी कमिशनर यांस रेसिडेंट साहेबानीं अधिकार दिले ते:—

१ क्रिमिनल प्रोसिजर कलम ३६ प्रमाणें माजिस्ट्रेटचे अधिकार.

२ जिल्हा जडजाप्रमाणें त्यांपुढें येतील ते दिवाणी मुकद्दमे चालविण्याचे अधिकार; मग ते कसल्याही प्रकारचे व कितीही रकमेचे असोत,

३ जिल्ह्यांतील सबार्डिनेट कोर्टाच्या फैसल्यावर अपिलें पहाण्याचे अधिकार.

इंगोली येथें वीज पडून रोमन क्याथोलीक पंथाच्या लोकांचे भजनालयाचा नाश झाला असें कळतें.

## वर्तमानसार

भावलपुरचे नबाब साहेब फार आजारी आहेत.

महाराज दिलिपशिंग विलायतेहून प्रिन्स आफ वेल्स यांजबरोबर हिंदुस्थानांत येणार आहेत असें समजतें.

तिरहुट प्रांतांत निळीची लागवड करणाऱ्या साहेब लोकांनीं दंगा केल्याविषयीं मागें समजलें होतें त्यांतील बेलसांड येथील कारखानेवाले साहेब मि० म्यानर्स यांजवर गैरकायद्याची मंडळी जमविली व अन्यायाची आगळीक केली हा मुकद्दमा शाबित होऊन त्यांस १०००' रुपये दंड झाला. या गुन्ह्याची चौकशी मि० बालटन जाइंट माजिस्ट्रेट यांणीं केली, कैदी मजकूर याजवर सदोष मनुष्य वधाचाही आरोप होता पण तो शाबीद झाला नाहीं

आनरबल मि० जस्टिस मेलव्हिल साहेब या वर्षाचे अखेरीस नोकरीचा राजिनामा देणार असें समजतें.

डा० नारायण दाजी मुंबईस आजारीं होते ते हवा पालटण्याकरितां महाबळेश्वरास गेले होते व तिकडून प्रकृतीस चांगली आराम होऊन ते मुंबईस परत आले असें कळतें.

असें वर्तमान आहे कीं लार्ड नार्थब्रूक गवरनर जनरल पुढील मार्च महिन्यांत विलायतेस जातील व डयूक आफ बकिंगहाम मद्रासचे नवीन गवरनर हे गवरनर जनरल होतील.

रा. रा. कृष्णराव गोपाळ देशमुख यांस बडोद्यास माजिस्ट्रेटची जागा मिळाली असें कळतें. हे गृहस्थ रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांचे चिरंजीव बी ए असून विलायतेहून बारिस्टरची परीक्षा देऊन आलेले आहेत.

प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत येणार ह्मणून तयाऱ्या सुरू आहेत. कलकत्याकडे ईस्ट इंडिया रेलवे प्रिन्स साहेबांकरितां एक स्वतंत्र व सोयवार गाडी तयार करीत आहे तिला १०००० रुपये खर्च ती कंपनी प्रथम करणार आहे, या गाडींत निजावयाची, बसावयाची, स्नानाची, व चाकर माणसांची अशा पृथक् पृथक् सोयी करण्याची योजना केली आहे. व त्यांच्या रेलवेवरून जावत्काल प्रिन्स साहेब फिरतील तावत्काल ती गाडी त्यांच्या दिमतीस ठेवण्याचा विच्यार आहे.

मुलाच्या नाडीचे ठोके एका मिनिटांत १८० होतात, तारुण्यांत आलेल्या मनुष्याचे तितक्याच वेळांत ८० होतात व साठ वर्षांच्या मनुष्याचे साठच होतात.

रिचटर साहेबांनां डोळ्याच्या रोगाचे ६०० निरनिराळे प्रकार सांगितले आहेत!

रोम येथील सेन्टपिटरचें देऊळ ४६४ फूट उंच आहे. तसेंच साल्युसबरीचें देऊळ ४६३ फूट उंच आहे व लंडनमध्यें सेन्टपालचें ४०२ फूट उंच आहे!

पृथ्वी इतक्या सपाट्यानें फिरत असते कीं, पांच अंक मोजले असतां आपण १०० मैल पुढें जातों. जर आगगाडीस इतका वेग दिला तर २० मिनिटांत पृथ्वीप्रदक्षिणा करितां येईल!

जर आपल्या ग्रहमालेंतील सर्व ग्रह मिळून एक गोळा बनविला तर तो आपल्या सूर्याचा एक पांचशावा भाग देखील होणार नाहीं. असे व याहून अतिशय मोठे सूर्य या आकाशांत अगणित आहेत व त्या प्रत्येकाच्या वेगवेगळ्या ग्रहमाला आहेत. तर जरी कोणी सर्व सृष्टपदार्थामध्यें पृथ्वी हीच मुख्य होय असें समजत असेल तर त्याची समजूत मोठ्या चुकीची आहे. ईश्वराची करणी अतर्क्य आहे!

बृहस्पती हा गृह आपल्या पृथ्वीपेक्षां १३०० पट मोठा आहे व तो सूर्यापासून, पृथ्वी पेक्षां सुमारें पांचपट ह्मणजे ५०२०००००० मैल दूर आहे. तेथें जर मानवी प्राण्याची वस्ती असली (असावी असें अनेक चांगल्या कारणांवरून दिसून येतें) तर तेथील मनुष्यास सूर्य आपल्यापेक्षां पांचपट लहान दिसेल. परंतु आपणापेक्षां सूर्यास इतकी ज्यास्ती गति आलेली दिसेल कीं, तो आकाशांत चेंडूसारखा गडबडत आहे असें त्याला वाटेल. तेथें सूर्य आपले दिवसाचें काम पांच तासांत उरकून टाकील. नंतर त्या मानवी प्राण्यास संध्याकाळीं आकाशांत एका मागून एक असे आपल्या चंद्रासारखे चार चंद्र दिसतील. ( कारण बृहस्पतीस चार उपगृह आहेत. ) व त्यास शनीच्या भोवतालची तेज:पुंज वलयें, त्याचे सात चंद्र ( उपग्रह ) हा चमत्कार जो आपणास मुळींच दिसत नाहीं तो त्याच्या पहाण्यांत येऊन त्याची वृत्ती आनंदमय होऊन जात असेल परंतु पांच तास झाले नाहीं तोंच हे सर्व चमत्कार नाहींसे होऊन पुन: सूर्य उगवेल व आपलें नित्यकर्म पहिल्याप्रमाणें थोड्या वेळांत आटोपून पांच तासपर्यंत विश्रांती घेण्यास क्षितिजाखालीं गमन करील.

रा. ब. गजानन विठ्ठल अमदाबादचे पोलिस इन्स्पेक्टर बडोद्याची कामगिरी संपऊन आपले गावीं गेले. त्यास एक गाव

महागीर मिळणार असें वर्तमान आहे.

सर टी माधवराव बडोद्याचे दिवाण तिकडील खात्या खात्यांतून कांहीं रिडकूश न करणार असें वर्तमान आहे.

ब्रह्मदेशाकडे चोरांचा पाठलाग करीत असतां झाडींतून चोरानीं बंदुक झाडून कर्नल हामिल्टन पोलिस आफिसर यास ठार मारिलें. व दुसरे एकास जखमी केलें असें वर्तमान आहे

भागिरथी नदीच्या खालच्या भागून स्टेट रेल्वे आहे तिजवर एक अपघात होऊन १२ मनुष्यें ठार मेलीं व १० जखमी झालीं असें कळतें.

मिरजकर कै० तात्यासाहेब पटवर्धन यांच्या कुटुंबाच्या मांडीवर रा. रा. बाबासाहेब सांगलीकर यांचा मुलगा बसविणार असें समजतें.

श्री० मल्हारराव गायकवाड यांशीं आपली भेट होऊं द्यावी म्हणून त्यांचे सालीसिटर मेसर्स जेफरसन आणि पेन यांनीं हिंदुस्थान सरकारास तीन वेळां लिहिलें पण त्यांनीं जबाब दिला नाहीं. त्यावरून त्यांनीं विलायतेस अर्ज केला व त्यांस भेट घेण्यास हरकत नाहीं असा हुकूम मिळाला.

पाऊस पाणी.

मे महिन्याच्या २७ वे तारखेपर्यंतचा पावसापाण्याच्या हवालाचा साऱ्या हिंदुस्थानाचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून समजतें कीं या आठवड्यांत साऱ्या हिंदुस्थानांत कोठें फार व कोठें थोडा असा पाऊस पडला. मद्रास, म्हैसूर, व दक्षिण महाराष्ट्रदेश यांत पावसाळा लागल्याप्रमाणें पाऊस पडला. बाकी मुंबई इलाख्यांत, तसेच सिंध, नागपूर, मध्य हिंदुस्थान, व रजपुतस्थान या प्रांतांत पाऊस थोडा पडला व त्या बरोबर वारा मनस्वी होता. बंगाल आणि असाम प्रांतांत सर्वत्र व कोठें कोठें फार भारी पाऊस पडला. उत्तर हिंदुस्थानांत पाऊस तुरळक पडला व थोडा पडला पण त्या बरोबर वादळ आणि गारा होत्या परंतु वायव्य प्रांताची हिमालयाकडील बाजू आणि पंजाब यांत बराच पाऊस झाला. शेतकी कामाची उमेद सर्वत्र बरी आहे. बंगाल्याकडे उन्हाळी भाताचें पीक चांगलें झालें. व पावसाळी पेऱ्याची तजवीज सुरू आहे.

बडोद्याचे माजी गायकवाड श्रीमंत मल्हारराव महाराज ह्यांचा जासुद यशवंतराव ह्याला गेल्या सोमवारीं म्हणजे तारिख ३१ माहे मे रोजीं आगबोटींतून एडन येथें पाठवून दिलें. ज्ञा. प्र.

मुंबईचे मि० एडिस सिव्हिल इंजिनियर यांची बाहेरून निरनिराळ्या गृहस्थांकडून आलेलीं आठ नऊ पत्रें गहाळ झाल्यावरून त्याबद्दल चौकशी करण्याविषयीं त्यांणीं पोलिसाकडे व पोष्टांतील कामदारांकडे लिहून पाठविलें. मि० एडिस हे ग्रांटरोड नवळील एका बंगल्यांत रहातात तेव्हां त्या भागचीं पत्रें पोचविणारे शिपायांची कांहीं दगाबाजी असावी अशा संशयावरून पिपाटी डिव्हिजनचे पोलिस इन्स्पेक्टर यांणीं व पोष्ट खात्यापैकीं मि० टेलर या उभयतांनीं सदरहू भागाचीं पत्रें पोचविणारे शिपायांस ताबडतोब कैद करून त्यांचे घराचा झाडा घेतला. त्यांत प्रथम ५०० रुपये किमतीचा चेक ज्या पत्रांत होता तें पत्र सांपडलें. पुढें बारकाईनें शोध केला तेव्हां आणखी दुसरे गृहस्थांचे नांवाचीं पत्रेंही पुष्कळ सांपडलीं. त्या सर्व पत्रांबराबर नोटी व टिकिटा आलेल्या होत्या परंतु त्यांपैकीं फक्त टिकिटा मात्र सांपडल्या नोटी सांपडल्या नाहींत. कैद्याचे सांगण्यांत त्यास एक अय्या साह्य होती असें आहे. ही अय्या मि० एडिस यांच्याकडे हल्लीं नोकरीस आहे.

ट्रावनकोरचे महाराज व त्यांचे कारभारी शेषय्या शास्त्री या उभयतांत बेबनाव आल्यामुळें शेषय्या शास्त्री यांनीं राजीनामा दिला. हल्लीं असें समजतें कीं, या जाग्यावर राजवाड्यांतील कंट्रोलर मि० रंगाचारलु यांची नेमणूक होणार आहे.

बंगाल्यांत कलाकौशल्याची विद्या शिकविण्याकरितां दरसाल ३०००० पासून ४०००० रुपयांच्या खर्चानें दोन पाठशाळा स्थापन करण्याचा बंगालचे लेफटिनेंट गवर्नर यांचा विचार आहे असें समजतें.

पेशावर येथील नुकसाच झालेल्या अग्नीप्रळयांत एकंदर १,०८७ घरें व ८२९ दुकानें जळालीं.

हालंडांत एकंदर १२००० पवनचक्या हल्लीं चालू आहेत. त्यास दरसाल २०००००० रुपये खर्च लागतो, वाफेच्या यंत्राच्या साह्यानें कामें करितां येतात. तीं सर्व कामें या पवनचक्याचे सहाय्यानें करितां येतात. यापासून फायदा इतकाच आहे कीं, वाफेचीं यंत्रें चालविण्यास जितका खर्च लागतो त्याचे दिसावा हिस्सा यास खर्च कमी लागतो. ने. ओ.

---

## पुण्यांत् चालू असलेल्या प्रदर्शनाचें वर्णन.

हें प्रदर्शन रा. रा. बाळवेकर यांचे भव्य दिवाणखान्यांत आहे. खालीं रस्त्यावर एक मंडप घातला आहे. व त्या मंडपाचे एका खांबास पुणें प्रदर्शन १८७५ अशा मोठ्या अक्षरानीं लिहिलेली पाटी आहे. या मंडपांत टिकिटें विकणारे व टिकिटें पाहून पहाणारास आंत सोडणारे बसतात. टिकिट देऊन जिना चढतांना उजवे बाजूस तळमजल्यावर जाण्याचा एक दरवाजा आहे. त्या दरवाजानें तळमजल्यांत शिरलें म्हणजे त्या ठिकाणीं दोन चार चांगल्या जिनसा दृष्टीस पडतात.

कापड विकण्याचे माग वगैरे यंत्रें या ठिकाणीं दोन चालू माग आहेत. त्यां मागांवर लोकांस दाखविण्याकरितां दोन लुगडीं विणण्याचें काम सुरू आहे. एक माग जुन्या चालीचा आहे त्याविषयीं येथें कांहीं लिहिण्याचें प्रयोजन नाहीं, कारण असले जुने चालीचे माग सर्वांचे पहाण्यांत आहेत. परंतु दुसरा माग पहाण्यासारिखा आहे. ह्या मागास एक दांडा आहे. तो दांडा मागे पुढें केला असतां ज्या गोष्टी जुन्या मागांत हाताच्या निरनिराळ्या क्रियेनें कराव्या लागतात. त्या सर्व क्रिया होतात म्हणजे धोटें फिरणें व सुती फळ्या खालीं वर होणें वगैरे सर्व व्यापार जलद व सहज होतात. आम्ही जुना व नवा हा माग चालत असतांना दोन मिनिटांत प्रत्येक मागावर किती काम होतें तें पाहिलें. जुन्या मागावर जेवढें काम होतें त्याच्या सुमारें चौपट काम नवीन तऱ्हेच्या मागावर होतें असें आमच्या लक्षांत आलें. ह्या नवीन मागास जी यांत्रिक शक्ति लाविली आहे ती बहुतेक अंशीं विलायती मागाप्रमाणेंच आहे. हा माग रा० बाबाजी मनाजी याणीं तयार केला आहे. व आजपर्यंत सांप्रतचा माग तयार होऊन चालू होण्यास त्यास सुमार दोन हजार रुपये खर्च झाला. व एका मनुष्यानें हा माग एक दिवस बिनचूक चालविला असतां तो चार लुगडीं विणूं शकतो असें सांगतात. येथें सूत काढण्याचें दुसरें एक यंत्र ठेविलें आहे, तें एक मोठें चाक फिरविलें असतां सुरू होतें. त्या यंत्राचे मुख्य अवयव म्हटले म्हणजे दोन अगर दोहोंपेक्षां ज्यास्ती जमीनीशीं समांतर फिरणाऱ्या पितळेच्या नळ्या व त्या पुढें उभे फिरणारे लांकडी बिंडेल. ह्या पितळेच्या नळ्यांत कापुस घातलेला असतो. यंत्र सुरू झालें कीं त्या नळ्यांतील कापसाचा दोरा बनून तो समोरील बिंडलास गुंडाळला जातो. या दोरास त्या नळ्या फिरत्या असल्यामुळें पीळही आपोआप पडतो. हा दोरा आमच्या मतें जितका पिळदार असावा तितका असतो असें नाहीं. परंतु येवढें खरें कीं, या यंत्राचे साह्यानें हातानें जितकें सूत निघेल त्यापेक्षां विशेष निघेल असें आह्मास वाटतें. या ठिकाणीं आणखी दोन नवीन तऱ्हेच्या मागाचे सांगाडे ठेविले आहेत. एक लांकडी व लोखंडी. हे माग चालू नसल्यामुळें त्यांविषयीं कांहींच लिहितां येत नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं जो लांकडी सांगाडा आहे त्याच नमुन्यावर दुसरा एक सांगाडा आहे परंतु तो लोखंडी आहे व तो देशांतच ओतून तयार केला आहे. आह्मी मुंबईतील वाफेच्या यंत्रावर चालणारे माग पाहिले आहेत त्यांशीं हा नुसता लोखंडी मागाचा सांगाडा ताडून पाहिला असतां बोजड आहेसा वाटतो. परंतु याविषयीं त्याचे कर्त्यास दोष देणें आह्मास बरोबर दिसत नाहीं.

या ठिकाणीं आणखी बऱ्याच जिनसा ठेविल्या आहेत. त्यांपैकीं विशेष उपयोगी व सांगण्यासारखी जिन्नस म्हटली म्हणजे पाण्याचा लोखंडी नळ. हा नळ पाहिला असतां इंग्रजी नळांत व यांत फारसा भेद दिसत नाहीं. हे नळ ओतण्याचा कारखाना येथें आदितवार पेठेंत रा. सुभराव यांनीं घातला आहे, व खडकवासल्याचें पाणी शहरांत म्युनिसिपाल कमिटी घरोघर देते त्या कामांत या नळाचा उपयोग केला जातो. हा कारखाना पुणें शहरांत झाल्यापासून पुष्कळ लोखंडी ओतीव जिनसा तयार होतात. परंतु या कामास लागणारें लोखंड मात्र या देशांत उत्पन्न होत नाहीं, अवश्य लागणारें लोखंड विलायती असतें, म्हणजे बहुतकरून रेल्वेकडील मोडक्या व टाकाऊ जिनसांचें लोखंड पुनः वितळवून त्याच्या ह्या जिनसा होतात. एवढें न्यून दूर होण्यास बरेच दिवस लागतीलसें वाटतें. ह्या जिनसा पाहून वरतीं गेलें म्हणजे थोरल्या दिवाणखान्यांतील रमणीय पदार्थांचा समूह दृष्टीस पडतो. हा दिवाणखाना पुष्कळ लांब व रुंद असल्यामुळें तीन रांगेनें सर्व पदार्थ मांडण्यास फार सोयीचें झालें आहे. सर्व पदार्थ उभे राहून पूर्णपणें पहाण्यास मिळावे म्हणून ते मोठ मोठ्या टेबलावर ठेविले आहेत. त्या टेबलांच्या दोन रांगा पूर्व व पश्चिम भिंतीशीं मांडल्या आहेत, व एक रांग मधोमध आहे. दिवाणखान्यांत गेल्याबरोबर तोंडाशींच मधल्या रांगेचें शेवटलें टेबल येतें त्या टेबलावर गोकाकची लांकडी फळफळावळ ठेविली आहे, व गोकाकच्या नमुन्यावर मुंबई व पुणें या ठिकाणीं तयार केलेले पदार्थही त्याच टेबलावर ठेविले आहेत. ( पुढें चालू. ) ज्ञा. प्र.

---

## वऱ्हाडचा इतिहास.

( ता. १८ एप्रिलचे अंकावरून. )

सन १८५३ सालीं निजाम सरकारचा व इंग्रज सरकारचा जो तहनामा झाला त्यांत असें ठरलें होतें कीं अमानी मुलूख हैदराबाद याचा राज्य कारभार इंग्रज सरकारानें पहावा परंतु दरसाल जमा काय झाली व खर्च काय झाला याचे हिशेब निजाम सरकारास दाखवित जावे. त्या प्रमाणें पुढें हिशेब पहाण्याचे कामांत फार गैरसोय व घोटाळा होऊं लागला व वाद विवादाचा पत्रव्यवहार चालू लागला त्याचप्रमाणें व्यापार संबंधानें सन १८०२ सालीं जो तहनामा झालेला होता त्या अन्वयें मालावर ५ रुपये शेकडा दस्तुरी घेत होते त्या कामांतही बहुत अडचणी येऊं लागल्या होत्या त्या सर्वांचे निवारण करण्यासाठीं व सन १८५७ सालच्या बंडाच्या प्रसंगीं निजाम सरकारानें इंग्रज सरकारची कामगिरी बजाविली त्याकरितां बक्षिस द्यावयाचें या साठीं सन १८६० चे डिसेंबर महिन्यांत एक नवीन तहनामा केला. त्यांत असें ठरलें कीं निजाम सरकारावर इंग्रज सरकारचें ५०००००० रुपये कर्ज असलेलें त्यास सोडून द्यावें, सुरापुरच्या बेरडानें बंड केल्यावरून त्याचा मुलुख इंग्रज सरकारानें घेतला तो निजाम सरकारास द्यावा, तसेच धाराशीव व रायचूर दुयाब हे प्रांत पहिले तहनाम्यावरून इंग्रज सरकाराकडे आहेत ते निजामास परत द्यावे, त्याचप्रमाणें गोदावरी नदीच्या पलीकडील काठचा मुलूख निजाम सरकारानें इंग्रज सरकारास द्यावा, त्या नदींतून कोणत्याही प्रकारचा माल जाण्या येण्यास कांहीं दस्तुरी पडूं नये, व बाकी राहिलेला अमानी मुलूख वऱ्हाड सुमारें ३२लक्ष रुपये वसुलाचा सन १८५३ सालच्या तहनाम्यांतील करार पुरा करण्याकरितां इंग्रज सरकाराकडे राहू द्यावा व त्याच्या जमेचा किंवा खर्चाचा हिशेब निजाम सरकारानें इंग्रज सरकारास मागू नये.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ | अकोला, रविवार ता० २० माहे जून सन १८७५ इ० | अंक २५


## जाहिरात.


### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |


GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

### नोटिस

CLOSING OF THE WARDHA VALLEY (STATE) RAILWAY.

**वर्धाव्ह्याली स्टेट रेलवे बंद करण्याविषयीं**

या नोटिशी अन्वये जाहीर करण्यांत येतें कीं सरकारच्या हुकुमावरून येत्या तारीख १६ जून सन १८७९ इसवी रोजीं व त्या नंतर पुढें नोटिस देण्यांत येईपर्यंत वर्धाव्ह्याली स्टेट रेलवे बंद ठेवण्यांत येईल.

सदरीं लिहिले कारणाबद्दल ग्रेट इंडिय पेनिनूसुला रेलवेवरील हिंगणघाट सोनाईगाव व वर्धा या स्टेशनांचे दरम्यान येत्या जूनच्या १५वे तारखेनंतर पुढें गाडी जाण्यायेण्यांचें बंद होईल. वर्धा व हिंगणघाट या दोन स्टेशनांचे दरम्यानचे लैनीच्या संबंधानें उतारूं व माल पाठविण्याबद्दल जी व्यवस्था करण्यांत आली आहे ती व नोटिशी देण्यांत आल्या आहेत त्या सर्व तारीख १६ जून रोजीं व त्या नंतर पुढें रद्द करण्यांत आल्या आहेत.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता० २६ माहे मे सन १८७९ इसवी.

## नोटिस.

नोटिस—हिरालाल चुणिलाल साहू दुकान तेल्हारें यांस उत्तमराव दत्ताजी देशमुख तर्फ अंदुरें तालुके बाळापुर याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास तारीख ३० माहे मे सन मजकूरचे वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली तिचा जबाब येणेंप्रमाणें:—

तुमचा आमचा हिशेब होऊन दोन वर्षांनीं रुपये ध्यावे असा ठराव झाला व त्याप्रमाणें वहीवर आम्ही लिहून दिलें यांत कपट बिलकूल केलें नाहीं. तुमची बाकी बुडवावयाची नाहीं अशा इमानदारीनें फक्त लांबणीची मुदत कबूल केली. असें असतां तुह्मी आह्मास कपट केलें असें ह्मणतां ही गोष्ट तुह्मी आमचे अब्रूवर उठण्यासारखी आहे सबब हिजबद्दल तुह्मी आमचेजवळ क्षमा मागावी नाहींपेक्षां अब्रू घेतल्याबद्दल तुह्मावर फौजदारी कोर्टांत फिर्याद केली जाईल व या नोटिशीचा खर्च भरून घेतला जाईल.

तुह्माला मराठी येत नव्हतें सबब १ वर्षांची मुदत तुह्मास कळली नाहीं असें ह्मणतां पण चौघा भले माणसांसमक्ष दोन वर्षांचा ठराव झाला व त्याप्रमाणें वहीवर लिहिला गेला आणि त्यांस मराठी भाषा येत होती त्यांनीं तुह्मास वाचून दाखविला असें असतां आतां तुह्मी दंडेलीवर येतां हें नीट नाहीं. अशानें तुमचें नुकसान होईल. कळावें. तारीख १६ माहे जून सन १८७९ इसवी.

(सही) उत्तमराव दत्ताजी देशमुख तर्फ अंदुरें दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये·

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि॰ वि॰ आपली माझी पहिलीच भेट असल्यामुळें कदाचित आपले मनांत खालील चार ओळी छापून प्रसिद्ध करण्यास शंका येईल तर आपण आपले एक कर्तव्यकर्मांत चुकल्याप्रमाणें होणार आहे.

मी पुण्याचा रहाणारा असून कांहीं कामाकरितां नागपुरास जाण्याकरितां निघालों तों दिवसाचे सुमारें १०॥ वाजतां नांदुरें स्टेशनावर आलों तसेंच पुढें जावें तर वेळ फार होणार व परक्या ठिकाणीं जेवणाची वगैरे सोय लागण्यास कठीण पडेल सबब याच गावीं मुक्काम करावा असें मनांत येऊन उतरलों. गावांत कोठें सोय पहाण्यास गेलों तों जिकडे तिकडे गर्दीचगर्दी उडाली होती व चवघड्याचा ध्वनीं कानी येऊं लागला. चवकशी अंतीं असें समजलें कीं कोणी गणपत बावा प्रतिष्ठान गावचे साधू येथें आले आहेत. तेव्हां या बोवाचें अंगीं कांहीं विशेष गुण असतील असें वाटून त्यांचे भेटीची इच्छा मनांत येऊन दर्शनास गेलों तेथें पहातों तों बोवास शिष्य मंडळीपेक्षां शिष्यिणीचा समुदाय फार दिसला. गावाची स्थिति पहातों तों या गावीं आपले देशचे लोक नसतां इतच्या शिष्यिणी कोठून आल्या असाव्या ह्मणून विच्यार करूं लागलों. पुढें चवकशीअंतीं समजलें कीं, कांहीं अकोल्याहून व कांहीं बुलढाण्याहून आल्या आहेत. ही गोष्ट जर खरी असेल तर मात्र बोबा उपदेश देण्यास योग्य नाहींत असें आपण ह्मणाल. पत्रकर्ते महाराज आपण मनावर घेऊन लोकांचे मनांतला देवभोळेपणा काढण्यास झटा, नाहीं तर बिचारे गरीब विनाकारण बोवाचे मंत्र पाशांत गुंतून फसताहेत. बोबाचा संप्रदाय उभयतां स्त्रीपुरुषांस मंत्रोपदेश देण्याचा आहे असें परस्पर समजतें; तर आपण बोबा कसे असावेत व त्यांणीं उभयतांस उपदेश करावा किंवा कसे, केल्यास त्यांचें नातें काय हें जर स्पष्ट करून दाखवाल तर आपले उपकार जाणून लोक या ढोंगी बोवाचे नादीं लागणार नाहींत. पत्रविस्तार फार झाला याची क्षमा असावी. तारीख ७ माहे जून सन १८७९ इसवी मुक्काम नांदुरा.

ताजाकलम—हें लिहिलेलें जर खरें नसेल तर बोवांनीं अगर त्यांचे शिष्य मंडळीनीं आपले पत्रद्वारें खरें कळवावें ह्मणजे मोठे उपकार होतील. कळावें

एक फिरस्ता

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस —

वि. वि. महाराज, झालेलें दुःख कोणाजवळ सांगितल्याखेरीज रहावत नाहीं. आणि तें दुःख ज्यापासून झालें असतें त्यानें असें करावयाचें नव्हतें वगैरे शद्ब ऐकणारापासून ऐकिल्याखेरीज सांगणाराची समाधानी होत नाहीं असा मनुष्यमात्राचा स्वभाव आहे ह्मणून मी आपलें दुःख अंशतः आपणापुढें ठेवितों. तर त्याबद्दल वर लिहिल्याप्रमाणें आपणांकडून तजवीज होईल काय? आपल्या दोन शद्बांनीं माझीच एकट्याची समाधानी होईल असें नाहीं. तर गरीब गुरिबास बराच फायदा होणार आहे.

मी देऊळगाव राजा येथील धर्मार्थ दवाखान्यांत तारीख १ जून सन मजकूर पर्यंत कंपौंडरचें काम कांहीं महिने करीत होतों परंतु दुःखानें व लोकलज्जेनें गांजून गेलों ह्मणून हल्लीं राजीनामा दिला आणि बेफराकत होऊन बसलों आहे खरा; परंतु उपाशीं मरण्याची पाळी आली आहे तरी ती बरी असें पुढील मजकुरावरून आपणास वाटेल यांत संशय नाहीं.

महाराज या दवाखान्यांत राहून मला कांहींच फायदा झाला नाहीं. इतर दवाखान्यांतील अप्रेंटिस औषधांची माहिती करून घेतात, नंतर हैदराबादेस परीक्षेस जातात, कालेजांत राहातात, जास्त अभ्यास करून मोठमोठ्या जागा मिळवितात परंतु या गोष्टी या हास्पिटलांतील लोकांस स्वप्नांत सुद्धां मनांत आणणें नको. हा गाव मोठा आणि इतर शहराप्रमाणें जरी रोगग्रस्त आहे तरी रोग्यांस औषध मिळेल तेव्हां ते दवा घेण्यास येतील ना? आणि ते येतील तर त्यांचे रोगाची चिकित्सा होऊन कोणते औषधाची योजना होते हें आह्मांस कळणार आहे; परंतु गोमाजी त्रिन तिमाजी रोगी आला, त्याला अमका तमका रोग झाला असल्यामुळें सटर, फटर औषध दिल्हें, त्यानें अमुक दिवस दवा खाल्ली आणि शेवटीं गैरहजर राहिला किंवा बरा झाला वगैरे पोकळ मजकूर रजिष्टरांत दाखल केल्यानें आमचें ज्ञान वाढेल काय? नाहीं तथापि अशा लिहिण्यानें महिनेवार रिटर्नें वगैरे वक्तशीर पाठवून वरिष्ठांचे डोळ्यांत धूळ टाकितां येते. मग खरी स्थिति सरकारास कळते कशाला? इतर खात्याप्रमाणें जर वरिष्ठ अधिकारी पूस तपास करण्याकरितां हरहमेशा येतील आणि दाखल असलेले नाववाले रोग्यांस बोलावून आणून चवकशी करतील तर मात्र आमची लुच्चेगिरी बाहेर पडणारआहे. असो. वर लिहिल्याप्रमाणें जरी औषधांची माहिती झाली नाहीं तरी नृत्य गायन वगैरे विषयोपभोग बरेच पहाण्यांत आले. तोच आनंद मानून चार दिवस आयुष्याचे काढावे तर तसेंही करण्याची सवड नाहीं, कारण आज रोजीं अमक्या तमक्या येणार आहेत, बिछायती घाला, पक्कीं पानें आणा, पानदान तयार करा पिकूदानी धुऊन स्वच्छ ठेवा, ती भरतांच पुन्हा स्वच्छ करून आणा, पत्यावरपत्या करून द्या, हीं व या सारखीं हलकट कामें करावीं लागतात आणि न करावीं तर सरकारानें कंपौंडर लोकांची बहाली बडतर्फी डाक्टर लोकांकडेच ठेविली आहे सबब ज्यांस नोकरी पाहिजे त्यानें सांगितलें काम कितीही निंद्य कां असेना, केलेंच पाहिजे. नाहींपेक्षां बडतर्फीचा हुकूम हजरच आहे. एडिटर साहेब मेडिकल खात्याचे अधिकारी जर कंपौंडर लोकांचे स्थितीकडे लक्ष पुरवितील तर अशा संकटांत असणारे मजसारखे गरीब गुरीबांची दाद सहज लागून राजीनामे देण्याची पाळी येणार नाहीं. तूर्त पत्र विस्तार फार झाला ह्मणून पुरें करितों. प्रसंगानुसार पुढें आपली भेट घेईन पण माझी स्मरण ठेवा हो. गुड्बाय. येतों आतां. तारीख ९ माहे जून सन १८७९ इसवी मुक्काम देऊळगाव.

एक

त्रस्त कंपौंडर.

## अवलोकनवाळूचा पुनर्जन्म यात्रेकरू हा नवीन अवतार.

### गोपाळकाला.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. आपले मागील अंकांत एक यात्रेकरू या सहीचें पत्र छापलें आहे त्याच्या योग्यतेचा विचार करूं.

हा यात्रेकरू सदाशिवाचा भक्त आहेसें दिसतें. कारण त्याचीच त्यानें शेवटीं प्रार्थना केली आहे. सदाशिव महाराजांचें प्रेम मादक पदार्थांवर फार व तिच्या सेवना खेरीज त्यांच्या भक्तांनीं राहूं नये अशी पडली गुरूची आज्ञा ह्मणून मला वाटतें कीं ह्या यात्रेकरूनें स्वामिप्रियपदार्थाचें सेवन करून आपल्या पत्रांतील असंबद्ध लेख लिहिला असावा. पहा हा गृहस्थ प्रथम पंढरीच्या बिठोबाची व मुंबईच्या टाउनहालाची तुलना करितो पुढें त्यासंबंधानें जिल्ह्याचे ठिकाणीं रहाणाऱ्या एका वारकऱ्याचें नाव आणून त्यानें पुष्कळ वाऱ्या केल्या तरी त्याला अद्याप यश आलें नाहीं ह्मणून ह्मणतो. आतां परिक्षेसारख्या कामीं यश येणें ह्मणजे प्रारब्धाधीन आहे हें या होतकरू यात्रेकऱ्यास माहित नसावें किंवा असूनही प्रिय मादक शक्तीच्या अधिकाराचें प्राबल्य झालें असावें ह्मणून मनोवृत्ती उछृंखल होऊन सदाशिव निंदक जिल्ह्याच्या ठिकाणीं रहाणाऱ्या वारकऱ्यावर क्रोधवश झाल्या असाव्यात. असो पुढें त्याच वारकऱ्यानें पुण्यास जाऊन एका कामांत अल्पयश मिळविलें कारण देवाला त्याची करुणा आली असें लिहिलें आहे. पण पहा ज्या कृत्याकरितां तो वारकरी गेला त्यांत तो उत्कृष्ठ ठरून हजार पांच शें विद्वज्जनांनीं ( माथें फिरलेले नव्हत ) त्यास पहिले नंबरचें बक्षीस दिलें. तेव्हां ह्याला जर यात्रेकरू अल्पयश ह्मणेल तर पूर्ण यशाची पायरी निराळी असावी व ती सन्मानार्थ दांभिक नानाफडनविसी कृत्रिम डौलावर बोलणाऱ्या सदाशिव तोतया ( सवाई माधवरावांचे वेळच्या ) प्रमाणें हशा पिकविणारास वंश परंपरेनें दिलेली असावी. असो पुढें या वारकऱ्यास उद्देशून हा यात्रेकरू ह्मणतो कीं त्या अल्प वयाच्या ऐटीवर हा कोणास उद्दाम, कोणास हास्यरसोत्पादक असें ह्मणून गर्व वहातो. वहावा ! ! ! एथें तर यात्रेकरूच्या मतिभ्रष्टतेची कमालच झाली. ज्याला धडधडीत सर्व जग लबाड किंवा मूर्ख ह्मणतें किंवा ज्याला सर्व जग शहाणा किंवा धूर्त ह्मणतें त्याला तसें ह्मणणें यांत दोष तो कोणता ? उदाहरणार्थ एकाद्या महा भागवतानीं एखाद्या ठिकाणीं काशीकरी केल्यास त्याला तसें ह्मणणें, तसेंच एखाद्या अगरवाल्या गोपालजीनें परस्त्रीवर नजर ठेऊन गोपाळकाला करण्याचें धाडस करून विषय विषयक दुष्कर्मांत प्रख्याति मिळऊन जर तो x x किताबधारी झाला असेल तर त्यास तसें ह्मणणें ह्यांत दोष तो कोणता ? व असें ह्मणणारा गर्विष्ठ असें कोणी तरी समंजस सदाशिवप्रियपदार्थविरोधी ह्मणेल काय? त्याचप्रमाणें विद्वान् लोकांच्या मोठ्या समूहांत जो उद्दाम भाषण करितो व ज्याला सर्व विद्वज्जन समाजांतून हाकून देतात त्याला उद्दाम ह्मटलें किंवा एखाद्या हशा पिकविणारास हास्यरसोत्पादक ह्मटलें ह्यांत दोष तो काय? सर्व सज्जन कबूल करतील कीं ह्यांत गर्वोक्ति अगदीं नसून ही सत्योक्ति आहे, व जन समूहास अशा x x विषयीं जागृत करणें आहे. पुढें ह्या यात्रेकरूनें वारकऱ्यास शापोक्ति दिल्या आहेत. सार्थच आहे कीं, सदाशिवाचे भक्त तितके दुष्ट. एकेक दुर्वासासारखे शापतत्पर व छळवादी, परंतु ह्या दुर्वासानीं पक्कें समजावें कीं, हें कलियुग आहे ह्यांत शापोक्ति मागच्या जागींच राहातील व सत्यवादी जे आहेत ते शुभ्रवेशधाऱ्यास शुभ्रवेशधारी, रंगेल्यास रंगेल, अष्टपैलूस अष्टपैलू व पापकर्म आचरणाऱ्यास पापी ह्मणण्यास कदापि सोडणार नाहींत. पुढें हा वारकऱ्यास असें ह्मणतो कीं, ह्याचें चरित्र ( त्यानें आपलें मागील पत्रीं मासला दाखविलेंक ) चार महिने लिहिल्यास पुरेल पण त्यास हें कळत नाहीं कीं, त्याचीं व त्याच्या गुरूचीं चरित्रें वर्षानुवर्ष सर्व मुंबई इलाख्यांतील पत्रांतून लिहिलीं तरी सरणार नाहींत मग विनाकारण दुसऱ्यास दोष कां द्यावा? ह्मण आहे कीं, "मी हसते लोकांला आणि शेंबूड माझ्या नाकाला." अस्तु एकंदरींत यात्रेकऱ्याच्या पत्राच्या असंबद्धतेचा एथवर पारखाळ झाला. हे यात्रेकरू यंदाचे मुंबईचे यात्रेस उमेदवार आहेत पहावें ह्यांच्या ज्ञानाचा दिवा कसा काय कुळंब्याच्या दांडीवर प्रकाश पाडतो तो, किंवा चाळींतील माडीवरच त्याचें प्रयाण होतें, प्रसंग समीप आहे सर्व कळून येईलच. अस्तु. आज इतकेंच पुरें करितों. यात्रेकऱ्याच्या आंगीं सामर्थ्य असल्यास पुढें प्रसंग येईलच. कळावें हे विनंती. तारिख १६ जून १८७५

आर्यजनहितैषी
जमदग्नि.

** असले वर्मकर्मभेदक पत्रव्यवहार आह्माकडे कोणी पाठवूं नयेत. आम्ही दिलगिर आहो कीं, पहिले पत्राचा उत्तरार्ध (ज्यावर हा जबाब आहे तो) आमच्या नजरचुकीनें छापला गेला. ए० व० स०

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य २ शके १७९७

## नाजरप्रकर्ण.

अकोल्याचे नाजर प्रकरणाविषयीं वारंवार लिहिल्यास आश्चर्य मानण्यासारखें नाहीं; कारण तें प्रकरणच तशा थरावर चाललें आहे. आणि त्या कामांत नित्यशः जी गडबड होत असते तीही तशीच महत्वाची आहे. मलकापुरास जी धरपकड झाली होती ती बरेच दिवस घोळली व मि० दस्तुर बहिमनजी साहेब ९ । ६ दिवस तिकडे गेले होते ते गुरूवारीं परत आले. मलकापुरास व मलकापुरानजीक नाजरचे आप्त आहेत व त्या लगत्यास नाजरच्या मालमिळकतीची लांबवालांबव झाली असा सरकारी अधिकाऱ्यांस वहीम आहे व तशा प्रकारची बातमी मिळाली होती त्यावरून तिकडे धावणें गेलें पण नाजरचा ह्मणून कांहींच माल तिकडे अजून सापडला नाहीं असें ऐकतों. आतां मलकापुरानजीक आणखी कोणा इतर जातीच्या गृहस्थाचा माल जप्त केला आहे. व तो इसम सुमार पन्नास हजाराचा धनी आहे असें ह्मणतात. माल पकडल्यानंतर मालकानें प्रत्येक जिन्नस आपला स्वतांचा आहे असा पुरावा करावा लागतो. व लिहिणें पुसणें नसल्यास अथवा खात्री बरोबर न केल्यास तावडतोब माल परत मिळत नाहीं ह्मणतात. येणेंकरून या गोष्टीचा मोठा गवगवा झाला आहे. येथील रा. माधवराव विष्णु वकील यांचे भावाचा माल मलकापुरास जप्त केला त्या प्रसंगांत त्यांस तार येऊन ते गेले होते. व कांहीं मालाचा पुरावा वगैरे त्यांनीं केला. हल्लीं परत आले आहेत. त्यांचा माल त्यांस अजून मिळाला नाहीं.

या आठवड्यांत गेल्या सोमवारीं दोन प्रहरीं रा. देवराव विनायक वकील यांचे घरीं डिपुटी कमिशनर साहेब पोलिसाची मोठी टोळी बरोबर घेऊन जप्तीस गेले होते. व त्यांचे घरच्या वह्या घेऊन परत गेले. नुसत्या वह्या करितांच ही स्वारी होती तर इतका कडेकोट बंदोबस्त नको होता. पण त्यांचा हेतु काय होता व त्यांनीं तेथें काय काय केलें हें बरोबर ठाऊक नाहीं.

त्याच दिवशीं दोन प्रहरीं डिपुटी कमिशनर साहेबांनीं नवीन नाजरास एक चिट्टी लिहिली कीं रा. पांडुरंग गोविंद वकील यास आह्मापुढें घेऊन यावें व त्यांस कोणाशी बोलूं देऊं नये.

ही चिट्टी वारंटादाखल समजून नाजरानें ३।४ शिपाई बरोबर घेऊन जाऊन कडेकोट बंदोबस्तानें पांडुरंगपंत यास कचेरींत आणिलें पण डिपुटी साहेब देवरावाकडे गेलेले होते ह्मणून त्यांनीं जातांनां मि. डेविस साहेब यांस पांडुरंगपंताची चौकशी करावयास सांगितलें होतें त्याप्रमाणें त्यांनीं पांडुरंगपंत तेथें येतांच आपले कचेरींतील सर्व लोकांस बाहेर काढिलें व त्यांची जबानी घेतली. तिचा मुद्दा हा होता कीं, या सुटींत तुह्मी मलकापुरास गेला होता किंवा नाहीं, व कोर्टफीचे स्टांप तुह्मी नाजरापासून एकदम ठोकळ रकमेचे घेऊन ठेवित होता किंवा नाहीं? ऐकण्यांत असें आहे कीं दोन्ही गोष्टीविषयीं त्यांनीं निषेध सांगितला.

या २।३ गोष्टी मोठ्या प्रतिष्ठित गृहस्थांच्या संबंधाच्या आहेत व त्यांची सरकारच्या अशा करण्यानें अप्रतिष्ठा झाली असें कांहीं लोक समजतात व अशाबद्दल आह्मांस १।२ पत्रेंही आलीं आहेत त्यांत ते लिहिणारे सरकारचे कामदारांस मोठा टपका देतात व आह्मां[स] ही एकपक्षी विचार केला असतां ए[क]एकी कोणाची विनाकारण अब्रू घेणें हें टपक्याचें काम दिसतें.

परंतु या गोष्टींत दुसऱ्या पक्षाचाही विचार केला पाहिजे. सरकारचे खजिन्यांतले १९००० रुपये चोरीस गेले त्या चोरीचा पत्ता लावणें हें माजिस्त्रेटाचें काम नव्हे काय? कोणी ह्मणतात माजिस्त्रेटास हे रुपये भरावे लागतील ह्मणून ते फार खवळले आहेत ही गोष्ट आह्मांस ठाऊक नाहीं पण हीच चोरी दुसऱ्या कांहीं प्रकारची असती आणि डिपुटी कमिशनरांनीं ती भरून देण्याचा कांहीं संबंध नसता तरी त्यांस एवढ्या मोठ्या चोरीचा फार बारकाव्यानें पत्ता लावणें अवश्य नव्हतें काय ? [त्या] हुद्याचें ते काम करीत आहेत त्याचें स्वरूप असें आहे व तें या प्रसंगीं अशा प्रकारें प्रगट न केलें तर त्यांनीं आपलें कर्तव्यकर्म बजाविलें नाहीं असें होऊन त्यांस मोठा टपका येणार आहे. सरकारची रकम फार मोठी नाहींशी झाली, नाजरानें दगाबाजीनें आपली माल मिळकत पळविल्याचा चांगला वहीम आला, सरकारी प्रतिष्ठित कामदार व इतर कारकून लोक यांना शेकडो रुपये नाजरानें कर्जाऊ दिले असल्याच्या यादी मिळाल्या, वकील लोक नाजराला पैसे मिळावे ह्मणून खटपट करीत होते असें समजलें इत्यादि गोष्टीवरून या कामांत फार गोंधळ आहे असें सरकारी अधिकाऱ्यांस वाटणें व त्यावरून त्यांनीं फार बारकाव्यानें चौकशी करणें अगदीं साहजिक आहे असें कोणासही वाटल्यावांचून राहाणार नाहीं. आपले जिल्ह्याच्या बाहेर महामारीचा उपद्रव सुरू झाला इतकें ऐकतांच ज्या हुशार व चालाख डिपुटी कमिशनरांनीं सर्व तहशिलदारांस सर्क्युलर करून उत्तम प्रकारची स्वच्छता व औषधांची योजना करून ठेविली व जे सर्व कामांत चांगला विचार करून वागतात त्यांनीं या प्रतिष्ठित लोकांचेच कामांत अविचार केला असें ह्मणवत नाहीं कारण त्या गोष्टींचीं कार्यकारणें ठाऊक नाहींत. दुसरें असें कीं क्या. बुलक साहेब स्वतां त्या मंडळींची प्रतिष्ठा जाणत नाहींत असें नाहीं. असें असतां त्यांस तसें करावें लागलें यावरून तें करण्यास अवश्य असावें असें वाटतें. रा. सदाशिव नारायण नाशिककर वकील यांची एक दिवस जबानी झाली ती कशा करितां ह्मणून सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. परंतु पुढें त्यांच्या जबाबांत इतकें निष्पन्न झालें कीं नाजरचे व्याही मलकापुराजवळ टेंभीस राहातात त्यांकडे ते गेले होते व परत येतांनां नाजरचे चिरंजिवाबरोबर त्यांचेच गाडींतून ते परत आले. आतां पहा! ही गोष्ट कल्पनेनें कळण्याजोगी आहे काय? नाहीं. बातमीदारांच्या खबरेवरून ती कळली व तपासांत खरी झाली असे अनंत प्रकार असतील सबब या प्रकरणाचा अखेर निकाल होईपर्यंत कोणास निश्चयें बरें वाईट ह्मणतां येत नाहीं.

ढीळसा निघ
टन; फ्रा

## अकोल्यास उडदू छापखाना.

आमच्या अकोल्यास मुसलमान जातींतील दोन तीन भल्या गृहस्थांनीं मिळून थोड्या दिवसांमागें एक शिळाप्रेस आणिला आहे व त्यांत उडदू भाषेंत पुस्तकें छापण्याचें काम सुरूं झालें आहे. व त्याच छापखान्यांत "उडदू अकबार वऱ्हाड" या नावाचें वर्तमानपत्र काढण्याचा त्याचे मालकांचा विच्यार आहे असें ऐकतों. तो खरा असल्यास आह्माला एक बंधू होणार हें पाहून फार संतोष होतो. वऱ्हाड प्रांतांत मुसलमानांची संख्या पुष्कळ आहे. व त्यांच्या मुलांस विद्यादान देण्याची खटपट इतर प्रांतांपेक्षां इकडे चांगल्या प्रकारें सुरूं आहे, सरकारी कामगारांतही मुसलमान जातीचे पुष्कळ आहेत व त्यांची संख्या वाढवावी अशी युरोपियन अधिकाऱ्यांची इच्छा आहे; आणि हल्लींच्या काळीं साऱ्या हिंदुस्थानांत मागें पडलेल्या मुसलमान लोकांस पुढें आणावें, विद्या द्यावी, कामें द्यावीं, त्यांस बहुत दिवस अज्ञान स्थितींत ठेविलें हें गैर आहे वगैरे विच्यार सुरूं आहेत तेव्हां अशा प्रसंगांतच वऱ्हाडांतल्या आमच्या मित्र मंडळींनीं मुसलमान लोकांकरितां स्वतंत्र छापखाना मांडावा व स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याच्या तजविजीस लागावें हें त्यांस भूषण होय. व त्याप्रमाणें त्यांनीं अवश्य करावें. आमचे ऐकण्यांत असेंही आलें आहे कीं सदर्हू वर्तमानपत्र उडदू, इंग्लिश, व मराठी अशा तीन भाषांत छापलें जाणार आहे. तसें असल्यास मात्र त्यांनीं त्या गोष्टीचा जरा जास्त विच्यार करावा अशी आमची त्यांस शिफारस आहे. एका उडदू भाषेच्या लोकांकरितां त्यांना पुष्कळ खर्च आला असेल व पुढें येईल. आणि याप्रमाणें दुसऱ्या दोन भाषांचे एडिटर, कापिस्ट, (लेखक) वगैरे ठेवणें व त्यांचा कारभार सुरळीत चालणें ह्मणजे फार मोठ्या खर्चाचें काम आहे. व आमचे मित्र त्याप्रमाणें कदाचित खर्चही करितील परंतु तो खर्च बाहेर निघण्यापुरतें उत्पन्न होण्याजोगी देशाला प्रस्तुत स्थिति नाहीं असें आमचे अनुभवानें सिद्ध झालेलें मत आहे. सबब "अल्पारंभाः क्षेमकराः" या उपदेशाप्रमाणें तूर्त स्वभाषेपुरताच त्यांनीं कारखाना ठेवावा आणि कदाचित त्याहून अधिक ठेवणेंच असेल तर मराठी आणि उडदु या दोन भाषांपुरता तरी ठेवावा आणि तो सुरळीत चालू लागल्यावर मग त्यांत अनेक भाषांची वृध्धी करावी असें आह्मी त्यांस बंधुभावानें कळवितों इतक्या उपर त्यांची मर्जी.

बाहेर प्रांतीं ह्मणजे जिल्ह्याच्या भागांतून प्रस्तुत छापखाने चालणें मोठें कठीण झालें आहे. मागें कामकाज छापवून घेण्याच्या संबंधानें छापखान्यांना सरकारी मोठी मदत होती ती त्यांनीं आतां काढून घेतली व आपले स्वतांचे छापखाने मांडले आहेत त्यामुळें जिल्ह्यांतले ह्मणजे लोकांचे छापखाने केवळ आंतवट्टयाचे रोजगार असे झाले आहेत व ते त्यांच्या केवळ जुनेपणावर चाललेले आहेत परंतु लौकीक कारखान्यांचीही वृध्धी होऊं लागली आहे तेव्हां हें आह्मी एक सुचिन्ह समजतों व आमच्या अकोल्यास जन्मास येणाऱ्या भावी बंधूस उत्साह, सौख्य व दीर्घायु असो असें इच्छितों.

## वऱ्हाड

खामगावरेलवे ता. १ जूलैपासून बंद होणार.

मि० गोविंदराज अय्या येथील तहशिलदार यांस अडगाव कोर्टाचे मदतीस नेमिल्याप्रमाणें गेल्या सोमवारीं त्यानीं तेथें जाऊन आपलें कोर्ट सुरू केलें. एक महिन्यांत ते शिलकी काम सोपवून मागें येतील. येथें नायब तहशिलदारच त्यांचें काम पहात आहेत.

रा. रा विष्णु सखाराम नापट येथील क्लार्क आफ धि कोर्ट हे ज्वरानें आजारी होते तरी तसेच कचेरीस जात असत अलीकडे ८।१० दिवसांत फार निःशक्तता झाल्यावरून डाक्टरचें सर्टिफिकेट घेऊन गेल्या गुरुवारीं ते पुण्यास घरीं गेले कोणी ह्मणतात त्यांस आजार झाला होताच पण नाजर प्रकरणावरून त्यांनीं दहशत घेतली व त्यावरून आजार वाढला. तसें असल्यास बिच्याऱ्या अननुभवी तरुण गृहस्थास ही एक मोठी पीडाच झाली असें ह्मटलें पाहिजे व त्याकरितां त्याची दया केली पाहिजे.

सोमवारीं, गुरुवारीं, व आज पहाटेस एथें फार चांगला पाऊस पडला. तणेंकरून हवेंत थंडावा आला आहे व नदीलाही चांगलें पाणी आलें. आणखी एकादा चांगला पाऊस पडला ह्मणजे लोक पेरण्याचे उद्योगास लागतील.

या आठवड्यांत अकोल्यास महामारीचे संबंधानें जरा भीति उत्पन्न झाली आहे कारण पहिल्यानें परजिल्ह्यांतून व नंतर भोंवतालचे तालुक्यांतून थोड थोडी बातमी ऐकूं येत असे, पुढें अकोले तालुक्यांतील कांहीं गोष्टी ऐकूं येऊं लागल्या व शेवटीं या आठवड्यांत तिनें अकोल्यासही आगमन केलें असें दिसून आलें पण तिचा जातां जातां हा फटकारा असावा असें वाटतें. कारण पर्जन्य चांगला पडल्यानें बहूकरून आजार आतां कमी होईल. व अकोल्यास पर्जन्य चांगला पडला तेव्हां भीति मानण्याचें कारण नाहीं; मुळीं येथें ५।६ मनुष्यें आजारी झालीं व त्यांतील दोन बाहेर गावाहून आजारी होऊन येथें आलेलीं होतीं असें समजतें. मिळून २।३ मरण पावलीं. व २।३ आजारी झालेलीं दुरुस्त झालीं व नवीन कांहीं उपद्रव नाहीं हें ऐकून आह्मांस संतोष होतो. हा आजार दुर्गंधीनें व मलीनतेनें वाढतो सबब सर्वत्र स्वच्छता राखण्याविषयीं क्या० बुलक साहेब डिपुटी कमिशनर साहेब यांनीं फार लक्ष दिलें, जास्ती झाडणारे, मैल काढणारे, व कचरा भरून नेणारे लोक व गाड्या शहरांत जागोजाग लाऊन दिल्या व त्यांवर पैरवी टेवण्यास इनक्याजे तहशिलदार यांस सांगितलें त्याप्रमाणें तेही दररोज गावांत हिंडून स्वच्छता राखीत आहेत. बाहेर गावचे लोक येथें येऊं न व येथले बाहेर जाऊन संसर्गानें रोगाचा संच्यार जास्ती होऊं नये ह्मणून या आठवड्यांतले बाजार गावचे गावांत भरावे बाहेरचे बजारकरी येऊं जाऊं नयेत अशीही तजवीज केली इत्यादि उत्तम बंदोबस्तावरून इकडील लोकांस या भयंकर रोगाची आतां धास्ती बाळगणें नको असें आह्मी ह्मणतों व कृपाळु परमेश्वरानें या आमच्या ह्मणण्यास आशीर्वाद द्यावा. लोकांनींही गावांत वर्गणी जमऊन महामारीचा बली वगैरे मिरऊन काल तिची शांति केली हेंही एक अल्प समजुतीच्या लोकांस निर्भय रहाण्यास बरें झालें.

खामगावचे नवीन नायब तहशिलदार रा. गणेश गोपाळ यांस रिकार्ड चांगलें लावून देण्याकरितां व त्याची कांहीं व्यवस्था नव्या नेमणुकीच्या गृहस्थांस समजाऊन देण्याकरितां माघारे बोलाविलें व त्याप्रमाणें ते या आठवड्यांत येथें आले आहेत लवकरच परत जातील.

वाशिम जिल्ह्यांतला खुनी मुकदमा १९ वे तारखेस सेशन कोर्टापुढें चालून दोघांही आरोपितांवर शाबीद झाला व त्यांस जन्मपर्यंत काळे पाण्याच्या शिक्षा झाल्या. हा खून मयताच्या शेताची वहिवाट आपणास मिळावी अशा इरादानें त्याच्या नातलग ३ कुणब्यांनीं पुसद तालुक्यांत सापळी या गावीं मोठ्या दुष्ट रीतीनें केला. तो असा कीं तो मनुष्य आपले घरीं निजलेला असतां त्याला शेतांत बोलाऊन नेलें व तो उताणा निजल्यावर त्याचे गळ्यावर एक व पोटावर एक अशीं दोन दोन हात कांबीचीं दोन लांकडे ठेऊन त्यांच्या दोहो शेवटावर दोघांनीं पायानें बळकट दाबून त्याला अर्ध मेला केला व मग एकानें एका रुमण्यानें त्याचें डोकें फोडफोडून त्यास ठार मारलें. पुराव्याचे मजबुदीकरितां त्यांतील एकास माजिस्त्रटानें साक्षादार केलें होतें.

क्या. आर एस थामसन असिस्टंट कमिशनर यांस जस्टस आफ धि पीसचा अधिकार दिला.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर काल रोजीं उमरावतीकडे गेले. इलिचपुरास उदईक सेशनचा मुकदमा आहे. बरोबर रा. रा. भास्कर सखाराम क्लार्क आफ धि कोर्ट गेले आहेत.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं डा० सिक्लेर साहेब विद्याखात्याचे माजी डायरेक्टर यांविषयीं कांहीं स्मारककृत्य करावें अशी बहुतांचे मनांत प्रेरणा झाली आहे. व अकोल्यांतील कांहीं पुढारी मंडळीनां याबद्दल मि० इलियट साहेब आफि० डा० यांस त्याविषयीं विच्यारलें त्यांनीं तें कृत्य होण्यांत संतोष दखवेला व आपणाकडून पाहिजे ती मदत मिळेल असें सांगितलें. त्यावरून जे मास्तर लोक या समारंभास येऊं इच्छितील त्यांस एक दिवसाची रजा द्याल काय? असें विच्यारतां त्यांनीं देण्याचें कबूल केलें त्यावरून आजचेच दिवशीं सभा भरण्याची सिद्धता झाली होती पण अकोल्यास आणि बाहेर गावीं थोड थोडा हवेचा उपद्रव सुरू आहे सबब अशा प्रसंगीं ठिकाठिकाणचे लोक एकत्र मिळणें बरें नाहीं असें सर्वांस वाटल्यावरून आमचा बेत राहित केला. पुढें निरोगी हवा झाल्यावर लवकरच एक रविवार या सभेसाठीं मुक्रर केला जाईल व तो सर्वांस कळविला जाईल.

खामगावचे वकील रा. केशव सिताराम सिन्नरकर मरण पावले असें समजतें. हे गृहस्थ बरेच हुशार असून स्नेहास चांगले व मोठे कुशल होते. यांचे मरणानें त्यांचे ओळखीचे बहुत लोकांस दुःख होईल.

मि० रेंडल साहेब बुलढाण्याचे माजी लोकलफंड इंजिनियर यांचा सेशन मुकद्दमा मंगळवारीं अकोल्यास चालणार होता पण तो मुंबईच्या हायकोर्टापुढेंच चालला पाहिजे असें जुडिशियल कमिशनर साहेबांस दिसून आल्यावरून त्यांनीं रसिडेंट साहेबांस लिहिलें. आतां पुन्हा क्या० हडलस्टन साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर मुंबईच्या हायकोर्टाकडे तो कमिट करितील. रेंडल साहेबांनीं जबलपुराहून मि० रूक साहेब बारिस्टर आणिले होते. व बुलढाण्याहून आणि मुंबईहूनही साक्षीदार वगैरे आले होते ते सर्व परत गेले.

प्रांतांत महामारीच्या आजाराचा बराच बोभाटा झाला आहे तरी आमचे स्यानिटरी कमिशनर डा० आबट साहेब चिखलदऱ्याची सुखकारक हवा सोडित नाहींत याबद्दल आश्चर्य वाटतें. कदाचित उंच ठिकाणावरून सर्वत्र चांगलें पाहतां येईल ह्मणून ठेकाडावर बसले असावेत!

### मागाहून आलेली नोटिस.

गुलाम महमद दोस महमद सौदागर दुकान पातुर शेखबाबू तालुके बाळापूर यांस लक्ष्मण राजाराम शिंपी दुकान पातुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमची आमची कपडा व रोख रुपये वगैरेची घेवदेव झाली तिजबद्दल तुमचेकडे सुमार ५०० पांचशें रुपये आमची बाकी घेणें राहिली आहे. तिजबद्दल पांच च्यार वेळां तुह्मास मागणें केलें निदान हिशेब करून बाकी नक्की करून देणें असेंही कळविलें असतां तुह्मी स्वतां येत नाहीं, तडजोड करीत नाहीं व रुपयेही देत नाहीं त्यावरून तुह्मास ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांत उलगडा केल्यास ठीक आहे नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून व्याजासुद्धां व या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेतलें जाईल. मग तुमची तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें तारिख १७ माहे जून सन १८७५ इसवी.

(सही) लक्ष्मण राजाराम शिंपी
दस्तुर खुद.

## वर्तमानसार

ग्रेटब्रिटन मध्यें खाणांतून प्रतिवर्षास ११५००००० टन कोळसा निघतो बेलजिअममध्यें ४९६०००० टन; फ्रान्स

मध्यें ११४१६१७ टन; युनायटेडस्टेट्स् मध्यें ४४००००० टन; प्रसिआमध्यें ३०००००० टन, व आस्त्रिआमध्यें ७००००० टन; निघतो. ग्रेटब्रिटन येथें कोळशाचें सालीना सुमारें ९९०००००० रुपयांचें उत्पन्न होतें. व फ्रान्स, बेलजिअम, युनायटेडस्टेट्स् या प्रत्येक देशास सुमारें १९०००००० रु. चें उत्पन्न होते.

लंडनमधील इंडियाहौस यांतील सर जार्ज क्यांबेल यांची रिकामी झालेली जागा आन. मि. एलिस यांस मिळेल असें टै. कर्ते ह्मणतात.

जयपूरचे महाराज आपल्या मुलखांत हायकोर्ट स्थापन करणार आहेत व त्याजवर दोन हजार रुपये पगार देऊन एका बंगाली बाबू बारिस्टरास नेमणारआहेत.

बाबू राजेंद्रलाल मित्र यांच्या प्राचीन काळच्या माहितीबद्दल व विद्वत्तेबद्दल आक्सफोर्ड युनिव्हर्सिटी त्यांस एल. एल. डी अशी पदवी देणार आहे.

विलायतेस विद्यानिमित्त खर्च— इंग्लंडमध्यें ता. ३१ मार्च १८७४ अखेर वर्षांत १२६८७७३० रुपये साधारण प्रतीची लेखनवाचन विद्या शिकविण्याकरितां खर्च झाले.

उत्तरेकडील रेल्वेवरील नेटिव एंजिन ड्रैव्हर्सच्या नेमणुका होऊं लागल्या. इंडियन रेल्वेच्या बनारस, मांघीर वगैरे रस्त्यावर नेटिव एंजिन ड्रायव्हर्स तयार करून नेमिले.

निजाम सरकारच्या रेलवेकरितां विलायतेंत कर्ज काढण्याचा उद्योग चालू झाला त्याजवरून पार्लमेंटमध्यें ता. ७ रोजीं गोष्ट विचारल्यावरून लार्ड जार्ज हामिल्टन यांनीं सांगितलें कीं, हें कर्ज काढणें गैरकायदा आहे असें नाहीं; परंतु हें परत देण्याबद्दल हिंदुस्थान सरकार जबाबदार नाहीं व हें देवविण्याच्या कामांत मुख्य सरकार हात घालणार नाहीं.

बडोद्याच्या राज्यावर वारसा करणाऱ्या तिघांपैकीं गणपतराव व खंडेराव यांची समजूत होऊन त्यांस वर्षाची पांच हजारांची नेमणूक व एक हजारांचा गाव देण्याविषयीं शिफारस झाली आहे असें टै. चे बडोद्याचे बातमीदार लिहितात.

बंगाल इलाख्यांत "गायकवाड" ह्मणून नवीन नाटक झालें आहे व तें कलकत्ता येथें नाटकगृहांत दोन वेळेस झालें. मंडळीची फार गर्दी झाली होती.

मद्रासचे माजी गवर्नर लार्ड होबर्ट यांच्या गाड्या व घोडे लिलावानें विकले त्यांचें एकंदर १४,००० रुपये उत्पन्न झालें असें समजतें.

हुबळी येथें दरवडा—हुबळी येथें ता. ३० मे रोजीं रात्रीं साठ सत्तर असामींनीं जमून कुऱ्हाडी व काठ्या घेऊन मशाली लावून जाऊन बारा वाजल्यावर गुर्सिदाप्पा नावाच्या व्यपाऱ्याच्या घरावर दरवडा घातला. सुमारें ७,००० रुपयांचा माल लुटून नेला. पोलिसाचा त्या वेळेस ठिकाण नव्हता व पुढें तें चौकशी करीत होतें.

जपानमध्यें स्त्रीशिक्षणाच्या कामास मोठें उत्तेजन मिळालें आहे. येथील राणीसाहेबांनीं ज्या स्त्रियांस स्त्रीशिक्षकांचा धंदा करावयाचा आहे त्यांस शिकविण्याकरितां कालेज स्थापण्याचा निश्चय केला आहे आणि त्यांनीं आपल्या खासगीपैकीं कालेज बांधण्याकरितां पैसा दिला.

झांजिबारचे सुलतान लंडनास तारिख १० रोजीं पोंचले.

चीन व काशगर यांजमध्यें लढाई होण्याचा संभव आहे.

चितूर येथें कांहीं खोट्या नोटी करणारे लोक त्यांच्या सर्व सामानासुध्धां सापडले.

इटली सरकारानें जनरल गारिबाल्डी यांस वर्षाची ४० हजार रुपयांची नेमणूक निरंतरची करून दिली.

प्रिन्स आफ वेल्स यांच्या आदरसत्कारार्थ विजयानगरचे महाराज बनारस येथें मोठी तयारी करीत आहेत. इं. प्र.

---

## ब्रह्मदेशाशीं लढाई होण्याचीं चिन्हें

ब्रह्मदेशाबराबर लढाई होण्याचीं चिन्हें जास्त दिसूं लागलीं आहेत. आह्मास असें वाटलें होतें कीं ब्रह्मदेशाचा राजा व इंग्रज सरकार यांच्यांत आलीकडे हद्दीच्या संबंधानें उत्पन्न झालेला तंटा सरवार उपसल्याखेरीज मिटेल. व अजूनही उभयतां सरकारची लढाई झाल्यावांचून आपसांत समजूत होणार नाहीं असें जरी नाहीं तथापि गेल्या आठवड्यांत तारेंतून आलेल्या बातमीवरून लढाई होण्याचीं चिन्हें जास्त दिसत आहेत. सर. डग्लाज फार्सिथ व दुसरे कांहीं साहेब लोक इंग्रज सरकाराकडून ब्रह्मदेशाच्या राजाकडे तोडजोडीचें बोलणें लावण्याकरितां गेले आहेत. यांच्या संरक्षणार्थ सरकारानें त्यांनबराबर गोऱ्यांची एक कंपनी दिली आहे. सर. डग्लास फार्सिथ हे रंगून ( ब्रह्मदेश ) एथें पोंचून तेथून पुढें ब्रह्मदेशाच्या राजधानीस जाण्यास निघाल्याची खबर आली आहे. इतक्यांत कदाचित् जाऊनही पोंचले असतील व काय झालें तें थोड्याच दिवसांत कळेल. परंतु मध्यंतरीं उभयता सरकारांची जास्त फाटाफाट होण्याचें कारण झालें आहे तें असें:—

भामो हें शहर इरावती नदीच्या काठीं आहे. व तें चीन व ब्रह्मदेश यांच्या सरहद्दीवर आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेथून नैर्ऋत्य दिशेकडील चीन देशाच्या भागास जाण्या येण्यास्तव मार्ग शोधून काढण्याकरितां थोड्या दिवसांपूर्वीं कर्नल ब्रौन हे गेले होते. परंतु त्यांस मार्गांत चिनी लोकांनीं अडविल्यामुळें परत यावें लागलें हें वाचकांच्या लक्षांत असेलच. चिनी लोकांची व कर्नल ब्रौन यांच्या बराबरच्या लोकांची चकमक झाली व मि० मार्गेरे यांस चिनी लोकांनीं मारलें. त्यामुळें ब्रह्मदेशाच्या राजाचें व इंग्रज सरकारचें वितुष्ट जास्त वाढलें. हें आणखी जास्त वाढण्यास नुकतेंच दुसरें कारण झालें तें असें—चीनच्या पश्चिम सरहद्दीवरील मोमीन नामक परगण्याचा लेसिथै नावाचा गव्हर्नर आहे व कर्नल ब्रौन यांस परत यावें लागलें ते गव्हर्नराच्या हाताखालच्या फौजेनें जाऊं न दिल्यामुळें परत यावें लागलें. ह्मणून लसिथै हा इंग्रज सरकारचा उघड शत्रू झाला आहे. आतां हल्लीं असें कळतें कीं ब्रह्मदेशच्या राजाचे भेटीकरितां लासिथै मांडलें एथें आला असून त्याचे राजानें उत्तम प्रकारचें आगतस्वागत ठेविलें आहे. राजाचें व लासिथै यांचें बोलणें झालें त्यांत लासिथै यानें राजास असें आश्वासन दिलें आहे कीं इंग्रज सरकाराबराबर लढाई सुरू झाली असतां साठ हजार चिनीफौजेनिशीं मी तुमच्या कुमकेस येईन. ब्रह्मदेश अगदीं स्वतंत्र आहे परंतु इंग्रज सरकारच्या उघड शत्रूची ब्रह्मदेशच्या राजानें भेट घेतली व त्याचें उत्तमप्रकारें आगतस्वागत ठेविलें ह्मणून इंग्रज सरकार क्रोधाविष्ट झालें आहे असें दिसतें. ता० ७ माहे मजकूरची अलाहाबादेहून तार आली आहे तींत असें लिहिलें आहे कीं ब्रह्मदेशच्या राजानें लासिथै यास भेटून त्याचें आगतस्वागत काय ह्मणून ठेविलें याचें कारण सांगितल्याखेरीज हिंदुस्थान सरकार ब्रह्मदेशच्या राजाबराबर हद्दीच्या तंट्याचे संबंधानें कांहींएक व्यवहार ठेवावयाचें नाहीं. सर डग्लाज फार्सिथ यांच्या जाण्यापासून आतां काय उपयोग होईल तो होवो परंतु सदरील तारेंत लिहिल्या प्रमाणें हिंदुस्थान सरकारानें ब्रह्मदेशच्या राजाबराबर रदबदली करणें एकदम बंद केल्यास लढाईशिवाय दुसरा मार्ग रहाणार नाहीं व ती लवकरच करावी लागेल.

ब्रह्मदेशच्या राजाबराबर हल्लींचा बेबनाव होण्यास कारेन प्रांताच्या सरहद्दीचें कारण लाविलें आहे तथापि खरें कारण कर्नल ब्रौन यांस जाऊं दिलें नाहीं व मार्ग शोधून काढण्याकरितां त्यास ब्रह्मदेशच्या राजानें चांगली मदत केली नाहीं; अथवा आंतून कर्नल ब्रौन यांचा पाडाव केला ही गोष्ट आमच्या सरकारच्या पोटांत खळबळत आहे असें दिसतें. ब्रह्मदेशाबराबर बेबनाव होण्यास ही गोष्ट कितपत कारण झाली असेल ती असो. परंतु याच गोष्टीकरितां आमचें सरकार ब्रह्मदेशावर लढाई करण्यास तयार झालें असेल तर त्याच्या हातून अन्याय होत आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. कारण कर्नल ब्रौन यांच्याबराबर डाक्टर अंडर्सन या नावाचे एक गृहस्थ होते. डाक्टर अंडर्सन यांनीं असें लिहिलें आहे कीं चिनी लोकांनीं कर्नल ब्रौन यांस जाऊं दिलें नाहीं यांत त्यांस दोष देतां येत नाहीं, कारण इरावती नदींतून चीन देशाच्या नैर्ऋत्य सरहद्दीपर्यंत मार्ग खुला झाला ह्मणजे चिनी लोकांच्या हातून व्यापार जाणार व तो न जाण्याकरितां चिनी लोकांनीं ब्रौन साहेबास मार्गांत अडवून परत हाकून लाविलें यांत त्या लोकांचा दोष नाहीं. डाक्टर अंडर्सन यांचें सदर्हू ह्मणणें अगदीं रास्त आहे हें सांगणें नको. परंतु चिनी लोक आपल्या घरांत इंग्लिश व्यापाऱ्यास शिरूं देत नाहींत व शिरूं देण्यास ब्रह्मदेशच्या बादशहानें मदत केली नाहीं अथवा आंतून चिनी लोकांस फूस दिली अशा निमित्तावरून त्याशीं लढाई करण्यास उभें रहाणें हें न्यायास अनुसरून कितपत आहे हें सांगणें नको. ब्रह्मदेश व इंग्रज सरकार यांमधील बेबनाव जास्त वाढत चालला आहे हें पाहून आमचे एथील मुंबई ग्याझेट पत्रास अत्यानंद झाला आहे. ग्याझेट कर्त्यानें गेल्या बुधवारच्या अंकांत असें लिहिलें आहे कीं "लासिथै यानें ब्रौन साहेबावर व त्यांच्या बराबरील लोकांवर जो न कळत घाला घातला तो घालण्यास ब्रह्मदेशच्या राजाची आंतून फूस होती असा किंत्येक महिन्यांपासून संशय आहे. व आतां राजानें लासिथै याची भेट घेतली तेव्हां या गोष्टींत आपण मिलाफी होतो असें राजानें उघडपणें कबूल केल्यासारखें झालें आहे. लढाई सुरू करण्याच्यापूर्वीं भेट घेण्याचें कारण विचारलें जाईलच. रंगून व चीनची सरहद्द यांच्यांत व्यापार वाढण्याकरितां मी मदत देईन असें ब्रह्मदेशचा राजा नेहमीं ह्मणत असे. परंतु सरहद्दावरील चिनी अधिकारी ब्रौन साहेबास न जाऊं देण्याच्या कामीं ब्रह्मदेशच्या राजाच्या अनुसंगानें वागत असावे असें दिसतें. या कामांत चीन व ब्रह्मदेशच्या अनुयायांनीं ब्रौन साहेबावर हल्ला केल्यामुळें लढाईस प्रथम आरंभ केला आहे तेव्हां आतां लढाई सुरू करण्याशिवाय हिंदुस्थान सरकारास दुसरें कांहीं उरलें नाहीं.

सदर्हू प्रकारच्या मतलबाचा मजकूर लिहिल्यानंतर ग्याझेटकर्त्यानें लिहिलें आहे तें असें—"ब्रह्मदेशचें मुख्य शहर मांडलें हें सर केलें ह्मणजे ब्रह्मदेशचें राज्य खालसा केलें असतां आपल्यास लोक वाईट ह्मणतील; असा विचार मनांत न यावा अशी आमची इच्छा आहे. हिंदुस्थानांत मांडलिक राजे पुष्कळ आहेत ह्मणून ब्रह्मदेशचें राज्य घेऊन पुनः तें त्यास परत दिलें असतां राज्यदृष्ट्या मोठी चूक होणार आहे. कारण असें केलें असतां ब्रह्मदेशचा राजा इंग्रज सरकाराविरुद्ध पुनः खटपट करणार आहेच. पूर्वेकडील देशांत राजघराणीं फार दिवस चालत नाहींत व त्यापासून लोकांवर जुलूम होतो. करितां ब्रह्मदेशच्या राजास पदच्युत करणें हेंच योग्य आहे. इंग्लिश लोकानीं ब्रह्मदेशच्या राजास असें कोणचें दुःख दिलें आहे कीं ह्या राजानें त्यांच्या वाटेस जावें? व्यापार वाढवून या प्रदेशांतील ‘( चीन ब्रह्मदेश वगैरे ) लोकांची संपत्ती वाढविण्याचा काय तो इंग्रज लोकांचा हेतु होता. इरावती नदीच्या मुखापासून भामोपर्यंत सुमारें सातशें मैल इतकीं या नदींत तारवें चालतात. व येथून चीनची हद्द सुमारें दीडशें मैल रहाते. चीन देशाबराबर इंग्रज सरकारचा सल्ला आहे व इंग्रज लोकांचें राजाजवळ इतकेंच मागणें होतें कीं त्यांस त्यानें सदरहू दीडशें मैलांतील मार्गानें जाऊं द्यावें."

ग्याझेट कर्त्याचे सदरहु प्रकारचे उद्गार वाचून कोणास आश्चर्य व दुःख होणार नाहीं? आह्मास असें वाटतें कीं ग्याझेट कर्ता हल्लीं जितका अंध झाला आहे तितकें हिंदुस्थान सरकार अजून झालें नाहीं.

ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० २७ माहे जून सन १८७५ इ० अंक २६

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### नोटिस.

नोटिस – विरदीचंद धनसुकदास मारवाडी दुकान उकळी तालुके मळगाव यांस लक्ष्मणदास रतनचंद मारवाडी दुकान मौजे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे आमचे दरम्यानची मातीची भिंत चांगली विटेबंदी बांधण्याकरितां आम्ही उलगडली असतां तुह्मी बांधण्यास हरकत करितां याजकरितां तुह्मास या नोटिशीवरून कळविण्यांत येते कीं, तुह्मी भिंत बांधण्यास हरकत करूं नये. आम्ही सर्व मालमसाला विकत घेऊन व माणसें लावून तयार ठेविलीं आहेत व आतां काम सुरू करणार, इतक्याउपर तुह्मी हरकत केल्यास व काम न होऊं दिल्यास आमचे मालाचें सुमार दोन हजार रुपयांचें नुकसान होईल तें तुह्मापासून भरून घेतलें जाईल. व तुह्मी भिंत न बांधू दिल्यानें आमचें घर खुलें रहात आहे त्यांस या बरसातीचे दिवसांत कांहीं नुकसान झालें अगर घर उघडें राहिल्यामुळें कांहीं दगाफटका झाला तर त्याचें जोखीम तुह्मावर पडेल. व आम्ही मालाच्या नुकसानीबद्दल आठ दिवसांचे बाद तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करू व या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेऊ कळावें. तारीख १८ माहे जून सन १८७५ इसवी.

(सही) लक्ष्मणदास रतनचंद
मारवाडी
दुकान उकळी
दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

### अस्याची साहेबाचें भाषण

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः–

वि० वि० कां रावसाहेब ठीक आहेना? आपला निःपक्षपातीपणा कसास लाऊन पहाण्याच्या हेतूनें आपणाकडे आज दोन ओळी लिहून पाठविल्या आहेत त्या छापण्याची मेहेरबानी व्हावी.

आपले तारीख ११ जूनचे अंकांत 'एक राजनिष्ठ' या सहीचें पत्र छापलें आहे तें पाहून मला फारच चमत्कार वाटला. ह्या लिहिणाराचा मुख्य हेतू हांजी हांजी करणाराचें खंडन करण्याचा आहे. तो त्याचा हेतु कितपत सिद्धीस गेला कोणास कळे. रिकामटेकडे व टवाळ लोकांचीं हीं कामेंच आहेत," कीं उगीच बसल्या बसल्या कोणाची टवाळी करावी. परंतु येणेंकरून लोकांत त्याचा शहाणपणा तर कळून येत नाहीं पण मूर्खपणा व अज्ञानमात्र बाहेर पडतें-

उमरावती येथें महाराणी साहेबांच्या जन्मदिवसाप्रीत्यर्थ तारीख २९ मे रोजीं सभा भरली होती त्या प्रसंगीं तेथील, अस्याची खान बहादूर नवाब साहेब हे प्रेसिडेंट होते त्यांत त्यांनीं इंग्रजींत कांहीं भाषण केलें ते प्रमोदसिंधूंत छापून प्रसिद्ध झालें. त्या भाषणांत वऱ्हाडचे कमिशनर ह्यांची कांहीं स्तुति होती, व बडोद्याच्या संबंधानें न्याय केला असें होतें, व प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत येणार ह्मणून आनंद प्रदर्शित केला होता. हे तुमच्या विद्वान व अक्कडबाज लिहिणारास न खपून त्यास अतिशय राग आला. त्यानें लागलेंच 'रिकामा न्हावी भिंतीला तुमड्या लावी' या ह्मणी प्रमाणें पत्र खरडलें व वर सांगितल्याप्रमाणें सभेंत बोलणें ह्मणजे हांजी हांजीं करणें होय असें त्यास वाटून त्या हांजी हांजी करणाराचें मुद्देसूत खंडन करण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे.

तो लिहिणारा ह्मणतो कीं, ह्या सर्व गोष्टी नवाब साहेबांनीं आपणाला अ. क. ची जागा मिळावी ह्मणून केल्या. पत्रकर्ते महाराज ह्या गोष्टीचा आणि अ. क.ची जागा मिळण्याचा काय बरें संबंध? कमिशनर साहेबांची स्तुती करून नवाब साहेबाना अ. क. ची जागा मिळवायास नको. ह्या बाबद अधिकाऱ्यांचा १ वर्षे झाल्यावर ह्यांस असिस्टंट कमिशनरची जागा मिळावी ह्मणून ठरावच झाला आहे. परंतु हें तुमच्या लिहिणारास कळावें कसें? हे पडले अक्कडबाज! ह्यांनीं फक्त डावेकानावर रुमाल फेंकून गांवांत टवाळ्या करीत फिरावें. इतर गोष्टींच्या माहितीच्या नावानें आवळ्या येवढें शून्य.

हे तुमचे शहाणे लिहिणार असें ह्मणतात कीं नवाब साहेबांनीं आपण राजनिष्ठ आहोंत असें मुद्दाम दाखविण्याचा आव घातला यास सयुक्तिक कारण या माहितीशून्य मनुष्यानें असें दाखविलें आहे कीं नवाब साहेबांनीं भाषण केलें तें उतरून घेण्यास प्रमोदसिंधु कर्ते यांच्याजवळ शार्ट ह्यांड रायटर्स नाहींत तेव्हां तें त्यांनीं आपण राजनिष्ठ आहोंत हें लोकांना कळावें ह्मणून तें लिहून ठेविलें असावें व तें प्रमोदसिंधु कर्त्यांकडून त्यांनीं होऊन छापविलें. वाहवा! काय तर्क! आणि काय ज्ञान! तें भाषण नवाब साहेबांनीं होऊनच छापविलें असा अंदाजा या तुमच्या विलायती लिहिणारानें कोठून व कसा काढला बरें?

प्रमोदसिंधु कर्त्यांजवळ शार्ट ह्यांड रायटर्स नाहींत ही गोष्ट त्यांनां विचारली असतां तेही कबूल करतीलच. परंतु हें भाषण नवाब साहेबांनीं होऊन छापविलें असें कळण्यास या माहिती शून्य मनुष्याजवळ रिपोर्टर आहेत कीं काय! कोणास कळे? आणि असल्यास ते असे तसे नसावेत तर चित्रगुप्त असावेत कारण नवाब साहेबांच्या मनांतील गोष्ट दुसऱ्या जाणण्याची शक्ति नाहीं व कळण्याचाही संभव नाहीं.

जर ह्यांजवळ चित्रगुप्त रिपोर्टर नसतील तर हे स्वतः तरी मनकवडे असावेत. धन्य होय बाबा. ह्या लिहिणाराची! अक्कल तर बिलकुल नाहीं असें वाटतें. कोणास कांहीं भाषण करावयाचें असलें तर तो आपण काय बोलणार हें टिपून ठेवीत असतो. राणीच्या जन्मदिवसाप्रीत्यर्थ सभा झाली. आणि त्यांत नवाबसाहेबांनीं भाषण केलें, तें छापावें हें पत्रकर्त्याचें काम आहे. त्याप्रमाणें त्यांनीं नवाब साहेबांस विनंती करून त्यांचें टिपण मागवून आणून छापलें असावें हें उघड व विशेष संभवनीय आहे. परंतु ज्यास थोडा अकलेचा गंध असेल त्यासच ह्या गोष्टी कळणार, पण तुमचे लिहिणारे पडले अक्कलशून्य, त्यांनां ह्या गोष्टी कळल्या नाहींत ह्मणून मी कांहीं दोष देत नाहीं. कारण मूर्खाला एकादि गोष्ट समजली नाहीं ह्मणून समंजस लोक त्याला कधीं दोष देणार नाहींत. परंतु त्यास मूर्ख ह्मणतील.

नवाब साहेबांनीं प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत येणार ह्मणून आपल्या भाषणांत आनंदप्रदर्शित केला तो ह्या तुमच्या मनकवड्या व अक्कलशून्य मनुष्यास आनंद न वाटतां रडायला आलें. आतां त्यास लोकांनीं काय करावें ? रड्याला जर हसायला येत नाहीं व कोणत्याही गोष्टीचा आनंद होत नाहीं तर त्यानें खुशाल आपलीं दारें बंद करून प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत येणार ह्मणून आनंद दाखवू नका असें जर रड्यानें सांगितलें तर दुसरें कोणी ऐकणार नाहीं.

मी पुर्वीं लिहिल्याप्रमाणें या शहाण्या मनकवड्या अक्कलशून्य मनुष्याचा हेतु असा होता कीं हांजी हांजी करणाराचें खंडन करावें परंतु हांजी हांजी कोणी केली हें कांहींच स्पष्ट करून दाखविलें नाहीं. खेरीज त्यानें जो प्रकार तुह्मांस लिहून कळविला तो खरोखरच हांजी हांजीचा प्रकार आहे असें जरी कबूल केलें तरी त्याचें खंडन केलेंही कोठें आढळण्यांत येत नाहीं.

हांजी हांजी करणाराचें
खंडन करणाराचें खंडन
करणारा
क्ष

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. खालील मजकुरास अवश्य आपले पत्रीं जागा मिळेल अशी आशा धरून तसदी दिली आहे.

मेहेकर तालुक्यांत मे. हणमंत रामचंद्र नवीन तहशिलदार आल्यापासून प्रजा फार सुखी आहे ती कशी ह्मणाल तर ज्याप्रमाणें पूर्वीं एका लहानशा कामासाठीं गावाहून ७।८ शेर पीठ बांधून ५।६ दिवस लागत होते तसें आतां होत नसून आज गेलें कीं संध्याकाळीं आपले घरीं यावें यामुळें रयत परमेश्वरापाशीं प्रार्थना करून आहे कीं, हे तहशिलदार नेहमीं सुखी ठेवून आमचे येथें राखवेत.

हे तहशिलदार आल्यापासून तालुक्यांत १९ । २० किंबहुना जास्त नवीन चावड्याही झाल्या आहेत परंतु जे मोठमोठाले पाटील लोक आहेत त्यांनीं चावड्या कोणत्या प्रकारें केल्या ह्मणजे लाकडें कोठून आणिलीं, जंगलांतून आणिलीं तर फारेस्टचा पैसा आदा केला किंवा नाहीं. जर नंबरांतून आणलीं तर त्या नंबरांत चावड्यास लागल्याप्रमाणें लाकूड आहे किंवा नाहीं. जंगलांतून लाकडें रयत लोकांनीं आणलें असतील त्यांस सरकारठरावाप्रमाणें पैसा मिळाला किंवा नाहीं. सुतार लोकांस व त्यांचे हाताखालील मजुरदारांस पैसा कसा मिळाला. ज्या गावीं नदी नाहीं त्या गावीं बेलदारास पाणी कोण काढून देत होता, मजूर असल्यास पैसे मिळाले किंवा बिगारींत भरलें गेलें. गारा किती दिवस कोणकोणत्या बेलदारानीं केला. व गारा उचलण्यास मजुरदार होते कीं गावांतील वतनदार महारानें उचलला. गावांतील महारलोकांनीं उचलला तर त्यांस पैसे देऊं नयेत किंवा कसें. याजवर जर आमचे रयत पोषण करणार तहशिलदार यांणीं लक्ष दिलें तर गरीब लोक यांस फार दुवा देतील.

पत्रविस्ताराबद्दल माफी असावी. पुढें लवकर सेवेंत हजर होईन. कळावें. तारिख ७ माहे जून सन १८७५ इसवी.

एक तालुके व जिल्हे पहाणारा
[illegible]

### वाचकहो मनरंजक इतिहास वाचा हो वाचा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. कां एडिटर साहेब, ठीक

आहे न ? मला वाटतें कीं आपण आपल्या एडिटरशिपेचा चांगला उपयोग करीत नाहीं. कां ह्मणाल तर त्याचें उत्तर मी पुढें कधीं तरी देईन. परंतु त्यांत कांहीं आपणाकडे फारसा दोष नाहीं. शंभरापैकीं साठ असेंच करितात. आपला आमचा स्नेह पडला फारच; आपल्या वाचकांची करमणूक करावी अशी आमची मनापासून इच्छा व अशा हेतूनें आपल्या येथ्या पत्रीं काय लिहावें अशा भ्रांतींत पडलों होतों, व पोथी पुस्तकें पहात होतों इतक्यांत धुरकटलेल्या एका पोथीच्या तगडांत थोडा गमतीचा प्राचीन वृत्तांत सांपडला तो आपणाकडे पाठविला आहे, तेवढा छापून प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी व्हावी. वृत्तांत छापण्या पूर्वी कृपा करून असें करा कीं वाचकांना संदर्भ नीट लागावा यासाठीं खाली लिहिलेली माहिती प्रथम छापा. असो आपण जरी सध्या निकृष्ट स्थितींत आहों, परद्वीपस्थ लोकांच्या पादाक्रांत झालों आहों. आह्मामध्यें आतांच्या क्षणाला कित्येकांच्या मताप्रमाणें नीति, धर्म, बल, स्वदेशप्रीति आणि शौर्य वगैरे गुणांचा जरी ऱ्हास झाला आहे तरी आपले पूर्वज मोठे दिग्विजयी होऊन गेले यांत संशय नाहीं. सध्या आपल्या लोकांत नौकाशास्त्र. जरी फारसें सांपडत नाहीं तथापि प्राचीन कालीं आह्मां लोकांत ती विद्या पूर्ण होती व आतां ज्या प्रमाणें आह्मांवर परद्वीपस्थ राज्य करित आहेत, तद्वत आपले लोकही मोठ मोठीं गलबतें तयार करून व त्यांत कवाईत शिकवून तयार केलेले शिपायी घालून समुद्रांत दूरवरचीं पर्यटणें करीत. परद्वीपाशी लढाई करीत, व तेथें आपल्या राजांचे झेंडे फडकत सोडून आनंदानें राज्यें करीत. ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं सवाशाव्या वर्षीं कित्येक धाडस हिंदुलोक पासिफिक महासागरांतील कित्येक बेटें घ्यावींत, व तेथें आपलीं निशाणें झळकवावीं, अशा हेतूनें लाखो हत्यारबंद लोक बरोबर घेऊन निघाले. परमेश्वराच्या कृपेनें वारा अनुकूळ लागल्या कारणानें ते तीन महिन्यांच्या आंत त्या महासागराच्या मध्य प्रदेशीं गेले. सुमारे दोन कोसांवरून एक प्रकारचें पिवळें तेज त्यांस दिसूं लागलें. तें काय असावें असा विचार करिताहेत तों आणखी एक कोस गलबत गेलें व पूर्वींच्या स्थलापासून येणारे पिवळें तेज अधिकाधिक दाट दिसूं लागलें, त्या स्थाना पासून सुगंध, शीतल आणि मंद वायू गलबतावर आल्या कारणानें व फार दिवस जमीन न दृष्टीस पडल्या कारणानें त्यांस फार आनंद झाला. ही सुवर्ण भूमी असावी कीं काय असें त्यांस वाटूं लागलें. सारांश परमेश्वराची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. ते त्या बेटावर जाऊन उतरले. बेटाचा आकार त्रिकोणाकृति आहे. त्यांत उत्तरेस तीन मोठ्या नद्या आहेत. तेथील रहाणारे लोक फार भोळे होते. नद्या, पर्वत, गाई, घोडे, अग्नी, वायु इत्यादिकांची ते पूजा करीत. या नवीन गेलेल्या हिंदु लोकांच्या टोळीनें त्यांस विश्वास दाखवून लुच्चेगिरीनें आपल्यास वश करून घेतलें व पुढें ते ताब्यांत आल्यावर त्यांनीं त्यांस पाहिजे त्या रीतीनें वागविलें. त्या बेटांत त्यांनीं पुष्कळ निर निराळीं राज्यें स्थापिलीं. त्या पैकीं पश्चिमेकडील आखाताजवळचें एक आणि मध्य भागांतील एक अशीं दोन राज्यें फारच सुरेख होतीं. या नवीन गेलेल्या लोकांनीं, पश्चिमेकडील राज्यावरचा पहिला राजा फारच गमतीनें गादीवरून काढून राज्य आपल्या ताब्यांत घेतलें व मध्य प्रदेशांतील रामाची वाट त्यांनीं काय लाविली ती काण जाणें, पण तें राज्य स्वताच्या ताब्यांत आल्यावर त्यावर ते आपण होऊन राज्य चालवीत. आतां खालच्या वृत्तांतावरून त्या राज्य चालविणारांची अक्कल, त्यांची विचारशक्ति, न्याय करण्याविषयीं त्यांची उत्सुकता, जिंकितांचें कल्याण करण्याविषयीं मनाची हौस वगैरे सर्व गुण दिसून येतील. एकदा या राज्यांतील राजधानींत एक मोठा चमत्कार झाला तो असा—तेथील न या नावाचा रहिवासी इकडून गेलेल्या एका बड्या हिंदूच्या नोकरीस होता. व गृहस्थ प्रामाणिक वाटल्यावरून त्या हिंदूनें त्यास सरकारी कामांत गुंतविलें. न ची प्रामाणिकपणाविषयीं जिकडे तिकडे बरीच कीर्ति झाली होती. या न च्या हातून पुष्कळांनीं नोकरी घेतली पण त्याच्या वस्तादीपणाच्या कारकुनीचा कोणास काडीमात्र संशय आला नाहीं. शिवाय हे हिंदु पडले तेथील राज्यकर्ते, सगळे लढाऊ, कोणी सेनापति, कोणी उपसेनापति, कायदाकानू त्यांनीं फारसा पाहिला नव्हता. आपला अधिकार किती, आपण करितों आहों हें काम आपल्या ताब्यांत आहे कीं नाहीं याचा देखील कधीं कधीं ते विचार करीत नसत. असो अशा प्रकारचे न च्या वरचे बहुतेक अधिकारी होते. मग ननें एकदा त्यांच्या हातावर तुरी देऊन चांगला डल्ला मारिला व आपल्या पोराबाळांचें कल्याण करण्याचा उपाय केला. ननें लुटण्याचें काम केलें तें उगेच नाहीं, वरच्या अधिकाऱ्यांस कळतांच त्यांच्या पोटांत गोळा उठला. आतां या अधिकाऱ्यांना जबाब द्यायचा होता त्यांच्या वरिष्ठांकडे ह्मणून त्यानीं नचा पाहिजे तसा पिच्छा पुरविला. पण तो पडला जबरदस्त, तो कशाला अशा तशास दाद देईल- नला समज देऊन पाहिलें, धमकी देऊन पाहिलें, मारून पाहिलें, व उपरांत जेव्हां कोठें कांहीं थांग लागेना तेव्हां या अधिकाऱ्यानें कहर मांडिला आधींच कायद्याचा अभाव आणि तशांत ननें फसविलें, मग काय पुसतां नचा जितक्याशीं संबंध होता तितक्यांची धूळधाण उडविण्याचा कारखाना सुरूं झाला. त्या वेळेस तेथील रहिवाशांना न या अक्षरानें आरंभ होणारा शब्द उच्चारण्याची देखील मुष्किल पडूं लागली. कोणी सन्याश्यांनीं नारायण ह्मटलें अगर कोणी शास्त्र्यांनीं नारायण या नावाची व्युत्पत्ति किंवा चर्चा करितांना ऐकिलें कीं त्यांची तपासणी सुरूं. कोणी पोराला नारायण ह्मणतांच बापाला महिपतीचें स्मरण आलेंच असा भाक माजला. फार काय सांगावें जरी न चा कोणी आप्त पांच पन्नास कोसांवर असला तरी त्याला या अधिकाऱ्यानें पाहिजे त्या रीतीनें चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत ओढण्याचा सपाटा चालविला. या धांदलींत त्यानें अनेक कडक कृत्यें केलीं व बहुतांचें वित्त जप्त करून नेलें. त्या नच्या बावतींत बहुत लोकांची विनाकारण मानखंडना झाली व शहाण्या ह्मणविणाऱ्या लोकांचे कागदपत्र देखील खडाखड बाहेर पडले. सारांश जिकडे तिकडे त्या तीव्र अधिकाऱ्यानें बारकाईचा शोध चालविला. तेणेंकरून सर्वत्र हाहाकार झाला.

पत्रकर्ते महाराज आतां उशीर झाला पुढचा इतिहास पुढें सांगेन पण हें बेट कोणचें हें तुमच्या ध्यानांत येईल काय? आणण्यास खटपट करा ह्मणजे या गोष्टीचा संदर्भ लागून तुह्मांला सर्व कळेल कळवें लोभ करावा ही विनंती. तारीख २१ माहे जून सन १८७५ इसवी.

वाचकरंजक

---

# वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ९ शके १७९७

## ब्राह्मण हजामती करावयास लागले!

हें सदर पाहून आमचे कित्येक वाचकांस आश्चर्य वाटेल व कित्येक "हजामत करणें" या शब्दाच्या लाक्षणिक अर्थाकडे वळतील पण आम्ही त्यांस निक्षून सांगतो कीं तसें कांहीं नाहीं. प्रचारांत असलेल्या खऱ्या शब्दार्थाप्रमाणें न्हाव्याचें हजामत करण्याचें काम ब्राह्मण लोक धोकटी, वस्तरा, आरसा वगैरे घेऊन राजरोस करूं लागले.

ही गोष्ट पुणें मुक्कामीं सुरूं झाली आहे; एक दिवस तेथील ब्राह्मण मंडळींत विच्यार ठरला कीं, न्हावी लोक च्यार च्यार पैसे हजामतीस घेतात हे फार आहेत व बहुत गोर गरिबांस ते देतां येत नाहींत. सबब सर्वांनीं एकोपा करून न्हाव्यांस असें कळवावें कीं तुह्मी मुलापासून एक पैसा व थोरल्या मनुष्यापासून दोन पैसे घेत जावें; नाहींपेक्षां आम्ही तुह्मापासून हजामत करणार नाहीं. व त्याप्रमाणें कांहीं लोकांनीं कट करून न्हाव्यास सांगितलें पण ते घमंडीवर होते त्यांनां वाटलें कीं, आपणाशिवाय लोकांच्या हजामती करणार कोण ? ह्मणून त्यांनीं दर उतरला नाहीं व लोकांनीं त्यांपासून हजामती करावयाचें सोडून दिलें,

मागें वाजंत्री लोकांनीं वाद्याचे दर चढविल्यावरून लोकांनीं कट केला होता कीं लग्न मुंज वगैरे मंगलकार्यांत वाजंत्री बोलवावयाचे नाहींत व ही प्रतिज्ञा बहुत लोकांनीं शेवटास नेली. ज्यांचे घरीं त्याच सुमारास मंगलकार्यें झालीं तीं त्यांनीं वाजंत्र्यांशिवाय नुसत्या टाळ्या व ताशानें वाजवून केलीं. त्यामुळें वाजंत्री लोक मऊ झाले व लोक देतील ते घेऊं लागले. तसा प्रकार न्हाव्यांविषयींही, लोकांचा चांगला एकोपा राहिल्यास, होईल यांत भ्रांति नाहीं. खरोखरच असल्या स्वस्ताईच्या दिवसांत सामान्य प्रकारच्या मजुरानें पाव तासाला एक आणा मजुरी मागणें ही अधिक आहे. सबब पुण्याच्या लोकांनीं कट केला तो निरर्थक आहे असें नाहीं. अशानें न्हावी लोक पैसे कमी घेण्यास कबूल होतील किंवा त्यांचें काम करण्यास नवीन दुसरा वर्ग तयार होईल. त्याप्रमाणें पुण्यास सदाशिवपेठेंत शेवड्यांच बोळांत च्यार ब्राह्मणांचीं मुलें हजामती करण्यास नवीन तयार झालीं आहेत व तीं मुलामुलांच्या हजामती प्रथम करूं लागलीं आहेत.

ब्राह्मणानें हजामती करणें हें जातिसंबंधानें व धर्मसंबंधानें दूषणीय आहे कीं काय याचा खुलासा आतां समजला पाहिजे व तो वे. शा. रा. विष्णु शास्त्री पंडित लोकांस कळवितील तर बरें होईल. आह्मांस वाटतें कीं मुंजीच्या प्रसंगीं न्हाव्यापासून वस्तरा मागून घेऊन वपनाचा संस्कार प्रथम ब्राह्मणच करीत असतात आणि तें खरें असेल तर हल्लीं पुण्यास मुलें तयार होत आहेत त्यांची जात बाटणार नाहीं व आणखी लोक तयार होतील, निदान न्हावी तरी ताळ्यावर येतील.

आजच्या काळांत लोकांच्या मोठ्या समुदायांत येका जातींच्या थोड्या लोकांचा दुराग्रह चालणार नाहीं. आमच्या अकोल्यास नुकतीच बाजार बैठकीची पट्टी बसली आहे ती आह्मावर बसू नये ह्मणून कासार लोकांनीं अर्ज केला होता पण पट्टी सुटली नाहीं ह्मणून ते रुसून बसले. व बाजारांत येईनासे झाले व घरोघरही बांगड्या भरीतनासे झाले. या गोष्टीचा थोडा बोभाट होतांच बाहेरून नवीन कांहीं दुकानें येथें आणविण्याचा लोकांचा बूट निघाला त्याबरोबर सर्व कासार लोक घरोघर बांगड्या भरूं लागले पण अजून बाजारास जाऊं लागले नाहींत तरी लवकरच शिल्केंत असलेली पुंजी सरण्याचा सुमार दिसला ह्मणजे बाजारासही जाऊं लागतील. त्यांनां असें वाटतें कीं आमच्या अशा हट्टानें सरकार आह्मावरील कर कमी करील पण ती आशा त्यांनीं समूळ सोडली पाहिजे.

---

## शेतकरी लोकांचे दंगे.

अलीकडे थोडे दिवसांत दक्षिण प्रांतीं पुणें व नगर जिल्ह्यांतील कित्येक तालुक्यांतील शेतकरी लोकांनीं व इतर रयतेनें मोठे दंगे केले, त्यांचा प्रकार नवीनच ऐकण्यांत आला. दिवसा ढवळ्या शें पन्नास लोकांनीं एकत्र जमावें आणि गावाचे शिवेवर सरकारी धरणें येण्याचा रोख समजण्याकरितां कांहीं लोक पाळतीवर ठेवून सावकार लोकांच्या घरांत बेधडक शिरावें. आणि रोख्यांचें दप्तर कोठें आहे

आहे तें विद्यारानें व सोटा चालवावा. त्याच्या बायका पोरांवर जुलूम करावा, घर दार लुटावें, जिनगी अस्ताव्यस्त करावी. व कागदपत्र जाळून टाकावे असें दहा पांच ठिकाणीं झाल्याचें समजण्यांत आलें आहे. शेतकरी लोक ह्मणतात कीं या मारवाड्यांनीं, या शिंशड्यांनीं, या गुजरांनीं, या वाण्यांनीं आह्मास फार गांजिलें, एकेक रुपयाचे पांच पांच रुपये घेतले तरी शेकडों रुपयांचे रोखे आमच्या नावचे यांच्या जवळ अजून आहेतच. एकदा या लुच्चांचे १०।५ रुपयांचे कर्जदार आम्ही झालों ह्मणजे तीन पिढ्यांला आमच्या भिसरकाळा हे जळूंसारखें शोषण करावयास लागलेत. यांच्या योगानें आम्ही जन्माचे बंदे गुलाम होऊन गेलों आहों तरवें यांचीं तोंडें काळीं होतील. व यांच्या घरादाराचें वाटोळें होईल तें आह्मास अवश्य केलें पाहिजे असें ह्मणून बहुत मारवाड्यांस त्यांणीं लाथा बुक्यांनीं कुटिलें व काठ्यांनीं झोडपलें तेणेंकरून साहू सावकार व उदमी लोकांस तिकडे पराकाष्ठेची दहशत बसून गेली आहे. सरकारास पत्ता लागला तेथें तेथें दंगा करणार लोकांस पकडून त्यांस शिक्षा दिल्या अशी तिकडे मोठी गर्दी होऊन गेली आहे तरी कोठें कोठें कांहीं नवीन वूड ऐकू येतोच सावकाराचें जबरदस्त व्याजानें रयत अगदी गांजून गेली आहे. व ती जिवावर उदार होऊन असें कृत्य करीत आहे असें ह्मणतात पण सर्वत्र तसें नसेल तरी या गोष्टीवर सरकारानें लक्ष्य पोंचवून कांहीं उत्तम तजवीज करावी.

## वऱ्हाड

क्या० फिटझरल्ड साहेब वाशिमचे डिपुटी कमिशनर रजेवरून गेल्याआठवड्यांत येथें परत येऊन वाशिमास गेले. व मि० मेलिस साहेब येथें आले.

---

**महामारी**—लिहिण्यास दुःख वाटतें कीं या आठवड्यांत या बाईचा प्रसार जास्त आहे. व ती दररोज ९।४ प्राण्यांचा बळी घेते; तरी दुःखांत सुख हें आहे कीं आजारी झालेल्यांतून तृतीयांश मरण पावले तर दोन तृतीयांश बरे होतात. डिपुटी कमिशनर साहेबांचें लक्ष्य स्वच्छतेकडे व आजाऱ्याचे काळकळीकडे फार आहे. पेठेंत दवाखाना आहेच तरी गावांत पोलिस स्टेशनावर एक आणखी नवीन डाक्टराची योजना केली आहे, व डाक्टर लेंग इनच्यार्ज्य तहशिलदार, व मि. किसनसिंग चीफ कानस्टेबल हे दररोज गावांत फिरून आजाऱ्यांचा तपास कारितात. येथील अडाणी लोक घरचें मनुष्य आजारानें अगदी जेरीस आल्यावर मग औषधोपायाचे तजविजीस लागतात त्यामुळें कधीं कधीं अधिक वेळ रोग बळकावल्यास चांगला इलाज होऊं शकत नाहीं याजकारितां आमची इच्छा आहे कीं डिपुटी साहेबानीं गावांत एक दौंडी देऊन जाहिर करावें कीं या उपद्रवाची दुर्दैवानें कोणाचे घरीं सुरुवात झाल्यास ती झाल्या बरोबर घरच्या कोणाही मनुष्यानें निदान शेजाऱ्यानें पोलिस चावडीवर जाऊन डाक्टरास वर्दी द्यावी ह्मणजे तो त्यांचे घरीं जाऊन औषध देईल व वेळोवेळ त्यास पाहून त्याची दुरुस्तवारी करील. डाक्टराचे औषधानें होईल तितका उपायच होईल यांत संशय नाहीं. कोणी अपायाची भीति धरून औषध घेण्याचें कोणी हयगयीवर टाकूं नये. त्यापासून फार नाश होतो व आजारी मनुष्यासच डाक्टराकडे घेऊन गेलें पाहिजे असें नाहीं, निरोप कळविला असतां बस आहे अशा अर्थाची दौंडीनें सर्व लोकांस सत्वर खबर द्यावी ह्मणजे बहुत उपयोग होईल. फार लोक गैर समजुतींत आहेत असें आह्मांस अनुभवावरून समजलें आहे.

ग्रामस्थलोकांनीं दैविक उपायांची गर्दी मांडली आहे. राजेश्वरावर महारुद्र सुरु असून भजनसप्ताह सुरू आहे व जागेश्वरावर यजुर्वेदी मंडळीची संतत धार सुरू झाली आहे व आणखी कांहीं योजना होणार आहेत असें समजतें. कृपाळु परमेश्वर या अरिष्टापासून सर्व लोकांचे शीघ्र रक्षण करो.

महामारीच्या उपद्रवाच्या संबंधानें बाहेर गावचे पक्षकार व साक्षीदार येथें बोलावणें अप्रशस्त समजून डिपुटी साहेबांनीं दिवाणी कोर्ट १५ दिवस बंद ठेवण्याचा हुकूम केला आहे.

---

**खरी असल्यास आतिशय जुलमाची गोष्ट**—मलकापुर तालुक्यांत नांदुरें येथें गेले सोमवारीं दिवसा बारा वाजतां मध्य वस्तींत सडकेवर सखाराम वल्लद डुमणा रंगारी याचे घरीं त्या गावांतील ५।६ मारवाडी सदासुक, अंबादास, नथमल वगैरे यांनीं आपले दुकानचे १०।१२ शिपाई बरोबर घेऊन जाऊन मोठी गर्दी केली. सखाराम घरांत नव्हता त्याची आई, बायको व भाऊ होता त्यांशी मारहाण केली, बायकांच्या आंगावरील सोने चांदीचे दागिने जबरीनें काढून घेतले. कापडांचे बस्ते लांबविले, त्याच्या धंद्याची १०० रुपये किमतीची कढयी होती ती उखडून काढून गड्यांच्या डोक्यावर देऊन जबरदस्तीनें घेऊन गेले, दुसरे कोणास घरांत येऊं दिलें नाहीं, व सखाराम बाहेरून येतांच त्याला आंत घेतलें व बुकललें आणि पांड्या कडून दोन तीन गहाणरोखे लिहून त्यांवर जबरदस्तीनें त्याच्या सह्या घेतल्या व हें सर्व कृत्य रात्रीचे ७ वाजतपर्यंत करून ते आपआपले घरोघर गेले. सखाराम पोलिस चावडीवर गेला होता पण त्याची कांहीं दाद लागली नाहीं. मारवाडी लोकांचें वजन गावांत फार असल्यामुळें असें झालें असावें. ही गोष्ट खरीच असेल तर इंग्रजी राज्यांत चांगला बंदोबस्त असतां प्रतिष्ठित ह्मणविणाऱ्या मारवाडी लोकांनीं दिवसा ढवळ्या आंगें जाऊन असें उमाजीनाईक रामोशाचे कृत्य करणें व ७ तास पर्यंत पोलिसास तें न कळणें व कळविल्यावरही पोलिसानें तिकडे लक्ष्य न देणें ह्मणजे अत्यंत भयंकर होय. सबब आमचे बुलढाण्याचे हुशार डिपुटी कमिशनर क्या० हडलस्टन साहेब यांनीं या गोष्टीची बारकाव्यानें चौकशी करावी व गरीब रंगारी नागवला गेला असल्यास त्याची दाद द्यावी व मारवाड्यांनीं असा जुलूम केला असल्यास दुसऱ्या मारवाड्यांस चांगली दहशत बसेल असें त्यांस शासन करावें.

---

येथील असिस्टंट कमिशनरचे शिरस्तेदार रा विनायक महादेव गाडगीळ यांस या आठवड्यांत सरकारी नोकरीवरून बडतर्फ केलें. यांस असें कळविलें ह्मणतात कीं, तुह्मी सरकारी नोकर असून नाजर प्रकर्णांत कपटानें वागलां. एवढेंच जर असेल तर तें प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं सिध्द करून दाखविलें पाहिजे होतें असें आह्मास वाटतें. विनायकराव नाजराचा व्याही खरा, पण बिचारा नाजरास पकडण्याचे व त्याचे जप्तीचे दिवशीं येथें नसून असिस्टंट कमिशनरचे स्वारींत होता. पण त्याचे घरांत ३०० रुपये निघाले ते त्यास ठाऊक नव्हते कारण ते बायकोचे कुणग्याचे होते व त्याबद्दल तिला भरकोर्टांत नेऊन बिचारलें होतें व तिनें स्पष्ट सांगितलें त्यावरून रुपये परतही मिळाले होते तरी मागाहून असा हुकूम झाला हा केवळ अन्याय होय. व यासाठीं सर्व लोक हळहळताहेत. व अशा फुसक्या सबबेवरून बहुत दिवसांच्या व वृध्दावस्थेस आलेल्या नोकराचें असें नुकसान झालें हें पाहून आह्मास फार वाईट वाटतें. आता याविषयीं कांहीं जबरदस्त व न्यायाची सबब असल्यास डि० साहेबांनीं ती प्रसिध्द करावी अशी आमची इच्छा आहे.

---

बाळापुरचे मौलवी साहेब यांवर एक फौजदारी मुकद्दमा असा आला होता कां एक मुसलमान जातीची मुलगी त्यांनीं तिच्या आईच्या इच्छेविरुध्द आपले घरीं ठेविली व तिचा एका पुरुषाशीं विवाह केला. त्यावरून तिनें त्या दोघांवर फिर्याद केली होती तिची या आठवड्यांत येथें डिपुटी साहेबांपुढें दोन तीन दिवस चौकशी चालली होती, शेवटीं त्यांणीं ठराव केला कीं मुलगी प्रौढवयांत होती सबब झालेली गोष्ट गैरकायदा नाहीं व याकरितां आरोपी गुन्हेगार नाहींत.

---

नाजरच्या प्रकरणांत मलकापूरास व त्या लगत्यास ज्या जप्त्या झाल्या होत्या त्या सर्व खुल्या केल्या तशाच रा० देवराव विनायक वकील यांच्या घरच्या वह्या नेल्या होत्या त्या त्यांच्या त्यांस परत दिल्या हें ऐकून आह्मांस संतोष होतो. कोणी विघ्नंतोषी किंवा दुष्ट वृत्तीचीं मनुष्यें सरकारांत भलती बातमी देतात व सरकारास त्यामुळें गडबडीच्या प्रसंगीं कांहीं तजविजी करणें भाग पडतें. पण त्या बातमींत कांहीं निष्पन्न झालें नाहीं व त्यामुळें भल्या गृहस्थांची विनाकारण गैरअब्रू झाली तर त्याजबद्दल बातमीदारांवर तजवीज करणें व भल्या मनुष्यांचें शांतवन करणें हें न्यायाधिकाऱ्याचें अवश्य कर्तव्य कर्म आहे असें आम्ही समजतों.

## वर्तमानसार

ब्रह्मदेशच्या राजानें इंग्रज सरकारच्या कांहीं गोष्टी कबूल केल्या ह्मणून आतां त्याशीं लढाई होणार नाहीं असें दिसतें.

बडोद्याचे स्पेशियल कमिशनर सर मीड साहेब पुढील महिन्यांत बंगलोरास आपले कामावर परत जाणार असें ह्मणतात.

कर्नल फेअर साहेब बडोद्याचे प्रसिध्द रेसिडेंट यास एडन येथें रेसिडेंट नेमणार असें समजतें.

बडोदा रेलवे अमदाबादेपासून अजमिरापर्यंत ३०० मैल वाढविण्यास परवानगी मिळावी ह्मणून तिनें सरकारास अर्ज केला आहे.

विलायतेहून आलेल्या गेल्या आठवड्यांतील तारांवरून कळतें कीं तिकडे ७।८ व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं.

शिंद्या स्टेट रेलवेचे चीफ इंजिनियर आपले कामाचे नकाशे व अजमास घेऊन गवरनर जनरल साहेबांकडे पुढल्या महिन्यांत जाणार आहेत.

मि० दोराबजी होर्मसजी बेंगाली या नावाचे पार्शी गृहस्थ हैदराबादेस गेले होते त्यांची नबाब साहेबांनीं भेट घेऊन आदरपूर्वक त्यांस पोशाग दिला असें कळतें.

मुंबईस शारीर व्यायामाचे बाबदींत कांहीं तजवीज चालू आहे त्याजमध्यें सर कावसजी जाहांगीर आणि सर अल्बर्ट सासून यांनीं एकेक हजार रुपये दिले.

---

### कै० गोविंदराव गायकवाड यांचे कै० हरिपंत तात्या फडके यांस पत्र.

गायकवाड सरकारचे नफा नुकसानीकडे आमच्या पुणेकर बांधवांचें नेहमीं विशेष लक्ष असतें, याचें मुख्य कारण असें आहे कीं, बडोद्याचें संस्थान स्थापन होण्यास पुण्यांतील कित्येक मंडळी मूळ कारण झालेली आहे. हें पुढील पत्रावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. अशा प्रकारचीं आणखीही कांहीं पत्रें प्रसिद्ध करण्याचें श्री शिवाजी कर्ते यांणीं मनांत आणिलें आहे.

श्री ह्माळसाकांत.

राजेश्री हरिपंत तात्या गोसावी यांसीं सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित गोविंद राव गायकवाड सेना खासखेल समशेर बाहादर दंडवत विनंतिउपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष आलीकडे पत्र येऊन कुशलार्थ कळत नाहीं. शरीर प्रकृति नीट नाहीं ह्मणून श्रीसिद्धटेकास गेले आहेत. ह्मणून राजश्री बाबाजी व नाबजी पाटील गवळी यांनीं पेशजी लिहिलें होतें. त्यावरून चिंता करीतच होतों, तों बाखा फार झाला. याजकरितां राजश्री दाजीबा व बाबा निकडीनें गेले ह्मणून नाबजी पाटील यांणीं लिहिलें, त्यावरून चिंता बहुत प्राप्त झाली. तात्या, आपले कृपेचा विसर सर्वथा व्हावयाचा नाहीं. आपण हे दिवस दाखवून संस्थानावरील स्थापना केली, तो उपकार वंशपरंपरा विसरणार नाहीं. ईश्वरें आपली मात्र सलामती राखावी ह्मणजे आह्मांस सर्व जोड पावली, जों जों आपलें शरीरभावनेचें श्रवण करावें तों तों बहुत चिंता प्राप्त होते. यास्तव शरीरीं स्वस्थ वाटल्याचें लिहिलें पाहिजे. यानंतर सरकारच्या ऐवजाच फार दिवस

लागले ह्मणून पेशजी आपण लिहिलें होतें त्याचें उत्तर सविस्तर राजेश्री गणेश संभाजी यांज समागमें लिहिलें आहे त्यावरून कळेल. सालमजकुरचे रसदेचा ऐवज दरोबस्त भरीस घालून पराकाष्टा केली. तेव्हां दरबार खर्चासुद्धां अडतीस लक्षांच्या हुंड्या, पस्तीस सरकारांत व ३ दरबार खर्चाबद्दल त्यांत एक आपणास व दीड रा. नानास बाकी पन्नास किरकोळ नावनिशीची यादी पाठविली आहे. त्यावरून ध्यानास येईल. दौलतींतील भ्रमाचा अर्थ सर्व गणेशपंत विदीत करतील त्यावरून कळेल सारांश दौलतींतील कस व भ्रम राहिला नाहीं. सरकारचें देणें मनस्वी- पार पाडणें आपणाकडे आहे. दरबार खर्चाशिवाय रा. नावजी पाटील गवळी यांजकडे एक लाख रुपयांची हुंडी बंधे मुदतीची, एकसष्ट दिवसांची मुदतीची आपणांस खासगत पाठविली आहे. चिरंजीव हरिभक्तीकडून मुदतीस ऐवज देविलि तो घेऊन उत्तर पाठविलें पाहिजे. कोणत्याही गोष्टीचे मजकडून अस्त्यापदार्थी अंतर पडणार नाहीं. आपल्याशीं १० हजार रुपयांचें गाव इनामे द्यावयाचा करार होता. त्यास मौजे खोलेसर व मौजे माणक परगणें कामरेज हे दोन्ही गाव पूर्वीं शिवराम भास्कर दिवाण यांजकडे होते, ते गाव आपणांस इनामपत्रें करून रा. केसोपंत नाना पटवर्धन यांचें हवालीं केलीं. सुरत अठ्ठाविशीचे महाल खराब्यामुळें गांव खराब, परंतु पांचेक सालीं दहा हजारांहून जास्ती आकार होईल. गांव तापी किनाऱ्यास आहेत, गाव चांगले खात रजमेचे पाहून दिले आहेत, वरकड सविस्तर रा. नावजी पाटील गवळी व चिरंजीव भक्ती यांस लिहिलें आहे, श्रुत करीतलि त्यावरून समजेल. सारांश माझा अभिमान सर्व आपणास आहे. पैका असून प्रतरणा श्रीमंताशीं व आपल्याशीं शपत पूर्वक होणार नाहीं एवढी खातरजमा असावी. र० छ० २६ स. स.

---

## शेतकरी लोक, त्यांचे सावकार व सरकार.

आमच्या देशांत जसे इंग्रज लोक आमची अज्ञानावस्था नाहींशी करण्याकरितां व आमच्या अवश्य गर्जा पुरविण्याकरितां व त्यांतच आपली यथेच्छ तुमडी भरून घेण्याकरितां प्राप्त झाले आहेत आणि त्यांणीं आपल्या डेरे राबत्या जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं दिल्या आहेत. तसे वाणी लोक गुजरार्थेतून व मारवाडी लोक मारवाडांतून येऊन जागोजाग त्यांणीं आपलीं ठाणीं दिलीं आहेत व लोकांस व्याजानें पैसा देऊन त्याच साधनानें आपल्या तुमड्यांची भरती करीत आहेत. या वरदाखविलेल्या दोन्ही लोकांकडून आमचें अकल्पित कल्याण होऊं लागलें आहे हें लोकांस अगदीं स्पष्टपणें कळत आहेच आहे. इंग्रज लोकांची व या व्यापारी लोकांची सांगड करणें एकपक्षी अगदीं बरोबर आहे, पण दुसरे पक्षीं पहातां राज्य संबंधानें ते श्रेष्ठ असल्यामुळें त्यांची कांहींशी कृती जरी यांच्या जवळ जवळ आहे तरी या प्रसंगीं यांच्या कृतीस त्यांचा समावेश करणें असंगिक आणि अयुक्तिक आहे ह्मणून त्या वर्गाची कृती साधक तितकी घेऊन बाकी अगदीं निराळी ठेवितों, आणि वाणी व मारवाडी यांच्या व शेतकरी गरीब कुणबी लोकांच्या दरम्यान असलेल्या व्यवहाराविषयीं विचार करण्याकडे वळतों.

वर दाखविलेले वाणी व मारवाडी लोक, या गरीब शेतकऱ्यांस अडचणीच्या प्रसंगीं पैशाची मदत देऊन अडचण दूर करितात हें त्यांचें कृत्य शेतकरी लोकांशीं मित्रत्व जोडण्याचें व त्यांजवर उपकार करण्यासारखें आहे यांत संशय नाहीं. पण यांतील गर्भित गोष्ट लक्षांत आणिली ह्मणजे खरोखर हे सावकार लोक या गरीब लोकांवर उपकार करण्याकरितांच आपला देश सोडून इतक्या लांबीच्या पल्यावर आले आहेत असें दिसत नाहीं. कोणत्याही धर्मशास्त्रांत कर्जाऊ दिलेले पैशाचें व्याज घ्यावें असें सांगितलें आहे, (यवनी शास्त्र खेरीजकरून) पण तें अमुकच नियमानें घ्यावें व त्या नियमाहून जास्ती घेतलें तर घेणारा सर्वस्वी नाश पावेल अशी स्पष्टपणी त्या धर्मशास्त्रांत आज्ञा असल्याचें दिसत नाहीं, अशी या वरील व्यापाऱ्यांची समजूत आहे. व ह्मणून ते कर्ज दिलेल्या पैशाचें व्याज घेण्याचें कामीं साधेल तसा हात मारतात. आणि तसें करून त्या कुळावर त्या कर्जाचें मोठें जोखीम पडतें आणि तें जोखीम त्यास सहन न झालें ह्मणजे उभयतांचें दरम्यान असलेलें मित्रत्वांत शत्रुत्व उत्पन्न होऊन भयंकर परिणाम होतात. हल्लीं पुणें जिल्ह्यांत चालू असलेला नमुना याच मासल्यावर आहे असें उघड दिसतें. वास्तविक विच्यार केला तर शेत करणारे लोक अहर्निशीं आपल्या धंद्यांत निमग्न असल्यामुळें त्यांच्या अंगीं कोणतेही वाईट दुर्गुण असण्याचा संभव नाहीं. हें लक्षांत आणिलें ह्मणजे ज्याचा पैसा घ्यावा त्याला परत न देतां त्याच्याशीं मारामारी करावी, त्याचीं घरेंदारें लुटावीं अशी गोष्ट त्यांच्या हातें घडण्याचा मुळींच संभव नाहीं; कारण त्यांचा तो पेशा नव्हे किंवा तशा वर्गाच्या लोकांत त्यांची गणनाही नाहीं. असें जर आहे तर आपल्यावर उपकार करणारे जे सावकार त्यांच्याशीं इमानानें न वागतां दुष्टबुद्धीनें त्यांचा नाश करण्यांत प्रवृत्त होणें यास कांहीं तरी योग्य सबब असली पाहिजे. सावकार लोक हे यांस एक बाजूनें मदत करणारे आहेत व दुसऱ्या बाजूनें त्यांचें रक्त पिणारे असावे अशी त्यांची कृति दाखवितें. फांसेपारधी लोक अन्नाची लालुच दाखवून पक्षास जाळ्यांत अडकवितात व त्यांचा भक्षस्थानीं उपयोग करितात तद्वत या सावकारांचें देणें घेणें मतलबी दिसतें, कारण या गरीब विच्याऱ्यांच्या घरावर या सावकारांचा एकदाकां हात पडला ह्मणजे त्यांस ते सर्वस्वी नागवितात व या नागविण्यास त्यांचे जवळ जें हत्यार आहे तें फक्त व्याजाचें आहे. मुद्दल कर्जावर पाहिजे तितकी व्याजाची रकम लादली जाते आणि त्याची रकम एका पर्वता एवढी होते. आह्मास नुक्तीच एकानें या मारवाडी लोकांच्या देवघेवीबद्दल अशी हकीकत कळविली आहे कीं, एका मारवाड्यानें एका कुळास लग्नाच्या कार्याकरितां २० नारळ उधार दिले आणि त्यांची किंमत पांच वर्षेपर्यंत व्याजाचे चलनावर बढती ठेवून अखेर न्यायद्वारें पांच खंडी भाताचा त्या कुळावर निवाडा मिळविला. न्यायासमूर जो कर्ज रोखा आला होता तो अखेरचा होता, त्याचे दरम्यान ( कुळाच्या व मारवाड्याच्या दरम्यान ) किती रोखे झाले असतील याचा नेम नाहीं व ते न्यायासमूर आले नाहींत. ही गोष्ट आह्मी उदाहरणाकरितां येथें घेतली आहे. इकडे लक्ष दिलें ह्मणजे या सावकार आणि गरीब लोकांचे मधील व्यवहाराचें खरें तत्व बाहेर येतें आणि असें जर आहे, तर त्रस्त झालेला मनुष्य कितीही अब्रुदार असला तरी, या निर्दय जुलमामुळें त्याचें मस्तक फिरून तो शेवटील परिणामावर येईल यांत फारसें आश्चर्य नाहीं.

आह्मास पुष्कळ अंशीं असें वाटतें कीं, यांत सावकार लोकांची विशेष कसूर आहे व हें कोणासही वाटेल, खेरीज यांत कांहीं अंशीं सरकारचीही कसूर आहे, पण बहुतेकांस असें वाटेल कीं, सरकारचा यांत मुळींच संबंध नाहीं व हें आह्मीही कबूल करितों तरी पण क्षणभर विचार केला तर कुळांस सावकाराचें घर पहाण्यापर्यंत मजल येण्यास सरकारी साऱ्याची जबर रकम ही थोडी बहुत तरी कारणीभूत आहे, सरकारी सारा अधिक वाढल्यामुळें प्रापंचिक खर्चास तोटा येऊं लागला ह्मणजे अर्थात सावकाराचें घर पहाणें भाग पडतें. १२ महिने शेतकीचें काम करून त्यांत जें उत्पन्न होईल त्यांतूनच हे दोन्हीं खर्च भागविण्याचें त्यांस साधन असतें. झालेलें उत्पन्नांतून एक जबर रकम सरकारी साऱ्याकरितां गेली ह्मणजे किंवा निर्वाहास तोटा येऊन साऱ्याची रकम देणें असली ह्मणजे त्याचे फेडीकरितां कर्जच काढिलें पाहिजे आणि जें कर्ज काढावयाचें तें सावकाराशिवाय दुसरीकडे मिळण्याचें साधन नसतें. अशा अडचणीच्या प्रसंगीं वर लिहिलेले सावकाराकडून जो पैसा मिळणें तो कोणत्या अटीनें मिळत असेल याजबद्दल विशेष खुलासा करण्याचें कारण नाहीं, कारण त्याविषयीं कोणी अजाण असेल असें वाटत नाहीं.

या एकंदरीवरून विचार केला असतां या शेत कसणारे लोकांस सावकाराचें घर पहाण्यापर्यंत वेळ येण्याला कारण सरकारी साऱ्याची रकम जबर आहे हेंच होय. आणि असें आहे तर सरकारानें प्रथमतः साऱ्याचे बाबतींत कुळांस सोहोलत मिळेल अशी तजवीज करणें जरूर आहे व नंतर दुसरें कारण सावकारी व्याज. याबद्दलही योग्य नियम ठरविला पाहिजे व तिसरें कारण न्यायाधिशाच्या निवाड्यावरून जी जप्ती होते ती व सरकारी साऱ्याकरितां जी जप्ती होते ती याजबद्दलही योग्य नियम ठरविला पाहिजे.

सू. द.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

### नोटिस.

CLOSING OF THE KHAMGAON (STATE) RAILWAY.

**खामगाव स्टेट रेलवे बंद करण्याविषयीं**

या नोटिसीअन्वयें कळविण्यांत येतें कीं, तारीख १ माहे जुलै सन १८७५ इसवी रोजीं व त्यानंतर पुढें दुसरी नोटिस देण्यांत येईपर्यंत सरकारच्या हुकुमावरून खामगांव स्टेटरेलवे बंद करण्यांत येईल.

या करितां तारीख ३० मिनहूनंतर पुढें ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेवरील खामगांव व जालंब या दोन स्टेशनांचें दरम्यान ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेच्या गाड्या जाणार व येणार नाहींत सबब येत्या जुलईच्या १ ले तारखेस व त्यानंतर पुढें खामगांव व जलंब या दोन स्टेशनांचे दरम्यानचे लैनीच्या संबंधानें माल व उतारूं नेण्याआणण्याबद्दल जी व्यवस्था केलेली आहे. ती व त्याबद्दल ज्या नोटिसी देण्यांत आल्या आहेत त्या सर्व रद्द करण्यांत आल्या आहेत,

**हेनरी कांडर,**

जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता० १६ माहे मे सन १८७५ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

### नोटिस.

CLOSING OF THIS COMPANY'S COTTON SIDINGS AT COLABA.

**ह्या कंपनीचें कुलाबा येथील "काटन सायडिंग्स" बंद ठेवणें.**

नोटिस— या लेखाच्या द्वारानें जाहीर करण्यांत येतें ऐसें कीं; चालू महिन्याची तारीख २६ वी रोज शनवार यानंतर पावसाळ्यांत मुंबइत आणलेला कापूस रेलवेनें ह्या कंपनीच्या कुलाबा येथील सायडिंगाकडे नेला जाणार नाहीं; परंतु बोरीबंदरावर अथवा "पोर्टट्रस्त सायडिंगस" येथें गुमास्ते अथवा आडते यांच्या स्वाधीन केला जाईल.

पावसाळा गेल्या नंतर कुलाबा येथील सायडिंग पुनः सुरू करल्याबद्दलची नोटिस योग्य काळीं दिली जाईल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक मानेजर

मुंबई तारीख १६ जून १८७५ इ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.